नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका



अनुक्रमणिका

आवाहन

मराठीतील दर्जेदार नियतकालिकांच्या दुरावस्थेची समस्या गेल्या काही वर्षांपासून विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र 'युगवाणी'च्या संघटित प्रयत्नानंतर मराठी वाङ्मयीन संस्कृतीतील एक सर्वाधिक अग्रक्रमाची समस्या म्हणून आता पुरेशी जाणवू लागली आहे.

मात्र त्यावरील तोडगा, उपाययोजना व त्याकरता आवश्यक त्या सामूहिक कृतीकरता पुरेशी इच्छाशक्ती अद्यापही अभावानेच आढळते.

विदर्भ साहित्य संघाच्या 'युगवाणी' या नियतकालिकाने मराठीतील पहिली वहिली नियतकालिक विकास परिषद घेऊन त्याद्वारे केवळ युगवाणीच नव्हे तर तत्सम सर्वच वाङ्मयीन नियतकालिकांच्या उपजीविकेच्या समस्यांची शासनाने दखल घेतली. त्याबाबत एक समिती नियुक्त करुन त्यावर विचारही केलेला असून समितीने मांडलेल्या सूचनांची स्वीकृती व अंमलबजावणी याबाबत मात्र अद्याप कोणताच निर्णय घेतलेला नाही. तो तसा जलद घ्यावा अशी मागणी सर्वच वाङ्मयीन नियतकालिकांकडून होणे आवश्यकही आहे.

दुसरी वाङ्मयीन नियतकालिक विकास परिषद शासनाच्या या संबंधातील निर्णया नंतरच आयोजित करावी असा मानस असल्याने त्या संदर्भातही पुढील हालचाल तूर्तास स्थगित आहे.

दरम्यान पहिल्या वाङ्मयीन नियतकालिक विकास परिषदेने सुचविल्याप्रमाणे प्रत्येक वाङ्मयीन नियतकालिकांनी आपआपला स्थायी निधी उभारण्याच्या सुचनेची अंमलवजावणी विदर्भ साहित्य संघाने करावी असे कार्यकारिणीने ठरविले असून 'युगवाणी' या विदर्भ साहित्य संघाच्या नियतकालिकाने आपला स्वतःचा स्थायी निधी उभारावा या हेतुने सर्व वाचक, वर्गणीदार, संस्था, व्यक्ती व वाङ्मयप्रेमी यांना हे आवाहन करण्यात येत आहे.

'युगवाणी' या नियतकालिकाला पुढेही स्थिर पायावर कायम उभे राहता यावे याकरता एक 'स्थायी निधी' उभारण्… ठरविण्यात आले असून त्यास सर्व संबंधितांनी सढळ हाताने मदत करावी व ही वाङ्मयीन संस्कृती कायम राखण्… अधिक समृद्ध करण्यास सहकार्य करावे ही विनंती अ… या निधीत रुपये पाचशे व अधिक रक्कम जमा करणाऱ्यास 'युगवाणी'चा अंक आजीव प्राप्त होत राहील.

'युगवाणी'चा स्थायी निधी हा मराठी वाङ्मयीन संस्कृ… टिकवून धरण्याच्या कार्यातील एक सर्वाधिक महत्वपूर्ण दुवा समजून समस्त वाङ्मयप्रेमी यथाशक्ती सहकार्य करतील या विश्वासासह हे आवाहन.

संपादक/प्रकाशक
'युगवाणी'
विदर्भ साहित्य संघ, नागपूर

● ●

टिप निधीची रक्कम चेक/ड्राफ्टने सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ या नावे कृपया **'युगवाणी स्थायी निधीकरता'** असे नमूद करुन पाठवावी ही विनंती.

अनुक्रमणिका

युगवाणी

॥ विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र ॥

संपादक : श्रीपाद भालचंद्र जोशी

॥ भाषा, साहित्य, संस्कृती, संवाद व कलाविषयक अभिरुचीचे जोपासन, संवर्धन-संशोधन ॥

प्रबंध संपादक केशव जोशी

संपादक मंडळ : डॉ. विश्वास कानडे/डॉ. दमयंती पांढरीपांडे/मनोहर तल्हार / कमलाकर धारप/प्रा. कृष्णा चौधरी/भगवान ठग

वर्ष एकोणपन्नासावे / अंक ४९-७ / ८ / ९ जु-ऑ-स / १९९३.

मूल्य १० रु. / वार्षिक वर्गणी ५० रु.

त्रैवार्षिक वर्गणी १२५ रु.

अनुक्रम ■ ■ ■

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अंशतः अनुदान प्राप्त.

या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

मुद्रित शोधन / संकलन / प्रतिलिपी इ. सहकार्य सौ. शोभा उवगडे / सौ. कुंदा केळापुरे / श्यामकान्त कुळकर्णी

■ मुखपृष्ठ व आतील चित्रे : संजय धोतरकर

■ संपादकीय पत्रव्यवहार : संपादक, युगवाणी, वि. सा. संघ, झाशी राणी चौक, नागपूर १२ / दूरभाष : ५२३९२९

■ वर्गणी व वितरणविषयक पत्रव्यवहार सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, झाशी राणी चौक, नागपूर १२.

संपादकीय

'युगवाणी'सारख्या वाङ्मयीन नियतकालिकांच्या अनियतकालीन प्रकाशनाच्या संबंधाने पुनः पुनः नव्याने काही लिहिणे हे असे काही लिहिण्याचा विचार करताक्षणीच 'अती झाले अन् हसू आले' असे वाटायला लावते. याच जागेवरून वारंवार त्याबद्दल त्याचेशी संबंधित विविध घटकांच्या सर्वच आयामांबद्दल वेगवेगळ्या पद्धतीने गेल्या सहा वर्षांत लिहून झाले आहे. त्यावरील चर्चाही घडून आल्या, घडवून झाल्या आहेत. आणि तरीही दरवेळेला अंक नियमितपणे प्रकाशित होतो न होतो तोच त्याची नियमितपणाची गाडी रुळावरून घसरायची हे काही थांबलेले नाही.

सारीच कळकळ, चर्चा, निवेदने, आवाहने, प्रयत्न हे जणू पालथ्या घड्यावरून वाहून जाणाऱ्या पाण्यासारखे केवळ वाहून जातात व पुनः अंकाच्या विलंबाने होणाऱ्या प्रकाशनाबद्दल क्षमायाचनेची तीच वेळ परत येते. अशा दुष्टचक्राच्या वाङ्मयीन संस्कृतीचा 'युगवाणी' सारखी नियतकालिके ही बळी आहेत. ती आजच आहेत आणि काल नव्हती असेही समजण्याचे कारण नाही. ही स्थिती या नियतकालिकांच्या जणू पाचवीलाच पूजली आहे. 'युगवाणी' च्या जन्माच्या वेळेच्या वा.ना. देशपांडे यांच्या पहिल्याच संपादकीयापासूनच ही स्थिती आपल्याला दिसते.

'युगवाणी'चा पहिलाच अंक जेव्हा प्रकाशित व्हायचा ठरले होते तेव्हा तो प्रकाशित होऊ शकला नव्हता. एवढेच नव्हे तर नंतरच्या वर्षभराचे अंक प्रकाशित करतांना कै. वा. ना. देशपांडे आणि विदर्भ साहित्य संघाची काय दमछाक होत गेली याचा इतिहास स्पष्टच आहे. तेव्हाची साधन सामुग्री तेव्हाच्या तुलनेत तुटपुंजी म्हणता येईल एवढीही नव्हती. आजही त्या परिस्थितीत तुटपुंजी का होईना पण साधनसामुग्री आहे. एवढाच काय तो बदल झालेला दिसतो.

वाङ्मयीन दर्जाच्या बाबतीत कोणतीच तडजोड स्विकारायची नसल्याने पन्नासाव्या वर्षाकडे वाटचाल करताना देखील 'युगवाणी'सारख्या नियतकालिकांचा संसार या समाजात शेवटी हा असा आहे. जणू समाजाचा वाङ्मयीन दर्जा आणि अभिरुची टिकवण्याचीच ही किंमत असावी. असो.

'युगवाणी 'चा हा अंक जु-ऑ-स'९३ असा अंक असून गेल्या काही वर्षात विदर्भात नव्याने उदयास आलेल्या नाट्यलेखनाचे एकांकिकेच्या रुपातले एकत्र दर्शन त्या कोणत्याही एकांकिकेवर भाष्य न करता घडविण्याचा प्रयत्न या अंकातून दिसेल.

संहिताप्रधानता हे (मराठीच्या गेल्या दिडशे वर्षाची परंपरा लाभलेल्याही) रंगभूमीचे वैशिष्ट्य आहेच. संहितेशिवाय नाटक असूच शकत नाही असे नाही हे मान्य असणाऱ्या विचारांचा मराठी रंगभूमीवर क्षीणसा देखील परिणाम पडल्याचे दिसत नाही. रंगमंदिराबाहेरील नाटक ही संकल्पना देखील (प्रस्तुत लेखकाच्या पथनाट्य चळवळ प्रवर्तनकार्यासहित) तुरळक चळवळींच्या ऐतिहासिक व अभ्यासविषयक महत्त्वाच्या अपवादात्मक नोंदीपलीकडे महाराष्ट्रात फारशी आवश्यक त्या नाट्य अभिरुची संपन्न अशा प्रकाराने प्रसरण पावली असे वातावरण अद्याप तरी दिसत नाही.

भाषिक चिन्हव्यवस्थेतील शब्दप्राधान्य हाच माणसांच्या जीवनातील संवादव्यवहाराचा स्थायीभाव झालेला असल्याने अव्यक्ताचे स्वरूप व स्वभाव हा मुळात शब्दरूप नसला, शब्दविहीन असला, तरी शब्दाच्या शरीराशिवाय त्याच्या स्वरूप व स्वभावाचा पुरेसा बोध मानवी मेंदूला होत नाही ही वस्तुस्थिती आहे. 'शब्दाविणे संवादिजे' ही आदर्श अशा सुसंवादाची स्थिती असली तरी मानवी जीवनाचा सर्वसामान्य संवादव्यवहार हा शब्दप्रधानतेनेच सर्वाधिक व्यापलेला आहे.

'रंगसंहिता' ही भाषिक नाट्यसंहितेतील निहित शब्दरुपातील अव्यक्ताला व्यक्त करण्याचीच (शब्द व शब्देतर) कलात्मक साधनसामुग्री तेवढी असल्याने भाषिक नाट्यसंहिता हीच शेवटी रंगावृत्तीचा पाया ठरली आहे आणि रंगभूमीची इमारत याच पायावर आजवर तरी उभी आहे. मानवी जीवनाच्या संवादव्यवहारातून जोवर अव्यक्ताला व्यक्त करण्याचे साधन म्हणून मानवी मेंदूला शब्द शरीराची प्राधान्याने गरज लागणार आहे तोवर रंगभूमीची इमारत याच पायावर उभी राहणार आहे.

रंगावृत्तीपूर्व असा असलेला हा पाया जेवढा सखोल, मजबूत, पक्का, बलशाली, सौंदर्यवान आणि अभिरुची संपन्न तेवढी रंगभूमी ही समृद्ध असण्याची शक्यता अधिक. हा पाया, जसा जेवढा ठिसूळ, कच्चा, रंगभूमी देखील त्या मर्यादेत वावरणारी अशीच वस्तुस्थिती आहे. ज्या ज्या काळात, ज्या ज्या वेळी, ज्या ज्या ठिकाणी व ज्या ज्या भौगोलिक प्रदेशात रंगावृत्तीपूर्व असा हा पाया पक्का असतो त्या त्या वेळी तेवढ्यापुरती त्या त्या ठिकाणची रंगभूमी तेव्हा त्या प्रमाणात समर्थ, समृद्ध जाणवते. असाच सार्वत्रिक अनुभवही आहे.

वैदर्भीय रंगभूमी वर्षानुवर्षे अस्तित्त्वात राहूनही (एखाद दुसरा अपवाद वगळता) एकतर आपल्या त्याच त्या रिंगणात फिरते अथवा अनुकरणशीलतेच्या फार पलीकडे सरकलेली दिसत नाही. याचे कारण रंगावृत्तीपूर्व या शब्दाशरीराची वैदर्भीय प्रकृतीच खराब असते यातच आहे.

या प्रकृतीत जिथे ज्या वैदर्भीयांमध्ये केवळ सुधारणाच नव्हे तर प्रकृतीचा आदर्श म्हणून उभे राहण्याचे सामर्थ्य आढळते तिथे मग वैदर्भीय / अ-वैदर्भीय अशा

भौगोलिक सीमारेषांना काही अर्थच उरत नाही. ती स्थळ, काळाच्या सीमारेषा ओलांडून साऱ्यांचीच झालेली प्रकृती असते. प्रा. महेश एलकुंचवार ही वैदर्भियांची त्यादृष्टीने असणारी आज एकमेव अभिमानाने मिरवावी अशी नाट्य प्रकृती आहे. वैदर्भियांचीच नव्हे ती अखिल मराठीची, आणि आता तर भारतीय रंगभूमीची अशी नाट्यप्रकृती आहे.

तसेही अव्यक्ताच्या अभिव्यक्तींचे भौगोलिक सीमाप्रदेशातील चरित्र, रुप, भाव-स्वभाव, आकार-प्रकार जाणवण्याचे नाते सोडले तर पलीकडे त्या अनुभुतीचे प्रादेशिक असणे-नसणे हे तसे गौणच. तरीही त्या अनुभुतीची त्या त्या भौगोलिक प्रदेशाशी अनुभुतीच्या स्तरावर नाळ जुळलेली असणेही अपरिहार्यच अर्थात हे विशिष्ट कलाकृतीच्या संदर्भातच शक्य आहे, सरसकट नव्हे.

प्रा. महेश एलकुंचवारांच्या नंतर त्या खालोखाल त्या जवळपास येईल असे नाव घेण्यासारखे नाट्य लेखन व लेखक विदर्भात उपलब्ध नाही. (खरे तर काही सन्मान्य अपवाद वगळले तर समग्र मराठीतच नाही.)

एलकुंचवारांच्या नाट्यलेखनाची पहाट ही एकांकिकेतूनच उगवली आणि आज हा सूर्य नाट्यलेखनात पूर्ण तेजाने तळपतो आहे. या प्रकाशाचा संसर्ग वैदर्भीय नाट्यलेखनास होऊ लागला आहे असे वाटू लागले आहे. ते कितपत बरोबर आहे हे शोधण्याचा जरी प्रयत्न म्हणून हा एकांकिका विशेषांक नसला तरी या पार्श्वभूमीवर वैदर्भीय नाट्यलेखन किती प्रमाणात कसे व कुठे उभे आहे, याचे सरळ, प्रत्यक्ष, प्रातिनिधिक स्वरूपात व एकत्र असे दर्शन भाष्याशिवाय घडावे असा हेतु निश्चितच आहे.

वैदर्भीय रंगभूमी आपल्या ज्या स्वायत्त व स्वतंत्र अस्मितेच्या घडणीच्या शोधप्रयत्नात धडपडते आहे त्या प्रवासाची सुस्पष्ट वाट कदाचित तिला याच एकांकिका विशेषांकातील लेखकांच्या मधून गवसण्याची शक्यता असेल.

विदर्भातली रंगभूमी तंत्रदृष्ट्या समृद्ध न होण्यातही आपली त्या प्रांतात बौद्धिक, वैचारिक उंची वाढविण्याकडे असणारे दुर्लक्ष, त्याचे महत्त्व न पटणे आणि त्या संबंधातला आळशीपणा या बाधा नाहीत असे नाही परंतु उणीव आहे ती या पातळीवरही समृद्ध अशा वैदर्भीय संहिता लेखकांची. अशा वैदर्भीय अक्षर शरीराच्या शोधात असलेल्या वैदर्भीय रंगभूमीला आपल्या स्वप्नातली आदर्श रंगभूमी उभी करण्याचे अक्षर सामर्थ्य ज्यांच्यात संभवते अशा काही लेखकांच्या एकांकिकांचा समावेश या अंकात झालेला आहे. तरीही भवितव्याच्या पोटात काय दडलेले आहे हे तर येणारा काळच ठरवील.

श्रीपाद भालचंद्र जोशी

चिमण्या, टरफले आणि सैगल

श्रीपाद भालचंद्र जोशी

"चिमण्या, टरफले आणि सैगल" हा श्रीपाद भालचंद्र जोशी यांचा एक लेखन प्रयोग. एकेकाळी मराठी वाङ्मयीन संस्कृतीची उंची, व खोलीचे मोजमाप स्वरूप ठरून गेलेल्या 'सत्यकथा' या वाङ्मयीन नियतकालिकाचे कार्यकारी संपादक श्री. राम पटवर्धन यांनी त्या संबंधाने लिहिलेल्या एका पत्रात (३/७/१९८०) म्हटले होते की "या लेखनात एक अर्थपूर्ण जीवनाकार व्यक्त होऊ पहातो आहे."

त्या आधीच्या पत्रात (१/६/१९८०) त्यांनी हे लेखन वेधक वाटल्याचे, मात्र ते आहे त्या स्वरूपात अवतरण्यात अपरिहार्यता जाणवली नाही असे म्हटले होते. ते कसे सुचले व ते लिहिले जाताना लेखकाने त्याच्या स्वरूपाबद्दलचे निर्णय कसे घेतले, लेखकाच्या मनातला 'थीम' कोणता हे कळविण्याबाबत लिहिले होते.

लेखकाच्या पत्रानंतर राम पटवर्धनांनी कळविले होते (३/७/१९८०) की 'लेखनातील अनुभव घटकांची मांडणी विस्कळित झाल्यामुळे तो जीवनाकार पुरेसा प्रत्ययकारी व जिवंत असा अनुभव देऊ शकत नाही असे मला वाटले, म्हणून त्या जीवनाकाराबद्दल म्हणजेच एक प्रकारे लेखनाच्या 'थीम'बद्दल चौकशी केली. पण आपल्या उत्तरात आपण 'थीम' सांगितलाच नाही. "…..थीम वाचकाला सुस्पष्टपणे समजावा या बद्दल आपल्याला फारशी आस्था नसावी. त्यामुळे लेखन परत पाठवीत आहे."

राम पटवर्धनांच्या संपादकीय कारकीर्दीत त्यामुळे 'सत्यकथे'त प्रकाशित न झालेला हा लेखन प्रयोग अद्याप अप्रकाशित होता.

प्रस्तुत लेखकाच्याच वेगवेगळ्या कवितांमधल्या काही ओळी मांडून झालेल्या या रचनेतून एक सूत्र व पात्र स्वरूपात ही 'संभाषण (संवाद) रूपी रचना' तयार होत गेली आहे. हे जाणवत गेल्यावर या अनुभवाला या स्वरूपात साकार व्हायला आवश्यक त्या, कवितेव्यतिरिक्तच्या, शब्द, वाक्य, वाक्यांशाची भर घातली जाऊन, हे स्वरूप दिले गेले होते.

हा सुमारे १४-१५ वर्षांपूर्वीचा अप्रकाशित लेखनप्रयोग. त्याच्या मूळ स्वरूपातच प्रकाशित करीत आहोत.

तो / शिरी : असं कुठं आहे की पावसाळ्यात पाऊस येतोच.

ती पण असंही नाही की/पाऊस उन्हाळ्यात अन् हिवाळ्यात[illegible].

तो हे बघ, पावसाचं काही खरं नाही.

ती आभाळ भरून आल्यासारखं वाटतं म्हणून म्हणतोस.

तो नाही.

ती मग ?

तो तुला आठवतं, भर दुपारी गावाबाहेरच्या एका देवळाकडून आपण चालत येत होतो आणि अचानक आलेल्या पावसात एका हातात सायकल असतानाही दुसऱ्या हातात भर रस्त्यावर एकमेकांना धरून

	आपण चालत होतो.
ती	हूं.
तो	तसा हवा तेव्हा पाऊस कुठं येतो आता ?
ती	येणारही नाही !
तो	नाही ?
ती	नाही !
तो	का ?
ती	तेव्हा दोघांच्याही पावसाचं आभाळच मुळी एक होतं.
तो	आता
ती	पाऊस पडला तरी एकमेकांना एकदम ओलं करणार नाही.
तो	नाही ?
ती	नाही.
तो	कारण ?
ती	आभाळ बदललंय्.
तो	की आपण ?
ती	काहीही म्हण...
तो	काहीही कसं ?
ती	शिरी, तुझा बुद्धिवाद याचे उत्तर नाही देऊ शकत ?
तो	शकतो ना.
ती	मग त्यानंच काय ते उत्तर शोध.
तो	मध्यमवर्गीयाचा बुद्धिवाद तो. सारीच उत्तरं एकट्यानं शोधणारा नाही.
ती	हे आधी कळायला हवं होतं शिरी.
तो	कळत होतं, फक्त ते तुला त्यावेळी कळत नव्हतं.
ती	आता वेळ निघून गेली आहे.
तो	असू दे.
ती	हातातून निसटणारं तारुण्य जपता येत नाही.
तो	तशीच वेळ देखील.
ती	तुला नेमकं काय हवंय ? तारुण्य की वेळ ?
तो	वेळेवर तारुण्य !
ती	ते मी कधीच लिलावात काढलं आहे. म्हणून म्हणते शिरी, वेळ निघून गेली आहे.
तो	वेळ नाही, तारुण्य.
ती	शिरी, तुझ्या या शब्दांच्या जाळ्यातच वेळेचे मासे श्वास गुदमरून मेले. त्यांना जाळं नको होतं. पाणी हवं होतं, त्यांच हक्काचं पाणी.
तो	शिरीन -
ती	तुझ्या ओठात शोभत नाही ही हाक. बरेच दिवसांनी ऐकली. कानाला बरं वाटलं.
तो	पण म्हणून मनाला बरं वाटेलच असं नाही. असंच ना ?
ती	होय.
तो	शिरीन -

ती पुनः
तो हाक मारू नकोस ?
ती नाही !
तो संबोधूही नकोस !
ती नाही !
तो शब्दांचे जाळे गुंडाळून ठेव !
ती नाही !
तो मग ?
ती पावसाळा जवळ येतोय.
तो तर ?
ती त्या आधी मला गेलं पाहिजे.
तो आश्रमशाळेत ?
ती हूं.
तो रस्ते पाण्यानं अडून जातात म्हणून...
ती हूं.
तो बसेस बंद होतात नंतर, नाही ?
ती हूं.
तो समजा असं झालंच तर
ती म्हणजे ?
तो म्हणजे असं की पावसाळा आला, तू आश्रमशाळेत पोचण्याआधीच रस्ते पाण्यानं अडले, बसेस बंद झाल्या आणि तू अधेमधेच अडकलीस.
ती तरी साचलेलं पाणी उतरणार नाही असं कुठं आहे ?
तो बरं ?
ती साचलेल्या पाण्यात प्रतिबिंब पाहीन स्वतःचं...
तो म्हणजे तुझी जुनी सवय कायमच आहे तर ?
ती जुनी सवय ?... शिरी ?...
तो थांबली. बोल. खपल्या काढू नको वा मीठ चोळू नको अथवा तत्सम पुस्तकी वाक्याच्या जंजाळात सापडलेल्या तुझ्या जिभेला फारसं काय साधायचं ?
ती अजून.
तो अं हं. तेव्हा !
ती मी अजूनही नाही म्हणाले. अजून काय उरलंय ते विचारतेय.
तो तेही अपेक्षितच.
ती म्हणजे ?
तो साचलेल्या पाण्यातील प्रतिबिंब लपवीत शब्दांवर पोहणारे ते दिवस तू किती आत्मविश्वासाने काढायचीस. शिरीन, तुला आठवतं, एकदा भुईमुगाच्या शेंगा खात बसलो होतो. ओल्या, मिठाच्या पाण्यानं भरलेल्या त्या शेंगा टचूकन फोडतानाचा आवाज. खारं पाणी, गोडसर दाणा, संमिश्र चवीत दुपारची उन्हं चढत होती. रेडिओवरील सैगलच्या एकेका गीतासोबत टोपलीत टरफले चढत होती.

खिडकी लाटलीस तू अन् पंखचेपली चिमणी छतभर कलकलाट करीत किती तरी वेळ रागानं चोच खिडकीच्या चौकटीवर आपटत होती.

ती हूं.

तो तुझ्या डोळ्यातली चीड, तिच्या डोळ्यातली जखम, हळूहळू दोन्हीही निवले. चिमणी शांत झाली. तू सुस्तावली, मी मंदावलो.

ती आणि दारावर अचानक थाप पडली.

तो शिरीन, आठवतं तुला ते

ती हो, आणि माझ्या आवरासावरीत शेंगांच्या टरफलांची टोपली......

तो तू तिथंच विसरून गेलीस.

ती शिरी, त्यावेळी त्या चिमणीचं काय झालं असेल हेही आपण विसरलो.

तो नाही, आपण नाही. तू विसरलीस.

ती शिरी -

तो होय. आजही ती चिमणी येते. टोपलीतले एकेक टरफल उचलते. उचलताना थोडी वर बघते. सैगलचा आवाज तिला आतवर रुतला असावा.

ती शिरी, उत्पादनाच्या साधनांवरची मालकी आणि त्यांचे वितरणाच्या यंत्रणेवरील प्रभुत्व भांडवलदारी असले म्हणजे शोषणाची मुळं पक्की होत जाऊन - वगैरे त्या तुझ्या सिद्धांतात अजूनही चिमण्या, टरफले आणि सैगल ?

तो शिरीन, चिमण्यांची गिधाडे होत नाहीत तोवर टरफलांनीच घरटी सजवतात. टरफल उचलताना आतला आवाजच सैगलच्या गळ्यात दाटून आला आहे.

ती आणि चिमण्यांची गिधाडे होतात तेव्हा काय करावे ?

तो लाथा हाणाव्यात, झोपड्यांचे गवत पेटवावे

ती आणि

तो तंबू हलवावे खदखदा

ती म्हणजे काय होईल ?

तो तेव्हा तरी पक्षी हल्लेखोर होतील

ती डोळ्यांनी लालभोर होतील

तो होऊ देत.

ती भाषा बोलतील हिशेब मागण्याची तेव्हा ?

तो हिशेबांचे जाळे व्हावे. शुद्ध तेवढी टिकवून ठेवावी ओठांनी वणवा पेटवण्याची

ती आणि

तो जाता जाता सांगावे निर्वासितासारखे की माझ्या पावलांचा मार्ग तुझ्या घरावरून गेला त्याला माझा इलाज नाही.
या मार्गावर मला लोटणाऱ्यांनाच लाज नाही.

ती आश्रमशाळेत शिकवते मी हे सारं.

तो तेवढ्यानं होणार नाही शिरीन.

ती आता कशानंच होणार नाही शिरी. आभाळ बदललं की अंगण बदललेलंच असतं..

तो की अंगण बदललं म्हणून आभाळ.....

ती पण बदललेल्या अंगणातही निखाऱ्यांचीच झाडं -

तो आठवण म्हणून लावलेल्या झाडांना फुलता येत नाही.

ती फुलवता येतं !

तो खोटं ! निखारे लावल्याच्या आपल्या लावण्यावर खूष होऊन उगाच जोपासलेलं स्वतःचं रान ते. त्या पेक्षा आश्रमशाळेच्या आसपासचा एखादा सोनचाफा आपल्या उघड्या डोळ्यांनी लावून घेतला असतास तर शिरीन तुझ्या देहाची ही अशी उजाडवाग.....

ती शिरी, हे ऐकायला आले नाही. बऱ्याच वर्षात भेटलास म्हणून थांबले.

तो म्हणूनच बऱ्याच वर्षाचा देह जाणवला.
उपास करतेस ?

ती हूं.

तो शुक्रवार ?

ती हूं.

तो कशासाठी ?

ती सहज.

तो सहज ?

ती हूं.

तो वळचणीला पक्षीही एकमेकांना सहजच भोगून घेतात.

ती तसं चाललंय तुझं ?

तो नाही.

ती कां ? शिरी, व्यवस्था बदलणाऱ्यानं आधी स्वतःच बदलायला हवं.

तो हे न बदलणाऱ्यांचं तत्त्वज्ञान.

ती असेल, पण मातीचा आधार आहे त्याला.
शब्दांच्या वराती काढण्यापेक्षा -

तो शिरीन, आपल्या वरातीला मी म्हणून नकार दिला होता. आठवतं.

ती वेदमंत्राच्या घोषात आपलं लग्न व्हायला हवं होतं शिरी.

तो म्हणजे आपलं आभाळ बदललं नसतं ?

ती कदाचित नाही !

तो कदाचित असंही की न बदललेल्या एकाच आभाळाखाली आपण घुसमटत पोरांच्या रांगेमागे स्वतःला ओढत नेलं असतं.

ती शिरी, एकट्यानं पीत असलेल्या 'स्कॉच'पेक्षा ती नशा कदाचित तुलाही आवडली असती.

तो आश्रमशाळेच्या परिसरातील ताडीइतकी ?

ती शिरी !

तो त्यात भडकायचं काय आहे ? माडियांच्या सहवासात आग्रहाखातर पिलेली ताडी ही शिक्षकाच्या सन्मानाची खूण आहे.

ती तुला काय ठाऊक ?

तो शिरी, देहाच्या गरजांवर पांघरुणं घालता येतात. त्यानं नाहीशा होत नाहीत त्या.

ती पण साऱ्याच टिकून राहतात असंही कुठं आहे ?

तो काही ?

ती त्याही कीड लागलेल्या झाडासारख्या पोखरून निघून कोलमडतातच.

तो	निसर्गातील बाबींची अकारण मानवी उपमा करण्याची प्रवृत्ती म्हणून ठीक आहे हे. पण त्या कोलमडण्याचे आपण केवळ साक्षीदार असतो.

ती	पण मी पुरावा आहे.

तो	स्वतःच तयार केलेला.

ती	स्वतःसाठी ?

तो	यस् !

ती	स्वतःसाठी ?

तो	यस्, स्वतःसाठी !

ती	शिरी, तुझ्यासाठी सोडलेल्या घराच्या भिंती ढासळताना आक्रोशून बोलवत होत्या. विना लग्नाच्या बायकोचा नवरा म्हणून जग तुझ्याकडे दारातून बघत असताना मी खिडकीतून जगाकडे बघत होते. एकवेळचा उपवास टळावा म्हणून उसनं मागायला गेल्यावर हेटाळणाऱ्या शेजाऱ्यांच्या उरऱ्या सांत्वनी नजरा झेलत तुझा उंबरठा झिजवणाऱ्या देणेकऱ्यांना तोंड देत होते. ते स्वतःसाठी ?

तो	नाही. ते माझ्यासाठीही होतंच. परंतु तुझी ती "तुडवून टाकीन पायदळी ही निखाऱ्यांची अख्खी बाग अन् आगीची फुले मी वेचून आणीन, अशा परड्या तुझ्या दाराशी ठेवून, काळे भोर आभाळ मी खेचून आणीन" ही जिद्दही तुला पूर्ण करून बघायची होती. पूर्ण करून बघते आहे अशी भासावी अशी ही जिद्द होती तुझी. तुझी जिद्द म्हणजे गाजराची पुंगी ठरली. वाजली नाही म्हणून मोडून खाल्लीस.

ती	पण आपली एकांतकाळची रेशीमभेट प्यायलेल्या जमिनीला भरून आलेल्या काळ्याशार आभाळाचा चेहेरा होता तेव्हाच्या प्रसंगी -

तो	तेव्हा त्या प्रवासपेरणीचा अंकुरोत्सव आपण साजरा करू असे मी म्हणालो होतो, मात्र तुला तेव्हाही सोनचाफ्याचे तळे तुडवून जाण्याचेच डोहाळे होते.

ती	पण पंख रक्ताळले तरी आभाळपंथी डोळे जमीन शोधत नसतात असे तूच म्हणाला होतास, झरे खोदत नसतात घोटघोट महापूर पिणाऱ्या चोची नद्या आटल्या तरी हे तुझ्यापासूनच शिकले.

तो	म्हणूनच हे तळे तुडवून गेलीस त्याचे या तळातल्या हंसांना काहीच वाटले नाही.

ती	मग नपुंसक प्रदेशातून हे बेट इथवर ढकलत आणले, असे वाटण्याचे प्रयोजनच नाही.

तो	तरीही रिकाम्या पिंजऱ्याच्या हलत्या सावल्याच तेवढ्या संध्याकाळी वेचून काढतांना परदेशी वाटतेच.

ती	त्याला इलाज नाही. शिरी, शक्य झालेच तर पक्ष्यांच्या जमाती अंकुरल्याच कां नाहीत इथे याचा शोध घेण्यासाठी एखादी प्रयोगशाळा स्थापावी आणि प्रयोगांती माती अंकुरलीच तर पक्ष्यांचे अख्खे झाड लावावे माझ्या कब्रीवर एवढीच काय ती विनंती आहे.

तो	नजरबंदी आहे शिरीन ही. रात्र वितळली आणि घागर निथळली तरी रात्र काळीच हवी या काठावर, याचे भान हरपू नये इतपतच धुंद व्हावे अशा प्रवाश्यांच्या सोबतीत क्षण थिजतील.

ती	तरी तू कुठेही संचारणारा मुक्त सूर्यच असशील. प्रश्न आमच्यासारख्या एका क्रूसाचे वजन वाहून नेणाऱ्या कोटी कोटी खांद्यांचा आहे.

तो	हे युगायुगाचे सांधे जुळतच नाहीत ? अजूनही पैलतीरी काऊ कोकतच आहे, असेच ना ?

ती	शिरी, आता त्यातल्या कशाचीच पर्वा नाही.

प्रवासीही मी बदलले आहेत. तळहातावर डोळे काढून घेतलेल्या आदिवासी प्रवाश्यांच्या रांगेत माझी आश्रमशाळा घेऊन मीही सामील झाले आहे. शिरी, आठवतं तुला ? तू म्हणत होतास, "आता कुठल्याही मध्यरात्री तुझा गजरा पुरता विरकटलेलाही नसेन, आणि मित्रांची छावणी अचानक आवाज देईल."

तो आठवतं - आठवतं, पण शिरीन, पण -

ती पण - ?

तो सूर्यफुलाबरोबर फिरणे तुला जमलेच नाही.

ती शिरी, आता स्वतःच सूर्यफूल होऊन फिरायला काय हरकत आहे ?

तो आपणच आपल्या भोवती फिरायचं.

ती अं. हं. सूर्याभोवती !

तो शिरीन, आभाळाचा एकच तुकडा जपायला शिकली असतीस तर एकाच सूर्याभोवती दोघेही असे एकएकटे फिरलो नसतो.

ती शिरी, फिरता फिरता कदाचित पुनः....

तो एकत्र फिरायला लागू असंच नां ?

ती पण, असंही नाही.

तो चळवळीतल्या पुढाऱ्यांना सत्ताप्राप्तीचे दिवस आले म्हणून म्हणते ?

ती नाही. तुम्हा चळवळीतल्या पुढाऱ्यांना स्त्री चळवळीचे आकलनच नाही म्हणून. दुधानं बांधल्या गेलेली स्त्री समजूनच न घेता स्त्रीवर भाषण ठोकणारे तुम्ही. ती स्त्री आहे हे विसरता.

तो पण म्हणूनच प्रत्यक्ष सहभागापासून सूट.

ती ती देऊन वर पुरुषी अहंकाराचे उपकार.

तो कुदळफावड्यांच्या हालचालीचे आवाज आता गर्भार आहेत यावरून तरी......

ती असे वरदान घेऊन जगणाऱ्या आंबराया आमच्या गावात नाहीत.

तो खरे तर फसव्या शब्दार्थांचे कारखानेच जमीनदोस्त करावे लागतील.

ती आपण त्यात फसून निघालो म्हणून ? शिरी, फसव्या शब्दांनाही एक ऊब असते. स्वतःत हरवून घेण्याचं सामर्थ्य असतं. तेवढंही तू देऊ शकला असतास शिरी, शब्दांच्या एवढ्या व्यवहारात तर या नव्या प्रवासासाठी डोळे उघडावे लागलेच नसते, असचं नां ?

तो नाही शिरीन, शब्दांचा अर्थच कळत नव्हता तेव्हांची ती आपली देवघेव. नकळत कर्जबाजारी होत गेल्यासारखी. शब्द आणि ओठ फसवे असतात हे कळू लागलं ते देवघेवीच्या वजाबाकीनंतर. त्या नंतर स्वतःची फसवणूक तुला हवी होती. ती करू शकत नव्हतो. अंतर पडत गेले. ते बुजवू शकत नव्हतो. रस्त्यावरच्या गड्ड्यांच्या विहिरी झाल्या. माझ्या पक्षांना त्यात पोहायचे नव्हते.

ती समुद्र पुरुषा, तुझ्या उंचीचे डोंगर शोधून तरी सापडले कां ?

तो नाही.

ती आकाशनक्षत्रांचा थवा घटकाभर मिळावा आणि आधाशासारखे प्राशावे अस्वस्थ मिलन या मातीने असे कधीचेच चालले आहे

तो आता तर आकाश नक्षत्रांचा थवाही वारल्याचे कळले आहे.

ती एकमेकांनी एकमेकांचे डोळे झाकून आणि कुठल्यातरी आंधळ्या ठराविक माणसाच्यांच डोळ्यावर पट्टी बांधल्याचे सांगावे तशा इथल्या पारंब्या, मूळ धरणाऱ्या

तो पर्वत उंचीची शिखरेही उभ्या उभ्याच कोसळत चालली आहेत.

ती नाही शिरी, पंख काढले तरी आभाळपंथी डोळे जमीन शोधत नसतात हे विसरले नाही अजून.

तो अटळ आहे शिरीन ते. तुझ्या शरीरोत्सवाचा सोहळा डोळे भरून एकांती अनुभवावा म्हणून याचकाचे गोत्र घेऊन हिंडलो तेव्हा फार बरं वाटलं होत. परंतु..

ती सोनचाफ्याची सोनफुले वेचताना काटे बोचणारच नाहीत म्हणून मी देखील बेसावध होते शिरी.

अनुक्रमणिका

तो   आता या मातीवर अचानक टारून आलेल्या काटेरी जखमफुलांनीच झोळी भरणे प्राप्त आहे

ती   पण शिरी, सोनचाफ्याच्या फुलांची सल नाही म्हटले तरी उरतेच पापण्यांच्या आडोशाला

तो   पण शिरीन, माझा रेशमाचा गुंता तुला अचानक कमळवेलाचा वाटावा आणि दिशोदयाच्या आधीच तू पाण्याखाली संसार थाटावास असे गुंतण्यासाठी आपण गुंतत गेलोच नसल्याचे मला अजूनही स्मरते.

ती   कुठून येतात या बगळ्यांच्या रांगा ?
सार्‍या प्रदेशभर सावल्या दौडून जातात.

तो   पण ओंजळीची मूठ करून जपून ठेवतो म्हटले बगळ्यांचे काही पंख तर मात्र वेड्यांच्या इस्पितळातील जमीनच तेवढी पायांना लागते.
शिरीन, ओंजळीने जपण्याचे शिकतेस कां अजूनतरी ?

ती   शिरी, तुला शब्दच फुटत रहावेत या अबोल सायंप्रकाशातही, आणि दिवे मालवून गेल्यावरही मी एकांतवासीच व्हावे हा शाप भोगावा तरी किती. माझ्या भिंतींनाच आता आक्रोश फुटू लागला आहे

तो   आपल्याच लाटा आपणच बांधून ठेवणार्‍या समुद्रासारखी तू, शिरीन, माय् शिरीन,

ती   शिरीऽ शिरीऽ .....

तो   किनार्‍यापर्यंत लाटा पोचू दिल्या असत्या तर ओल्या वाळूची घरटी तरी बांधता आली असती.

ती   शिरी.....


तो   शिरीन......

ती   आपलं नेमकं काय बिनसलं होतं रे ?

तो   खरंच, काय बिनसलं होतं ? प्रश्नपर्वात अशा असंख्य प्रश्नांची चळतच असते शिरीन. प्रश्नपर्वातील इतर प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी त्यातलं नेमकं हेच विसरणं भाग असतं. पावसाळी पाण्यात हरवलेल्या कागदी नावांचा विचार सोडून द्यावा, तसं.....

■ ■

श्रीपाद भालचंद्र जोशी, कृष्णकुंज, खरे टाऊन, धरमपेठ, नागपूर ४४००१०



स्टेशन

परागं घोंगे

एका आडगावातील निर्मनुष्य रेल्वे स्टेशनचा फलाट. संपूर्ण फलाटावर एका रंग उडालेल्या जुनाट बाकाखेरीज काहीही नाही. त्याच बाकावर एक वृद्ध माणूस बसलाय्. जणू युगानुयुगापासून तसाच बसलाय्. पूर्णपणे स्वतःत हरवलेला. आपल्या अवतीभवती काहीही घडणार नाही ह्याची जाणीव असल्यासारखा ढिम्म. निर्विकार.

मळकेसे कपडे घातलेला पंचविशीचा तरुण पोर्टर फलाट झाडतोय्.

आभाळभर पाऊस दाटून आलेली कुंद संध्याकाळ.

वृद्ध	कशाला झाडतोयस् उगाच संध्याकाळचा ?
पोर्टर	नको झाडू ?
वृद्ध	झाड हवं तर.
पोर्टर	*(थांबतो)* जाऊ द्या.
वृद्ध	काय झालं ?
पोर्टर	कंटाळा आलाय्. तुम्हाला नाही येत नुसतं बसून रहाण्याचा कंटाळा ?
वृद्ध	येतो ना.
पोर्टर	मग झाडा वघू सगळा फलाट.
वृद्ध	नको.
पोर्टर	कां पण ? हात मोडतील तुमचे ?
वृद्ध	नाही मोडणार. पण तूच झाड. तू हमाल आहेस.
पोर्टर	हमालाचं काम असतं झाडलोट करणं ?
वृद्ध	मला काय ठाऊक ?
पोर्टर	मग झाड का म्हणालात ?
वृद्ध	मी कुठं म्हणालो ? तूच तर आपणहून सगळी कामं स्वतःच्या मागं लावून घेतली आहेस.
पोर्टर	असू द्या. त्यानं वेळ बरा जातो.
वृद्ध	पण मला वेळ घालवायचाच नाही मुळी.
पोर्टर	मूर्ख आहात झालं ! उठा. तुमचं बाकडं साफ करून टाकतो.
वृद्ध	असू दे. कंटाळा आलाय उठायचा. एरव्हीही पाउस विस्कटूनच टाकणार आहे सारं.
पोर्टर	कशावरून ?
वृद्ध	वास बघ ना सुटलाय् मातीचा. नि गारठाही अंमळ वाढलाय् हवेतला.
पोर्टर	पाऊस सुरू झाला तर बसून राहू नका उघड्यावर मूर्खासारखे. आत जाल. *(निघून जातो)*

(वृद्ध तसाच बसलेला. जरा वेळानं एक स्त्री येते. साधारण तिशी उमटलेली. तिच्या हाती एक महागडी सुटकेस आहे. बावरल्यासारखी ती संपूर्ण फलाट भटकून येते. बाकावर बसलेल्या वृद्धाखेरीज तिथं कुणीही नाही, हे तिच्या लक्षात येतं. गार वाऱ्यानं वृद्धाला जरा डुलकी लागलीय्.)

स्त्री	अहो..... शुक, शुक..... *(चुटक्या वाजविते)*
वृद्ध	*(त्रासिकपणे)* कोण ? काय आहे ?
स्त्री	आता किती वाजताची गाडी आहे ?
वृद्ध	मला काय ठाऊक ?
स्त्री	कमाल आहे. तुम्ही गाडीची वाट बघताय् नं ?
वृद्ध	कुणी सांगितलं ?
स्त्री	नाही...... म्हणजे मलाच तसं वाटलं.
वृद्ध	तुम्हाला चुकीचं वाटू शकत नाही का ?
स्त्री	वाटू शकतं की.
वृद्ध	मग ?
स्त्री	मग काय ? एवढा तोरा कशापायी ? साधं सौजन्यानं बोलता येत नाही तुम्हाला ?
वृद्ध	पण कां दाखवावं मी सौजन्य ? माझी झोपमोड केलीत तेव्हा ?
स्त्री	अहो, पण बोलून चालून मी बाईमाणूस. ह्या एवढ्या फलाटावर तुमच्याशिवाय कुणीही नाही. मी कुठं चौकशी करावी ?
वृद्ध	पण मी म्हणतो चौकशी करावीच कशासाठी ? मुकाट्यानं वाट बघावी.
स्त्री	रानटी आहात अगदी. साधी माणूसकी नाही तुमच्यात.
वृद्ध	चार दिवस जरा राहून बघा इथं. तुम्हीदेखील व्हाल रानटी.
स्त्री	मी कशाला राहतेय् इथं ? गाडी आली की मी आपली जाणार आपल्या वाटेनं.
वृद्ध	*(नुस्ताच कुत्सितपणे हसतो)*
स्त्री	काय झालं हसायला ?
वृद्ध	गाड्या थांबत नाहीत इथं.
स्त्री	*(किंचाळते)* काऽ य ?
वृद्ध	*(ठामपणे)* गाड्या थांबत नाहीत इथं !
स्त्री	मग ?
वृद्ध	मग काय ? *(पोर्टर येतो)*
स्त्री	*(कमालीची घाबरलेली)* अहो...... अहो साहेब.
पोर्टर	*(गोंधळलेला अवतीभवती बघतो)* मला म्हणालात ?
स्त्री	हो तुम्हालाच.
पोर्टर	*(खूष होतो. आनंदानं)* काऽ य म्हणताय ?
स्त्री	गाड्या खरंच थांबत नाहीत का हो इथं ?
पोर्टर	नाही थांबत. कां ?
स्त्री	*(बावचळलेली)* पण मग तुम्ही काय करता इथं ?
पोर्टर	मी होय ? मी सगळंच करतो की. म्हणजे हा फलाट झाडतो. गाडीची वेळ झाली की घंटी वाजवितो. गाडी आली की ग्रीन सिग्नल देतो
स्त्री	अरे वा !
पोर्टर	आवडलं ?
स्त्री	फारच. ह्या स्टेशनचे मालक आहात तुम्ही ?

पोर्टर हो मालकच म्हणाना. खरं म्हणजे नौकर नाही म्हणून मालक. काय ?

स्त्री म्हणजे तुम्ही रेल्वेचे एम्लॉई नाही ?

पोर्टर छे हो. त्याचं काय आहे, हे स्टेशन वसलं ना ? तेव्हा एक स्टेशनमास्तर नेमला होता इथं. मी नव्हतो इथं त्यावेळी पण ऐकलंय् काहीवाही त्याच्याविषयी.

स्त्री काय ऐकलंय ?

पोर्टर गाडीखाली जीव दिला म्हणतात त्यानं.

स्त्री कां पण ?

पोर्टर कुणास ठाऊक. कुणालाच काही ठाऊक नाही त्याविषयी.

स्त्री कदाचित इथल्या एकटेपणाला कंटाळला असेल.

पोर्टर असेलही.

वृद्ध *(स्वतःशीच)* कंटाळलाच असणार !.......एकटेपणाला कंटाळतो माणूस..... रात्री अपरात्री केव्हाही गाडीच्या शिट्ट्या ऐकू येतात. धडधडत जाणाऱ्या गाडीमुळे सगळा फलाट जिवंत झाल्यासारखा हादरू लागतो..... आणि क्षणांतच सारं संपून जातं..... सारी कंपनं विरून जातात. सभोवताल उरतो एक थंड निर्जीव काळोख..... मग आपल्याच घराशी झालेली आपली ताटातूट आठवते. आपला म्हणून मानलेला कुठलातरी दूरचा गाव आठवतो. आणि ह्या विशाल फलाटावर विलक्षण परकं झाल्यासारखं वाटू लागतं.

अंतःकरणाला दुःखाचे झरे लागतात, नि डोळ्यांतून आठवणी पावसासारख्या बरसू लागतात.

जगण्यातला सगळा जीवच निघून जातो......

स्वतःला संपवून टाकण्याची सनातन उर्मी उरात दाटून येते..... आणि पुढच्याच येणाऱ्या गाडीखाली स्वतःला झोकून देण्याचा निश्चय मनातल्या मनात बळकट होत जातो....... स्टेशनमास्तरचंही असंच झालं असणार.

(क्षणभर कुणीच काही बोलत नाही)

पोर्टर झालं असेल. कदाचित असंही झालं असेल. *(जरा वेळानं)* पण त्यामुळे एक मात्र बरं झालं...... *(स्त्री प्रश्नार्थक नजरेनं बघते.)*

त्यानंतर काही रेल्वेनं कुणाला इथं नेमलं नाही.

त्यानंतरही काही काळ गाड्या इथं थांबत राहिल्यात. क्वचितच वाट हरवलेला एखादा प्रवासी इथं उतरे...... गाडीची वेळ झाली की मी आपला फलाटावर येऊन उभा राहत असे.

अशातच एक दिवस हा म्हातारा उतरला गाडीतून. विनातिकीटच आला होता इथवर. सारं काही हरवून आल्यासारखी निर्जीव व्यथा होती डोळ्यात. फक्त शरीरानं उतरला होता इथं. मन कुठंतरी प्रवासातच हरवून बसला होता.

मी विचारलं, "कुठून आलास ?" तर "ठाऊक नाही." म्हणाला.

म्हटलं, "तिकीट कुठाय् ?" "हरवलं." म्हणाला. म्हटलं "कुठं निघालास ?" पण त्याला मुळी जायचंच नव्हतं कुठं. थांबला इथेच. आठ दिवस मला अडचणच झाली त्याची. पण मग हळूहळू मलाही सवय झाली.

आणि अचानक एक दिवस हा थांबाच रद्द झाला. गाड्याच इथं थांबेनाशा झाल्यात. प्रवासी येईनासे झालेत...... मग ह्या स्टेशनची निगा राखण्याची जबाबदारी अधिकच नेटानं लादून घेतली मी स्तवःवर *(शांतता)*

स्त्री राह्ता कुठं तुम्ही ?

पोर्टर (दूरवर बोट दाखवितो) ती पलिकडे झोपडी दिसतेय् ? तिथं राहतो आम्ही.
स्त्री स्वतःचं घर नाही तुम्हाला ?
पोर्टर कां ती झोपडी आहे, हा फलाट आहे.
स्त्री पण छप्पर कुठाय त्यावर ?
पोर्टर उडालं एका वादळात..... कां ?
स्त्री नाही विचित्र वाटतयं जरा.
पोर्टर आम्हाला नाही वाटत तसं.
स्त्री पण इथंच कां राहता तुम्ही ?
पोर्टर ह्या फलाटाची देखभाल कोण करणार मग ?
स्त्री पण तुमच्यावर कुणी लादलीय ही जबाबदारी ?
पोर्टर कुणीच नाही.
स्त्री मग ?
पोर्टर मग काय ?
स्त्री पण कधी इथून सुटका करून घेण्यचा विचार येत नाही तुमच्या मनात ?
पोर्टर आला होता. पळूनच गेलो होतो सारं सोडून. कंटाळलो होतो इथल्या सुस्त आणि मुर्दाड जिंदगीला.
स्त्री पण मग परत कां आलात ?
पोर्टर मातीची ओढ ! एक दिवस गावातला गणपती आला स्वप्नात. म्हणाला, "चल पोरा, गांव वाट बघतंय्. बस्स. दुसऱ्या दिवशी परतलो. ह्या फलाटाची अशी ओढ आधी कधीच वाटली नव्हती. ह्या मातीशी जडलेलं हे नातं पूर्वी कधी इतक्या प्रकर्षाने जाणवलं नव्हतं.....तेव्हापास्नं हा फलाट माझाच होऊन बसलाय्. आता त्याला सांभाळण्याखेरीज काही करण्याची इच्छाच उरली नाही. हे बंध कुणी लादले नसतात, पण ते तुटत नाहीत इतकं नक्की. *(शांतता.)*
पण तुम्ही इथं कशा ? नि अशा ह्या आडगावांत कुठून आलात ?
स्त्री निघाले तेव्हा घरूनच निघाले होते.
पोर्टर म्हणजे ?
स्त्री नीटसं आठवत नाहीय् आता......
पण गात्रात एक विलक्षण उन्माद संचारला होता...... उत्साहातच बॅग भरली नि घरं सोडलं. निघाले वेड लागल्यासारखी...... सारखं कुणीतरी खुणावत होतं पुढे...... नि मीं भारल्यासारखी मागोमाग भटकत होते रानोमाळ. मध्ये किती दिवस उलटलेत कुणास ठाऊक. किती गाड्या बदलल्यात; किती पायपीट केली, काऽ ही लक्षात नाही आता. मग आंतून, अगदी अंतरंगातून कुणीतरी आवाज दिला, "कुठं निघालीस ?" नि खाडकन भानावर आले. समोर बघते तो तुमचा फलाट ! म्हटलं, देवच पावला. येणारी पहिली गाडी गाठावी नि घरची वाट धरावी...... पण इथं तर गाड्याच थांबत नाहीत.
पोर्टर चकव्यानं भूल घातली असणार तुम्हाला.
स्त्री छट् माझा विश्वास नाही असल्या भाकड गोष्टींवर.
पोर्टर मग तुम्ही इथं कशा ?
स्त्री खरंच. तो प्रश्नच आहे.
पोर्टर चकवा घालतो भूल. फरपटत नेतो लांब. नि त्याचं समाधान झालं की देतो सोडून कुठंतरी.
स्त्री कशावरून ?
पोर्टर ठाऊक आहे मला...... बरंय येतो गाडीला झेंडी दाखवून. वेळ झालीय्.

स्त्री	कसं कळतं हो वेळ झाल्याचं ?
पोर्टर	सवय झालेयू ना. *(जातो.)*
	(जरा वेळ कंटाळवाणी शांतता.....मग धडधडत गाडी निघून गेल्याचा आवाज.)
स्त्री	ह्या निर्मनुष्य फलाटावर केवढा मोठा वाटतो नं गाडीचा आवाज ?
वृद्ध	मला नाही वाटत. मला एवढाच आवाज ऐकायची सवय झालीयू.
	(स्त्री उगाचच इकडे तिकडे भटकून येते)
स्त्री	तो समोरचा निमुळता रस्ता कुठं जातो हो ?
वृद्ध	*(तुटकपणे)* गावात.
स्त्री	किती दूर आहे गावं इथून ?
वृद्ध	बरंच दूर आहे.
स्त्री	नि शहर ?
वृद्ध	शहराचाा तर मागमूसही नाही आसपास.
स्त्री	मी शहरातली राहणारी बरं का ?
वृद्ध	दिसतंय ते.
स्त्री	पोर्टर म्हणतो चकव्यानं भूल घातली मला. इथवर फरपटत आले मी त्याच्या मागोमाग.
वृद्ध	शक्य आहे.
स्त्री	तुमचा विश्वास आहे ह्यावर ?
वृद्ध	अविश्वास नाही.
स्त्री	का ?
वृद्ध	मला नाही आला असला अनुभव कधी.
स्त्री	पण मला आलायू ना. खोटं बोलतेयू कां मी ?
वृद्ध	आला असेल. पण तो मला पटवून देण्याचा अट्टाहास कशापायी ?
स्त्री	तुम्ही ना विक्षिप्त आहात अगदी.
वृद्ध	ठाऊक आहे मला.
स्त्री	असे तुसड्यासारखे वागाल ना लोकांशी तर कुत्रं विचारणार नाही तुम्हाला. तो पोर्टर बघा कसा भडाभडा बोलत होता स्वतःविषयी.
वृद्ध	तो आहेच तसा.
स्त्री	नि तुम्ही असे. घुमे.
वृद्ध	कुणीच कुणासारखं नसतं. आपण आपल्याच सारखे असतो. नि तेच बरं असतं.
स्त्री	गंमतच आहे.
वृद्ध	गंमत कसली ?
स्त्री	एवढ्या मोठ्या स्टेशनवर तुम्ही दोघंच राहता. एक भडभड बोलणारा, नि दुसरा नुसता मख्खपणे बसून राहणारा.
वृद्ध	तेच बरं आहे. बोलणाऱ्याला अनायसे ऐकणारा आहे, नि ऐकणाऱ्यासाठी वटवट करणारा.
स्त्री	*(मंद हसते)*
वृद्ध	काय झालं हसायला ?
स्त्री	इथल्या रुळांसारखी समांतर आयुष्ये आहेत तुमची.
वृद्ध	रूळ समांतर नसते तर काय झालं असतं ?

स्त्री	मिसळले असते नां एकमेकांत कधीतरी.
वृद्ध	पण मग गाडीचं काय झालं असतं ?
स्त्री	अगोबाई. हे लक्षातच आलं नाही माझ्या.
वृद्ध	विचार उथळ असले म्हणजे असं होतं. नेमक्या महत्त्वाच्या गोष्टीकडेच दुर्लक्ष होतं.
स्त्री	बघता बघता आपली बऱ्यापैकी ओळख झाली की.
वृद्ध	मला नाही वाटत तसं.
स्त्री	तुम्ही कृपा करून असं नका हो बोलू तोडून. आता रात्र होईल थोड्यावेळात..... मला भीती वाटतेय्.
वृद्ध	हो. मग हा सगळा परिसर पूर्णपणे निर्मनुष्य होईल.
स्त्री	मला घाबरवू नका हो.
वृद्ध	रात्रभर हा परिसर थांबलेल्या श्वासासारखा निर्जीव होऊन जातो.
स्त्री	मला फक्त आजची रात्र आसरा द्याल ?
वृद्ध	मी कोण आसरा देणारा ?
स्त्री	मी काय करू ?
वृद्ध	ते मी कसं काय सांगू ?
स्त्री	फक्त आजची रात्र घालवता येईल अशी एखादी जागा नाही गांवात ?
वृद्ध	एक देऊळ आहे.
स्त्री	*(आनंदानं)* कुणाचं ?
वृद्ध	कुणाचं का असेना तुम्हाला काय त्याच्याशी ? चांगला प्रशस्त सभामंडप आहे तिथं. नि पाऊस अधिकच वाढला तर गाभाराही बऱ्यापैकी मोठा आहे. तिथं होईल तुमची सोय.
स्त्री	तुम्ही कराल ?
वृद्ध	छट्. ती तुमची तुम्हालाच बघावी लागेल.
स्त्री	पण पुरेसा आडोसा आहे ना तिथं ?
वृद्ध	ते हवामानावर अवलंबून आहे.
स्त्री	म्हणजे ?
वृद्ध	हवामान म्हणजे ठाऊक नाही तुम्हाला ?
स्त्री	तसं नाही हो. भांबावलेय् मी. जरा नीट सांगता का समजावून ?
वृद्ध	गावात पश्चिमेला एक छोटी टेकडी आहे. तिथे आहे हे देऊळ. सहसा तिथं काही त्रास नसतो. फक्त कधी कधी वारा वारा तेवढा भूतासारखा भणभणत असतो. अशावेळी वाघळही सभामंडपात थैमान घालतात. पण गाभाऱ्याचं दार घट्ट लावून घेतलं की मग भीती नसते अजिबात.
स्त्री	छान ! अशा जागी माझी व्यवस्था करणार तुम्ही ?
वृद्ध	नाही, असं करतो एखादा महाल बघतो तुमच्यासाठी रात्रीपुरता
स्त्री	फार क्रूर आहात तुम्ही.
वृद्ध	मी कसा आहे हे मला पुन्हा पुन्हा सांगण्याची गरज नाही.
स्त्री	हे बघा हा सगळा परिसर माझ्यासाठी नवखा आहे.
वृद्ध	*(काहीच बोलत नाही)*
स्त्री	तुमचा विश्वास नाही माझ्यावर ? स्त्रियांविषयी सहानुभूती नाही वाटत तुम्हाला ?
वृद्ध	का वाटावी ?
स्त्री	कां ? का वाटू नये ?

वृद्ध	कारण स्त्रिया केसानं गळा कापण्यात पटाईत असतात.
स्त्री	*(संतापाने)* शी ! स्त्रीकडे इतक्या संशयी नजरेनं बघता तुम्ही ?
वृद्ध	नाही. स्त्रीकडे इतक्याच निरामय नि निरोगी नजरेनं बघतो मी.
स्त्री	दुर्दैवी आहात. स्त्रीचं प्रेम, वात्सल्य नि समर्पण कधी वाट्यालाच आलं नसणार तुमच्या. आता मला दया येतेय् तुमची *(सहानुभूतीनं)* कां असे कडवट झालात ? कुठल्या अनुभवानं असे भाजून निघालात ?
वृद्ध	*(काहीच बोलत नाही पण विचलित होतो.) (उठतो)*
स्त्री	सांगा ना कशामुळे इतके रूक्ष नि अश्रद्ध झालात तुम्ही ?
वृद्ध	*(सावरून घेत)* अश्रद्ध आणि मी ? काहीतरीच. माझी तर उलट श्रद्धा आहे जीवनावर. म्हणून तर जगतोयू.
स्त्री	जगणं कुठं असतं आपल्या हाती ? जगावं तर लागतंच.
वृद्ध	माझं नाही तसं. ज्यादिवशी वाटेल की आता बस्स झालं, त्यादिवशी झोकून देईन स्वतःला गाडीखाली. गाड्या थांबत देखील नाहीत इथं. फारसा गवगवा देखील होणार नाही. *(जरा वेळानं)* स्टेशनमास्तरच्या वेळेस निदान थोडी चौकशी तरी झाली होती.
स्त्री	भ्याड आहात.
वृद्ध	मी समंजसपणा म्हणतो ह्याला. आपलंच आपल्याला ओझं होऊ लागलं की जावं ह्या वाटेनं. राजमार्ग नसला तरी एक फार समंजस पायवाट आहे ती.
स्त्री	पण पोर्टर ? तो एकटा पडेल नां.
वृद्ध	ते तर अटळ आहे आणि मी कुठं जन्माला पुरणार आहे त्याच्या ?
स्त्री	पण तो तर गुंतलाय फार तुमच्यात.
वृद्ध	पण मी तर मोकळाच आहे ना ?
स्त्री	खोटं बोलताय् तुम्ही.
वृद्ध	तसं समजा हवं तर.
स्त्री	खरंच, कुठलेच बंध नाहीत तुमच्यात ? भावनांचे ? आतड्याचे ? सहवासाचे ?
वृद्ध	नाहीत, अजिबात नाहीत.
स्त्री	कां पण असा अट्टाहास ?
वृद्ध	कारण संबंधाच्या गुंतवळीला फक्त दुःखाचीच फळं येतात.
स्त्री	नि असं सुटं, एकाकी राहिल्यानं मिळते दुःखापासून मुक्ती ?
वृद्ध	*(विचलित)* नाही.
स्त्री	मग ?
वृद्ध	मग काय ? तुम्हाला कुणी सांगितल्या आहेत नसल्या चौकशा ? मी करतोय का तुमच्या आयुष्यात लुडबुड ?
स्त्री	सॉरी. *(शांतता)*
वृद्ध	पाऊस झालायं कुठतरी.
स्त्री	कशावरून ?
वृद्ध	वारा बघा ना सुटलायू गार.
स्त्री	*(काळजीनं)* पाऊस फार होतो का इकडे ?
वृद्ध	एकदा कोसळायला लागला की कोसळतो पिसाटासारखा.

स्त्री	मग काय करता तुम्ही ?
वृद्ध	करणार काय कपाळ ?
स्त्री	मघापासून मला वाटतंय्.
वृद्ध	काय ?
स्त्री	तुम्हाला कुठतरी बघितलंय् मी.
वृद्ध	शक्यच नाही. गेल्या कित्येक वर्षात हे स्टेशन सोडून बाहेर पडलेलोच नाही मी.
स्त्री	पण त्यापूर्वी ?
वृद्ध	त्यापूर्वीचं मला काही आठवत नाही आता.
स्त्री	मग मलाच कां ओळखीचे वाटताय् तुम्ही ?
वृद्ध	तुम्ही मुद्दाम खोटं बोलताय्.
स्त्री	व्हॉट ? मी कशाला खोटं बोलेन ?
वृद्ध	कारण तुम्हाला माझी सोबत हवीय्. जमल्यास माझी मदतदेखील. कारण तुम्ही एकट्या आहात. सभोवताल चिटपाखरूही नाही. मुसळधार पावसाची शक्यता आहे. तुम्हाला भीती वाटतेय्. म्हणून तुम्ही स्वतः बोलताय् धडाधडा. नि मलाही बोलायला भाग पाडता आहात...... चतुर आहात.
स्त्री	आणि तुम्ही ? तुम्ही कुटिल आहात कुटिल. थेट दुसऱ्याच्या मनात डोकावता.
वृद्ध	करावंच लागतं तसं. नाहीतर फाऽरच फसगत होते. माणसं भयंकर ढोंगी असतात. कध्धी खरं बोलत नाहीत. नुसता आव आणतात आपुलकीचा, मायेचा, ओलाव्याचा आणि स्वार्थ संपताच लाथाडून मोकळे होतात. सगळा चोख नि मतलबी व्यवहार. कुठं आतड्याचे पीळ नाहीत, रक्ताची नाती नाहीत आणि आपुलकीच्या रेशीमगाठी नाहीत......

मासळीचा वास आवडतो तुम्हाला ? मला आवडतो. दुर्गंधच असावा तर असा राजरोस. कुठलाही आडपडदा नसलेला. स्वच्छ सूर्यप्रकाशात धीटपणे टिकू शकणारा. पण माणसाच्या जातीला दुर्गंध येतो स्वार्थाचा. माणूसगंध म्हणतो मी त्याला. तो नाही करता येत सहन. म्हणून मी गुंतत नाही कुणांत. नकोय् मला आता कुठलाच गुंता. कारण जिथं बेभान होऊन गुंतावं तिथंच नेमकी फसवणूक होते. म्हणून आताशा फार भानावर असतो मी...... कळलं ?..... निघा आता..... त्या निमुळत्या पायवाटेनं सरळ चालत जा.

(स्त्री भयभीतपणे बॅग उलचते नि निघून जाते. वृद्ध पुन्हा सुस्तपणे बसून राहतो ? जरा वेळानं स्त्रीची मोठी किंकाळी ऐकू येते. पोर्टर गर्भगळीत झालेल्या स्त्रीला सावरून घेऊन येतो: त्यानं एका हातात तिची बॅग धरलीय. नि दुसऱ्या हातानं तिला घट्ट धरून ठेवलय्.)
पोर्टर	कुठं निघाला होतात ?
स्त्री	*(भयंकर घाबरलेली. तिच्या तोंडून शब्द फुटत नाहीय्.)* मी.... मी....
पोर्टर	पाणी हवंय ?
स्त्री	नको. मला आता सुटका हवीय इथून.
पोर्टर	पण ते आता कसं शक्य आहे ? आता तर रात्र होऊ लागलीय्.
स्त्री	म्हणूनच मला आता सगळ्याचीच भीती वाटू लागलीय्. तुमचीदेखील.
पोर्टर	माझी ? पण तुम्ही एवढ्यानं ओरडलात कशाला ?
स्त्री	*(वृद्धाकडे निर्देश करून)* त्यांनी सांगितलं निघून जायला. म्हणाले निमुळत्या पायवाटेने सरळ जा.
स्त्री	गावात पश्चिमेला एक छोटी टेकडी आहे. त्यावर कुणाचंतरी देऊळ आहे.
पोर्टर	अरे व्वा. त्या देवळात केली होती तुमची सोय ? भाग्यवान आहात.

स्त्री ती कशी ?

पोर्टर सहसा कुणाला तिथं जायला सांगत नाही ते. फार जागृत देवस्थान आहे.... पण जाऊ द्या तुमचा विश्वास नाही बसायचा त्यावर.

स्त्री बसेल नां. एवढं तुम्ही सांगताय् तर असेलच जागृत.

पोर्टर पण चकव्यानं भूल घातली सांगितलं तेव्हा कुठं बसला विश्वास ?

स्त्री पण आता पटतंय ना हळूहळू सारं.

पोर्टर आणि त्यांनी जायला सांगितलं ते तरी कुठं पटलं तुम्हाला ?

स्त्री तसं नव्हे हो. त्यांची पद्धत नाही रुचली मला. फार तुटक नि तोडून बोलतात. विचारलेल्या प्रश्नांची सरळ उत्तरं देत नाहीत. *(वृद्धाकडे बघत)* झोपलेत नां ते ? नाहीतर ऐकतील सगळं.

पोर्टर नाही ऐकणार.

स्त्री कां ?

पोर्टर त्यांना रस नाही त्यात.

स्त्री कशात ?

पोर्टर आपल्याविषयी कोण काय बोलतंय हे ऐकण्यात.

स्त्री कां पण ?

पोर्टर अहो नाही म्हणून नाही. फारच चौकस आहात बुवा तुम्ही.

स्त्री *(काकुळतीनं)* कृपा करून तुम्हीही त्यांच्यासारखं नका हो बोलू.

पोर्टर मी कुठं त्यांच्यासारखं बोलतोय ? खरं म्हणजे मी त्यांचा विचारच करत नाही फारसा. तुम्ही उगाच फार विचार करताय् त्यांचा.

स्त्री शक्य आहे.

पोर्टर पण तुम्ही ओरडलात कशाला ?

स्त्री मी बघितलं त्याला. नि अचानक खूऽप भीती वाटू लागली मला.

पोर्टर कुणाला बघितलंत ?

स्त्री ठाऊक नाही.

पोर्टर काय ?

स्त्री म्हणजे तो कोण होता हे ठाऊक नाही. अचानक सावलीसारखा मागून आला नि वेगानं पळत सुटला. मी अडखळून पडले. नि ओरडले जोरात.

पोर्टर त्याचं लक्ष होतं तुमच्याकडे ?

स्त्री नाही.

पोर्टर त्यानं काही केलं तुम्हाला ?

स्त्री नाही..... म्हणजे नाहीच.

पोर्टर मग घाबरलात कशाला ?

स्त्री अहो असं काय विचारताय ? अचानक मागून आला नि पळत सुटला वेगानं.

पोर्टर वेडा आहे तो.

स्त्री कोण ?

पोर्टर तुम्ही ज्याला पाहिलंत तो.

स्त्री *(सुटकेचा निःश्वास टाकते)* असं होय. मी उगाच घाबरले.

पोर्टर तोही त्याच देवळात राहतो रात्रीचा.

स्त्री	काय ?
पोर्टर	पुन्हा घाबरलात ?
स्त्री	नाही..... म्हणजे हो.
पोर्टर	घाबरू नका. काही करत नाही तो. सभामंडपातच निजतो.
स्त्री	पण जेव्हा वारा भूतासारखा भणभणत असतो नि वाघळही सभामंडपातच थैमान घालतात तेव्हा ?
पोर्टर	तुम्हाला कुणी सांगितलं ?
स्त्री	त्यांनीच.
पोर्टर	तेव्हाही तो तिथंच निजतो.
स्त्री	*(घाबरलेली)* अहो पण तो बाहेर..... मी गाभाऱ्यात नि आजच नेमका गाभाऱ्यात आला तर ?
पोर्टर	नाही यायचा.
स्त्री	कशावरून ?
पोर्टर	तो कधीच जात नाही गाभाऱ्यात.
स्त्री	नास्तिक आहे ?
पोर्टर	ठाऊक नाही.
स्त्री	काय ठाऊक नाही ?
पोर्टर	वेडे नास्तिक असतात कां हे ठाऊक नाही.
स्त्री	तसं नव्हतं हो म्हणायचं मला...... पण.कितीही पाऊस असला, वारा भूतासारखा भणभणत असला नि वाघळही थैमान घालत असतील सभामंडपात. तरी तो गाभाऱ्यात जात नाही ?
पोर्टर	नाही. कारण ह्या सगळ्याची सवय झालीय् त्याला.
स्त्री	आणि *(अडखळते)*
पोर्टर	आणि तरीही तुम्हाला असुरक्षित वाटत असेलच तर गाभाऱ्याचं दार आतून घट्ट लावून घ्या.
स्त्री	अरे हो ! असं करायला सांगितलं होतं त्यांनी.
पोर्टर	मग झालं तर. निघा आता.
स्त्री	पण कशानं झाला हो तो वेडा.
पोर्टर	*(कपाळावर हात मारून घेतो)* पुन्हा चौकशा.
स्त्री	नाही. नका सांगू हवं तर.
पोर्टर	सांगायला काही हरकत नाही पण मलाच खरं म्हणजे फारसं ठाऊक नाही त्याविषयी......ह्या स्टेशनवर माझ्यासारखा हमालच होता तो. मी आता करतो तो सगळी कामं पूर्वी तो करायचा. स्टेशनमास्तरवर फार जीव होता त्याचा. पण अचानक स्टेशनमास्तरनं आत्महत्या केली नि तेव्हापासून बिनसलं त्याचं.
स्त्री	*(गर्भगळीत)* म्हणजे त्या वृद्धानं आत्महत्या केली तर तुम्हीही......
पोर्टर	काय ?
स्त्री	काही नाही. असं करता का ? तुम्ही सोडून देता मला देवळापर्यंत ?
पोर्टर	सोडलं असतं. पण आता उशीर झालाय बराच. घाबरू नका. तुम्ही ह्या वाटेनं सरळ जा. फार वेळ नाही लागायचा.
स्त्री	*(घाबरलेली पण चंद्रबळ आणून)* ठ.... ठीक आहे.
पोर्टर	मग मी येतो आता. जराशानं शेवटली गाडीही निघून जाईल. मग मी मोकळा *(पोर्टर निघून जातो. स्त्री अजूनही बावरल्यासारखी तिथेच उभी.)*
वृद्ध	अजून निर्णय होत नाही नां ?

स्त्री	अं ?
वृद्ध	विश्वास नाही ना बसत अजून आमच्यावर ?
स्त्री	नाही हो. तसं नाही. पण भीती वाटतेय. ही अशी विचित्रशी रात्र. ते एकांड देऊळ...... नि त्यात तो वेडा......
वृद्ध	देवावर विश्वास नाही तुमचा ?
स्त्री	आहे ना. पण.....
वृद्ध	पण जेव्हा संकट येतं तेव्हा हा दगडाचा देव काही मदतीला धावून येत नाही कुणाच्या. हो नं ?
स्त्री	तुम्ही फार उद्धटपणे बोलताय् ईश्वराविषयी.
वृद्ध	तुम्हाला परमेश्वराचीही भीती वाटते ?
स्त्री	नाही तर.
वृद्ध	कबूल नका करू हवं तर.
स्त्री	खरं सांगू ? मला इथं फार असुरक्षित वाटतंय्.
वृद्ध	सगळ्याच स्त्रियांना वाटत असतं असुरक्षित. मग त्या कुणाचातरी आसरा घेतात. आणि तो आसराही पुरेसा बळकट वाटला नाही की अधिक कणखर आधार शोधतात.
स्त्री	स्त्रियांविषयी फार दूषित पूर्वग्रह आहे तुमचा.
वृद्ध	असेल. पण तो नाही महत्त्वाचा.
स्त्री	तुमच्यात दोष बरेच आहेत. पण तुम्ही फार ठाम उभे आहात आपल्या जमिनीवर.
वृद्ध	आपल्या असण्याला असंच बळकट समर्थन असावं लागतं.
स्त्री	चुकीचं असलं तरीही ?
वृद्ध	निर्भेळ चूक, नि निखळ सत्य असं काही नसतंच मुळी.
स्त्री	माझ्या सोबत देवळापर्यंत चलाल ? Please !
वृद्ध	तसं नाही येता यायचं मला. पण मी तुमच्या हवाली एक स्वप्न करू शकतो. मग तुम्हीच फार उत्सुकतेनं चालू लागाल देवळाकडे......
स्त्री	म्हणजे ?
वृद्ध	आज पौर्णिमा आहे.
स्त्री	असेल.
वृद्ध	असेल नाही, आहेच. पौर्णिमेला देवळाचा सगळा परिसर चंद्राच्या दुधाळ प्रकाशात न्हाऊन निघतो. समोर नदीचं शांत नि गंभीर पात्र आहे. वर बघितलं की डोळ्यात न मावणारं आकाश दिसू लागतं. नि सभोवताल नजर फिरवली तर चंद्राच्या प्रकाशात उमललेला काळोख आपलं मनच विस्तारत जातो. समुद्राच्या लाटा अंगावर चालून याव्यात नि पायाखालची वाळू अलगद् सरत जावी तशी गात्रं पुलकित होत जातात. कारंजाचे तुषार अंगावर यावेत नि सारं शरीर मोहरून जावं, तसा देहाचा रोम न् रोम निरामय आनंदानं उमलत जातो. आपण एका उत्कट संमोहित भावावस्थेत तरंगू लागतो...... आयुष्यात कधीतरीच असा एखादा प्रफुल्लित; पूर्ण उमललेला क्षण वाट्याला येतो......
स्त्री	*(भारल्यासारखी आपली 'बॅग उचलते)* येते मी.
वृद्ध	या.
	(स्त्री झपाटल्यासारखी निघून जाते. वृद्ध बसलेलाच. जराशानं शेवटलीही गाडी धडधडत निघून जाते. आणि पावसाला सुरवात होते. वृद्ध अविचल बसलेला. पोर्टर धावत येतो. भिजल्यानं जरासा उतावीळ झालेला.)

पोर्टर चला बाबा. पाऊस सुरू झालायू. आजची रात्र कठीण जाणार.

वृद्ध पण ती मात्र देवळापर्यंत नक्की पोहचणार. *(त्याला दूर आता घंटानाद ऐकू येतो. प्रसन्नपणे स्वतःशीच हसतो)*

पोर्टर बाईला पिटाळलंत ?

वृद्ध नाही, तिच्या हाती एक सजल स्वप्न दिलंय मृगजळासारखं. खूऽप दिवसांनी मन धुतल्यासारखं हलकं झालंयू.

पोर्टर काय बोलतायू काही कळत नाही. पाऊस वाढतोयू. चला लवकर. भिजत नका बसू उगाच. *(धावतच निघून जातो)*


(वृद्ध पावसाची तमा न बाळगता हलकेच उठतो. नि एका अतर्क्य उन्मादात कविता बडबडू लागतो.)

वृद्ध
असाच पाऊस यावा अवचित
अशीच व्हावी रात्र निरामय......
दूर देशीचा सखा अचानक
परतूनी यावा कुशीत अलगदू.....

देवळातला नश्वर ईश्वर
भिजुनी पुलकित व्हावा जागृत
तुला दिसावे तुझेच मृगजळ....
तुला दिसावे तुझेच मृगजळ !

(पावसाचा जोर वाढतच जातो. नि भान हरविलेला वृद्ध चिंब न्हाऊन निघतो. आशीर्वादासाठी उंचावलेले त्याचे हात नकळत प्रार्थनामय होतात. नि पावसाच्या भरदार आवाजाला चिरत शंखध्वनी आसमंतात निनादू लागतो......) ■ ■

पराग घोंगे, "पद्मश्री", देवनगर, खामला रोड, नागपूर - ४४० ०१५



चेहरे : आठवणींचे

दिनकर वेडेकर

एक खोली. बरीचशी अंधारलेली. खिडकी, दार वंद, खोलीत एका कोपऱ्यात घरातलं कुणी माणूस मेल्यानंतर लावून ठेवतात तसा दिवा. एकीकडे भाऊ सिगरेट ओढत बसलेयत. दुसरीकडे अनिल. अस्ताव्यस्त. भरपूर प्यायलाय. घुसमटलेली शांतता. ही शांतता असह्य होऊन भाऊ हातातली सिगरेट खूपदा चिरडून विझवतात. उठून खिडकीशी जातात. खिडकी उघडू लागतात. हे सगळं पाहून अनिल तिरीमिरीत उठतो. त्यांच्या जवळ जातो.

अनिल	*(कर्कशपपणे)* कशाला ? कशाला उघडताय ती खिडकी पुन्हा ? ती माणसं डोळे चिकटवून उभी असतील तिथे. बाजूला व्हा. बाजूला व्हा म्हणतो नं-
भाऊ	जीव गुदमरतोय माझा. फिनाईलचा, जळलेल्या मांसाचा वास अजून येतोय इथं. ओकारी होईल असं वाटतंय.
	(खिडकी उघतात. त्याबरोबर अनिल धडपडत दिव्याजवळ जातो. दिव्याभोवती हातांची ओंजळ करतो आणि गदगदून रडू लागतो. भाऊ हे सगळं शांतपणे पहात रहातात.)
भाऊ	कशाला हे सोंग करतोयस आता ?
अनिल	*(चिडून त्यांच्या अंगावर धावून जातो.)* तुम्ही - तुम्ही मारलंत तिला. तडफडत ठेवून, हालहाल करून मारलंत. मी सोडणार नाही तुम्हाला. जीव घेईन मी तुमचा -
भाऊ	अनिल - बस. खूप झालं आता. आणखी तमाशा नकोय, झालं तेवढं पुष्कळ झालं.
अनिल	तुम्हाला उकळ्या फुटत असतील आनंदाच्या ? नाहीतरी तुम्हाला नकोशीच झाली होती ती, म्हणून तर निरोप कळल्यावरही दोन तासांनी आलात.
भाऊ	अगदी लगेच धावत येऊन तरी काय करणार होतो ? ते सगळं पाहवलं नसतं मला. तो विद्रूप चेहरा, ठिकठिकाणी उठलेले फोड -
अनिल	मग तिला कसं वाटलं असेल ? किती तडफडली असेल ती ? जीव जातांना काय झालं असेल तिच्या मनात ? काही कळलंही नाही. मी आलो तेव्हा संपलेलंच होतं सार. नुसतं शरीर उरलं होतं. भाजलेलं, करपलेलं. दारात लोकांची गर्दी आणि पोलीस, अगदी ओठावर आलं होतं की सांगाव ह्या माणसाच्या छळाला कंटाळून शेवटी तिनं - पण मग तुम्ही येऊन मोठ्यानं गळा काढलात -
भाऊ	एखादी सिगरेट आहे तुझ्याकडे ?
	(अनिल क्षणभर अवाक. मग चिडून जवळचं पाकीट त्यांच्याकडे भिरकावतो. भाऊ आधाशासारखे सिगरेट ओढत राहतात. विराम.)
भाऊ	हं चालू दे तुझं -
अनिल	म्हणजे ? तुम्हाला काहीच वाटत नाही ? तिला हे असलं मरण आलं तरीही ? कशाला काही वाटेल म्हणा, ती नजरेसमोरही नको असायची तुम्हाला. का ? कशासाठी तिचा एवढा तिरस्कार करायचात तुम्ही ?
भाऊ	मला सांगता येणार नाही.

अनिल हे असं मरण - कसा धीर झाला असेल तिला - कसं सहन केलं असेल तिनं ? ती ओरडली सुद्धा नाही म्हणतात. दिवसभर मारहाण सोसून रात्री चोरून रडणारी बाई - जीव जाताना मात्र ओठ घट्ट मिटून घेतले होते तिनं -

भाऊ तिची सहनशक्ती तुलाच जास्त ठाऊक असणार. कारण तूच कित्येकदा पैशांसाठी -

अनिल हो. मी हात टाकला होता तिच्यावर आणि जास्त जीव खाल्ला असतान् तर गुरासारखं झोडपून फेकून दिली असती कोपऱ्यात, तेच ते पुन्हापुन्हा सांगायची. संताप यायचा मला. पण आता हे हात तोडून टाकावे असं वाटतयं -

(आवेगाने हात जमिनीवर आपटू लागतो.)

भाऊ बस कर आता. ह्या असल्या नाटकांचा तिटकारा आहे मला. ती बसायची तुला गोंजारत पण माझ्याकडून तशी अपेक्षा करू नकोस तू.

अनिल ते तरी कुठे हवं असायचं मला ? उलट त्यासाठीही चिडायचो मी. पण ती हट्टानं माझी समजूत काढत बसायची. तिच्या मनात खूप माया होती. तुम्हाला इतक्या वर्षात एकदाही वाटलं नाही असं ?

भाऊ ते ठाऊक नाही, पण तुझी मर्जी मात्र छान सांभाळायची ती.

अनिल म्हणजे ? तुम्हाला काय म्हणायचंय ?

भाऊ जाऊ दे. एखाद्याला यातना सोसण्यातच आनंद मिळतो.

अनिल एवढं क्षुद्र वाटतं तुम्हाला ते सगळं ? तिची धडपड ?

भाऊ मला खोटे उमाळे आणता येत नाहीत. आणि तिच्या तसल्या वागण्यामुळेच तुझी आज ही अवस्था झालीय हे तुलाही चांगलं ठाऊक आहे.

अनिल पण तिनं आधार दिला नसता तर एव्हाना मी नक्कीच जीवाचं काहीतरी - *(विराम)* कॉलेज सुटलेलं. रिकामा वेळ खायला उठायचा. मित्र कधीच तुटले होते. पिसाटासारखा हिंडायचो मी उन्हातान्हातून. कित्येकदा तर आपण कुठे आलोय हे सुद्धा लक्षात यायचं नाही. शेवटी पाय थकले आणि पोटात आग पेटली की घरी यायचो मी.

(अनिल त्याच्या झोनमधून बाहेर पडतो. Level कडे जातो. अडखळतो. धडपडतो. तो आवाज ऐकून बाई येतात. अनिलला पाहताच त्याला सावरायला धावतात.)

बाई अनिल - *(त्याला आधार देऊन उठवू लागतात.)*

अनिल दूर - दूर हो - हात लावू नको मला. मला मदत करतेय. तुला काय वाटलं ? मला तुझ्या मदतीशिवाय उठून उभं राहता येणार नाही ? *(कष्टानं, प्रयत्नपूर्वक उठून उभा रहातो)* बघ - हे - बघ

बाई अनिल तू - *(डोळ्याला पदर लावतात)* किती अंत बघणार आहेस माझा ?

अनिल रडायला काय झालं ? कोणी मरून पडलंय इथे ? बाजूला हो -

बाई *(पुन्हा त्याच्याजवळ जातात)* सकाळी बाहेर पडलास तो आत्ता येतोयस -

(त्याच्या अंगावरून हात फिरवतात. त्यात त्याला मार बसलाय तिथे धक्का लागतो. तो ओरडतो. बाईंना दूर ढकलतो.)

अनिल तू जीव घेशील माझा

बाई कुठे भटकत रहातोस ? असं नुसतं भटकून काय होणार आहे ?

अनिल ए - तुला थोडा भाव दिला म्हणून लगेच चोंबडेपणा नको करू. तुला काय करायच्यायत नसल्या चौकशा ?

बाई काळजी वाटते रे मला. काही झालं तरी मी आई आहे तुझी.

अनिल फालतू बडबड बंद कर. काही खायला प्यायला घालायचं तर चौकशी करत बसलीय.

बाई *(अपराधी स्वरात)* आणते - आत्ता आणते.

(लगवगीनं आत जातात. अनिल तसाच बसून रहातो. विव्हळत वगैरे. बाई खायला घेऊन येतात. अनिल ते त्यांच्या हातून हिसकून घेतो. आणि बकाबका खाऊ लागतो. बाई समाधानानं त्याच्याकडे पाहतात. मग त्याच्याजवळ जाऊन बसतात. त्याच्या डोक्यावरून हात फिरवतात.)

बाई काय अवस्था करून घेतलीयस स्वतःची ?

अनिल *(त्यांना झिडकारत)* आता खाऊ दे नं -

(बाई हात मागे घेतात.)

बाई सकाळी किती संतापलास ? पण मी तरी काय करू ? माझाही नाईलाज होतो. एरव्ही कधी नाही म्हटलंय का मी तुला ? पण तू माझं काही ऐकून न घेताच -

अनिल *(ठसका लागतो)* पाणी - *(बाई उठून पाणी घेऊन येतात)*

बाई तुला उशीर व्हायला लागला तसा जीव कासावीस होऊन गेला माझा. वाटलं तू संतापाच्या भरात - पण तुला पाहिलं आणि -

अनिल हं घेऊन जा हे -

(बाई निमूटपणे प्लेट, भांडं आत घेऊन जातात. अनिल आडवा होतो. बाई त्याच्याजवळ येऊन बसतात)

बाई अजून रागावलायस माझ्यावर ?

अनिल हं - सकाळी दहा रुपये मागितले तर दिले नाहीस आणि आता विचारतेय

बाई रोज कुठून आणू मी पैसे ?

अनिल चोरी कर. मला काय विचारतेयस ?

बाई शेवटी आज तेही केलं तुझ्यासाठी. आणि नेमकं मला पैसे काढून घेताना पाहिलं त्यांनी. काही बोलले नाहीत. पण *(पदरात बांधलेली नोट त्याला देतात.)* हे असं पैशांसाठी हात पसरण्यापेक्षा तू एखादी नोकरी -

अनिल तू कशासाठी आहेस मग ? आणि नोकऱ्या काय अशा वाटेवर पडल्यायत ?

बाई कसं होणार आहे तुझं कुणास ठाऊक - *(पुन्हा डोळ्याला पदर लावतात.)*

अनिल ए - तू आता पुन्हा रडू बिडू नको इथे बसून. मी नोकरी शोधीन. बस्स ? जा, आपल्या कामाला जा. मी येतो जरा बाहेर जाऊन -

बाई आता पुन्हा कुठे निघालास रात्रीचा ?

अनिल आत्ता येतो म्हटलं नं ?

बाई अनिल -

(अनिल निघून जातो. बाई निराश होऊन मागे वळतात. थकून आडव्या होतात अनिल पुन्हा पूर्वीच्या बेअरिंग मध्ये.)

भाऊ पण ते चार घासही कधी सुखासुखी खायचा नाहीस तू. एवढ्यातेवढ्या गोष्टीसाठी संतापायचास. हाती लागेल ते फेकून मारायचास. एकदा ती तुझ्यासाठी जेवायची थांबली म्हणून चिडून अन्नात माती कालवली होतीस तू.

अनिल मला संताप यायचा तिच्या ह्या दीनवाण्या सोशिकपणाचा.कशासाठी करायची ती हे सगळं ? *(विराम.)*

भाऊ आधी एवढं वाईट नव्हते हे सगळं. तेही दिवस कष्टांचे, ओढगस्तीचेच होते. तरीही बरीच कोवळीक

शिल्लक होती. तेव्हा पैशासाठी रात्री उशीरापर्यंत काम करून ती घरी परतायची तेव्हा माझी वाट पाहून कंटाळून झोपून जायची ती.

(भाऊ आपल्या झोनमधून लेव्हलकडे जातात. घराच्या दारात उभे. बराचवेळ दार ठोठावतात मग बाईंना जाग येते. त्या दार उघडतात. भाऊ आत येतात. थकलेले. बाई आत जाऊ लागतात.)

भाऊ पाणी घे जरा -

(बाई नाखुषीतचं जाऊन पाणी घेऊन येतात.)

भाऊ अनिल झोपला ?

बाई सिनेमाला गेलाय मित्रांबरोबर.

भाऊ काय ? अग हे त्याचे अभ्यासाचे दिवस.

बाई म्हणून काय झालं ? जराही करमणूक नको ? आमच्या नशीबी आहेच मन मारून जगणं. निदान त्याला तरी - *(विराम.)* जेवणार आहात ?

भाऊ जरा निवांत बसू दे ग. दिवसभराच्या कटकटीनं डोकं उठलंय माझं. *(विराम.)* तुझं झालं जेवण ?

बाई वाट तरी किती वेळ पहायची तुमची ? शेवटी कंटाळून जेवून घेतलं मी.

बाई आज जरा जास्तच उशीर झाला.

बाई त्यात नवीन काय आहे ? नेहमीचचं आहे ते.

(उठून जाऊ लागतात)

भाऊ *(त्यांना थांबवत)* ए - बस ना - रागावलीस ?

बाई असं म्हटलं की झालं. मी जाते आत. कामं आहेत मला.

भाऊ करशील ग. आधी इथे बस. *(बाई नाखुषीनं बसतात.)* एक आनंदाची बातमी सांगायचीय तुला. *(विराम.)* हा सगळा त्रास आता फक्त काही दिवसच सहन करायचा.

बाई *(कडवटपणे)* नंतर असा काय चमत्कार होणार आहे ?

भाऊ अग बघशीलच तू. निदान पैशांची विवंचना पुष्कळच कमी होईल.

बाई तुम्हाला बढती मिळणार असेल -

भाऊ अरेच्या ! तू कसं ओळखलंस ?

बाई दर दोनतीन वर्षांनी सांगताच तुम्ही असं

भाऊ नाही. तसं नाही. ह्यावेळी खरंच

बाई एकदोन दिवसात तीनचारशे रुपयांची सोय करून ठेवा. अनिलची कसलीशी फी भरायचीय शिवाय कपडे शिवायचेत त्याला.

भाऊ अग पण आत्ताच तर -

बाई तुम्हाला आवडतं दळिद्र मिरवायला. मला नाही आवडत.

भाऊ तुला काय वाटतं मी हे सगळं हौस म्हणून करतो ?

बाई कशाला वाद उकरून काढताय उगीच ? *(विराम.)* असली खोटी स्वप्नं दाखवण्यापलीकडे काय केलंय माझ्यासाठी तुम्ही इतक्या वर्षात ? जाऊ दे. जेवून घ्या आता.

भाऊ नको.

बाई म्हणजे ?

भाऊ भूकच मेलीय माझी

बाई हे आणखी वर. मुद्दाम मला अद्दल घडवायला.

भाऊ नाही. खरंच नको. इच्छाच नाही आता.

(वर्तमानपत्र बघू लागतात. बाई उद्वेगाने त्यांच्याजवळ जातात. त्यांच्या हातातलं वर्तमानपत्र दूर फेकतात.)

बाई — का छळता असं तुम्ही मला ? त्यापेक्षा मारून टाका एकदाची म्हणजे ह्यातून सुटेन तरी मी.

भाऊ — पण झालं काय असं ?

भाऊ — तुमच्या अपेक्षा तरी काय आहेत माझ्याकडून ? की मी म्हणजे तुमची चिडचीड सहन करण्यासाठी पोसलेलं जनावर आहे ?

भाऊ — पण मी कुठे काय म्हटलं ?

बाई — म्हणायला कशाला हवं ? मला काय कळत नाही ? तो एवढीशीही गोष्ट त्यांच्या मनाविरुद्ध झाली तरी माझ्यावरच संतापतो. तुमची वाट बघावी तर तुम्ही विरलेल्या चेहऱ्यानं घरी येता - आणि मी मात्र -

भाऊ — मला तुझ्याकडून कसलीही अपेक्षा नाही.

बाई — छान ! म्हणजे हीच किंमत आहे माझी ह्या घरात.

भाऊ — तसं नव्हतं म्हणायचं मला.

बाई — कशाला उगीच सारवासारव करताय आता ? एका वाक्यात मला माझी जागा दाखवून दिलीत तुम्ही. *(हुंदके देऊन रडू लागतात. (विराम) मग भाऊंनाच त्यांची कीव येते. ते त्यांच्या खांद्यावर हात ठेवतात.)*

भाऊ — किती त्रास करून घेतेस ? अग हे दिवसही जातील -

बाई — कधी ? मला धीर नाही हो तेवढा. इतकं वय वाढलं तरी अजून मन वठून जात नाही माझं. मला छोटसं का असेना समाधान हवंय हो. निराशेचा, तडफडीचा स्पर्शही नसलेलं.

भाऊ — तुझी ही तळमळ मला समजत नाही असं वाटतं का तुला ? पण मी तरी काय करू ? खूपच असह्य झालं की स्वप्नं पहातो. आणि राहवत नाही म्हणून तुलाही त्यात ओढतो. हे सगळंच कधीतरी कोसळणार आहे हे माहित असूनही.

(विराम.)

बाई — मी मघाशी बोलले त्याचा राग आला तुम्हाला ?

भाऊ — तुझी तरी काय चूक आहे त्यात ?

बाई — माझा स्वतःवर ताबाच राहत नाही हल्ली. तुम्हा दोघांशिवाय माझ्याजवळ आहेच काय दुसरं ? पण जे आहे ते तरी पूर्णपणे माझं एकटीचंच आहे अशी स्वतःची खात्री पटवून द्यायला धडपडते मी. *(विराम.)* कधीकधी स्वतःचीच खूप भीती वाटते. वाटतं एखाद दिवस ह्या सगळ्याचा स्फोट होईल आणि मग -

भाऊ — काहीतरी काय ! असं काही होत नाही. उगीच नको त्या गोष्टींचा विचार करत बसतेस तू. चल आधीच खूप उशीर झालाय. उद्या सकाळी आहेच पुन्हा नेहमीची धावपळ -
(भाऊ त्यांना घेऊन आत जातात. भाऊ पुन्हा पूर्वीच्या बेअरिंगमध्ये.)

भाऊ — सुरुवातीला बरं वाटायचं हे सगळं *(विराम.)* पण नेहमीचंच झाल्यावर त्याचाही कंटाळा यायला लागला. शेवटी मी सरळ दुर्लक्ष करायला लागलो. मग आणखी गैरसमज, मनस्ताप, *(विराम.)* एखाद्यावर प्रेम करायचं म्हणजे त्याला इतकं बांधून जखडूनच ठेवावं लागतं ? त्याला स्वतःचं म्हणून काही आयुष्य असूच नये ? मला असह्य व्हायला लागली होती ती बंधनं *(विराम.)* एकदा तुझं कौतुक आटपलं की ती माझ्याकडे वळायची -

(बाई 'लेव्हल'वर येतात. भाऊंची वाट पहात बसतात. भाऊंना बघून लगबगीनं आत जातात. पाणी घेऊन येतात. भाऊंचं ह्या सगळ्या धावपळीकडे लक्षही नाही. ते आत येताच कामाचा पसारा काढून बसतात.)

बाई पाणी

भाऊ ठेव तिथे.

बाई जेवायचं असेल नं ?

भाऊ बाहेर खाणं झालंय माझं. *(लक्ष कागदपत्रात)*

(बाई हिरमुसून आत जातात. काही वेळानं पदराला हात पुसत बाहेर येतात. भाऊ कामातच आहेत.)

बाई मला वाटलं होतं. निदान आजतरी तुम्ही लवकर याल.

भाऊ खूप काम आहे मला -

(बाईंचा नाईलाज होतो. त्या उठतात. झोपण्याची तयारी करू लागतात. एकीकडे भाऊंशी बोलतात.)

बाई ह्या अनिलच्या वागण्याला काही ताळतंत्रच राहिलं नाही हल्ली. केव्हाही घरी येतो, केव्हाही जातो. एवढी रात्र झालीय पण अजून घरी आला नाहीये तो. तुम्हीही काही बोलत नाही त्याला. एखाद दिवस काही वेडंवाकडं झालं म्हणजे -

(भाऊंचा काहीच रिस्पॉन्स नाही. तयारी आटोपल्यावर बाई भाऊंच्या अगदी शेजारी येऊन बसतात. विराम.)

बाई अहो

भाऊ अं ?

बाई अजून किती वेळ आहे ?

भाऊ काही सांगता येत नाही- पण- तू झोप- मी नंतर- *(उठून बाहेर जायला लागतात)*

बाई *(त्यांना हात धरून बसवतात)* बसा नं इथेच.

(भाऊंचा नाईलाज होतो. बाई त्यांच्या शेजारीच आडव्या होतात. प्रकाशाचा त्रास होतो. म्हणून डोळ्यांवरून हात झाकून घेतात. काही क्षण शांतता. मग बाईंच्या कण्हण्याचा आवाज येऊ लागतो. वेदनांनी त्या तळमळतायत हे जाणवतं. भाऊ दुर्लक्ष करायचा प्रयत्न करतात पण त्यांना ते जमत नाही. बाईंची तडफड वाढू लागते. शेवटी असह्य होते तेव्हा भाऊ हातातलं काम बाजूला ठेवतात. आणि आणि शक्य तितकं अंग चोरून घेऊन तिथून उठू लागतात. पण बाईंना त्यांचा धक्का लागतो त्याबरोबर बाई एकदम उठून बसतात.)

बाई तुम्ही काही - *(भाऊ काहीच बोलत नाहीत.)* किती वेळ बसणार आहात अजून ? ठेवून या नं ते - माझ्या साठी *(स्वतःच सगळे कागद बाजूला करतात.)* का टाळता हल्ली मला ? *(त्यांच्या आणखी जवळ जायचा प्रयत्न. भाऊंची सुटकेसाठी धडपड)* एरव्ही कधी हट्ट करते का मी ? पण आज - बघा - किती थरथरताहेत माझे हात - *(जबरदस्तीनं भाऊंचा हात स्वतःकडे ओढतात.)* अजूनही तितकंच अनावर होतं हे शरीर - आणि तुम्ही मात्र - *(त्याच्याशी लगट करू लागतात. शेवटी भाऊ निकराचा प्रयत्न करून स्वतःची सुटका करून घेतात. त्यांच्या अवस्थेकडे पाहून घृणेने मान फिरवतात. आणि तिथून बाहेर पडतात. बाई उठून बसतात. आवेग अनावर होऊन हुंदके देऊन रडू लागतात.)*

भाऊ *(पूर्वीच्या जागी)* हे असं चाललेलं असायचं. तिला स्पर्शही होऊ नये म्हणून शक्य तितकं अंग आक्रसून घ्यायचो मी. पण चुकूनही स्पर्श झालाच तर धडपडत उठून बसायची, लगट करू लागायची. तिला वाटायचं की मी तिलाच -

अनिल खोटं, खोटं सांगताय तुम्ही हे सगळं. ती बाकी कशीही असेल पण इतकी निर्लज्ज, गलिच्छ बाई नव्हती ती. तुम्ही हे असलं बोलणारच. कारण तुम्हाला फक्त एक बाई म्हणूनच ठाऊक होती ती. तिलाही काळीज होतं हे कधी मान्यच केलं नाहीत तुम्ही. अशा बाबतीत स्वतःवर फार निष्ठुरपणे पहारा ठेवायची ती - ती असं वागणं शक्यच नाही. तुम्हीच काहीतरी अमानुष -

भाऊ अनिल - मी ? तिची नुसती चाहूल लागली तरी किळस यायची मला. आवाज ऐकू आला तरी शहारा यायचा अंगावर. तिचा तो शिळा ओशट स्पर्श नकोसा वाटायचा. भीती वाटायची त्याची. वाटायचं हिच्या बोटांना आपली कातडी चिकटून जाईल.

अनिल एवढं होतं तर मग घरी तरी कशाला येत होतात ?

भाऊ कुणास ठाऊक. खरं म्हणजे मला तिच्यापासून सुटकाच हवी असायची सतत. तसा प्रयत्नही करून पाहिला मी, पण मला जमलं नाही ते. तेव्हापासून असेल कदाचित, पण तिचा हिरमोड झाला, तिची तडफड, असहायता जाणवली की बरं वाटायचं. वाटायचं कधीतरी हिची सहन करण्याची ताकद संपेल. ही थकून माझ्या पायावर कोसळेल आणि मग मी -

अनिल सरळ सांगा नं - तुम्हाला मत्सर वाटायचा माझा. ती माझ्यासाठी धडपडायची हे पाहून राग यायचा तुम्हाला.

भाऊ नाही. इतकं साधं नव्हतं ते. निव्वळ सूड घेण्यासाठी माणूस स्वतःची अशी परवड करून घेत नाही.

अनिल पण मग का वागलात तुम्ही असं ? एवढा काय अपराध होता तिचा ? निदान आतातरी सांगा काय कमी होतं तिच्यात ?

भाऊ जाऊ दे. *(विराम.)*

अनिल कसं सांगाल ? कारण नव्हतंच काही. तुम्ही ठरवूनच वाईट वागत होतात तिच्याशी.

भाऊ नाही. शक्य होतं तोपर्यंत सहन केलं मी. माझ्यापेक्षा तूच जास्त चटकन त्यातून बाहेर पडलास. जरा अडचण व्हायला लागल्याबरोबर एका फटक्यात झुगारून दिलंस सगळं -

अनिल विचित्र वागायला लागली होती. सारखा जीव खायची. हेच का केलंस ? ते का केलं नाहीस ? जणूकाही तिच्या सगळ्या इच्छा पूर्ण करण्याची जबरदस्तीच होती माझ्यावर. माझ्याही सहनशक्तीचा अंत पाहिलान् तिनं आणि मला तिची खरी गरज होती तेव्हा मात्र -*(अनिल गप्प होतो.) (विराम.)*

भाऊ मला भूक लागलीय. तुला हवं आहे काही ?

(अनिलचं उत्तर नाही. भाऊ त्याचा नाद सोडतात. Level वर जातात. तिथे बाई बसल्या आहेत. रडत....)

भाऊ *(संतापलेले आहेत)* लाज नाही वाटत ? आज सांगतेयस तू मला ? इतके दिवस काय -

बाई मला भीती वाटली. संतापाच्या भरात तुम्ही -

भाऊ कशाला खोटं बोलतेयस ? मुद्दाम लपवून ठेवलंस तू ते पत्र माझ्यापासून आणि आता तो तुला त्रास द्यायला लागला म्हणून -

बाई तसं नाही हो.

भाऊ कर. आणखी कौतुक कर त्याचं. ह्या घराला दुसरा उपयोगच काय आहे तुझा ! आता रडत बसलीय माझ्या डोक्याशी - तासन्तास त्याच्यासाठी ताटकळत बसलेली असायचीस त्या ऐवजी तो काय करतो,कुठे जातो इकडे थोडं लक्ष दिलं असतसं तर आज ही वेळ नसती आली.

बाई त्याचं होतं तरी कोण माझ्याशिवाय ? तुम्ही तर तो दिसला की -

भाऊ म्हणून सगळा वेळ. त्याच्याच डोक्याशी बसायचं ? आणि मी ? की माझं महत्त्व फक्त गरजेपुरतंच आहे ह्या घरात ?

बाई	तुम्हालाही काही कमी पडू नये म्हणून धडपडायचे मी माझ्यापरीनं - तुम्हालाच नको असायचं ते
भाऊ	कारण प्रत्येक बाबतीत अतिरेक करून सगळा विचका करून टाकायचीस तू -
	(अनिल दारात उभा.)
भाऊ	कुठे गेला होतास ?
अनिल	आईला सांगून गेलो होतो मी.
भाऊ	हे माझ्या प्रश्नाचं उत्तर नाही.
अनिल	तुम्हाला एकदा सांगितलं नं - काम होतं म्हणून.
	(त्यांना टाळून आत जाऊ लागतो.)
भाऊ	थांब.
अनिल	काय आहे ?
भाऊ	रोज रात्री इतक्या उशीरापर्यंत कुठे जातोस तू ?
	(अनिल उत्तरही देत नाही. दुर्लक्ष करून आत जाऊ लागतो. भाऊ झडप घालून त्याला पकडतात.)
	आज अशी सुटका नाही तुझी. सांग दिवसभर कुठे उकिरडे फुंकत हिंडत असतोस ?
अनिल	हात सोडा माझा. *(हात झटकून दूर होतो.)*
भाऊ	हे पत्र बघितलंस.
अनिल	तुमच्या हाती कसं पडलं हे ? म्हणजे बाई तू -
भाऊ	आधी माझ्याशी बोल -
अनिल	हिन सांगितलं असेल तुम्हाला
भाऊ	सांगायला नको होतं ? एक तर चोरी केलीस तू
अनिल	पकडला गेलो म्हणून -
भाऊ	का केलंस तू असं तुला थोडीही लाज नाही वाटली.
अनिल	पैशांची गरज होती मला
भाऊ	, मी जिवंत होतो नं इथे ? मला सांगायचीही गरज नाही वाटली तुला ?
अनिल	तुम्ही ! *(उपहासानं हसतो.)*
	आणि तुम्हाला कशाला सांगायचं ? काहीतरी कारण शोधून संतापणं ह्यापलीकडे दुसरं काय केलंय तुम्ही आजपर्यंत ?
भाऊ	म्हणजे मी कोणीच नाही तुझा ?
अनिल	आहात नं. वैरी आहात तुम्ही माझे -
भाऊ	अनिल - *(संतापून त्याला मारत सुटतात. हाथ थकल्यावर थांबतात.)*
अनिल	झालं ?
बाई	किती मारायचं पोराला - अनिल
अनिल	तू ? हात लावू नकोस मला - तू इतकी हलकट विश्वासघातकी असशील असं वाटलं नव्हतं. बाजूला हो. *(त्यांना दूर ढकलतो.)*
बाई	असं काय करतोस ? तुझा काहीतरी गैरसमज झालाय तू ऐकून घे माझं - तुला मार बसावा म्हणून नाही केलं मी हे - खरंच. वाटल्यास तुझी शपथ घेऊन सांगते - तुझ्याच भल्यासाठी नाईलाजानं -
अनिल	बस. आता एक शब्द पुढे बोलशील तर जीव घेईन मी तुझा - *(बाईंचा नाईलाज होतो. त्या भाऊकडे धावतात.)*
बाई	तुम्ही तरी समजवा त्याला.

भाऊ मी ? तो माझ्याबद्दल काय बोलला ऐकलं नाहीस तू ?

बाई इतके दिवस सांभाळून घेतच होते नं मी त्याला - पण तुम्ही

भाऊ ह्याला सांभाळणं म्हणतात ? तू खेळत होतीस त्याच्या आयुष्याशी. गरज वाटली तर स्वतःच्या वेदनांचं भांडवल करून त्याला आपल्या मुठीत ठेवण्यासाठी प्रेमाचं नुसत नाटक केलंस तू. त्याला आज कळलं ते. मी फार पूर्वीच ओळखलं होतं. म्हणून तुझ्या ह्या विकृत खेळाला मी कधीच बळी पडलो नाही. तूच लोचटपणा करत रहायचीस. एरव्ही माझ्यापुरतं तुझं अस्तित्व कधीच पुसून टाकलं होतं मी.

बाई एकुलता एक आधार होता मला ह्या घरात. पण त्यालाही आज माझ्यापासून तोडलंत तुम्ही. हा कसला सूड उगवलात ? काय मिळालं तुम्हाला ?

भाऊ आणखी किती दिवस फसवू शकली असतीस त्याला. कधी न कधी तोही माझ्यासारखाच -

बाई मला कळलंय. मला ह्या घरात राहणं अशक्य व्हावं म्हणून हे सगळं मुद्दाम रचलंत तुम्ही. जाईन मी पण लक्षात ठेवा. इतकं सहजासहजी होऊ देणार नाही मी ते. ह्या घरात मी जे सोसलंय त्याची किंमत द्यावीच लागेल तुम्हाला.

भाऊ जे काय करायचं ते करून दाखव. धमक्या देतेय -

(अनिल आणि भाऊ परस्परांपासून दूर उभे. हे दृष्य क्षणभर स्थिर होतं. मग बाई हळूहळू खाली उतरतात. संथपणे जाऊन दिव्याजवळ उभ्या रहातात.)

बाई हे असं नाटकं तरी कशाला करताय आता ? केवळ चार लोकांना घाबरून ? बंद करा हे. मला गरज नाही ह्याची. तेव्हा तर माझ्यावर थुंकायलाही तयार नव्हतात नं तुम्ही ? आता माझं मरण तुमचं उरलेलं आयुष्य कुरतडत राहील *(विराम.)* नाहीतरी माझं जगणं विस्कटूनच गेलं होतं. एवढी तेवढी निमित्तं पण तेवढ्यावरून मला आयुष्यातून उठवलंत तुम्ही. आता ह्या घरात पावलापावलावर माझी आठवण येत राहील तुम्हाला.

(क्षणभर विराम. मग 'लेव्हल'वरचं दृष्य पुन्हा जिवंत होतं. भाऊ आणि अनिल दोघेच. अगदी सुरुवातीच्या बेअरिंगमध्ये.)

अनिल ह्या खोलीतल्या अडगळीत, जुन्या मोडक्यातोडक्या वस्तूंच्या आधारानं, त्यांच्यातलीच एक होऊन तासन्तास बसून असायची ती. *(विराम.)* इथे ह्या उंबरठ्यात बसून असायची वाट पहात. आणि दारात पाऊल टाकताच अपराधी वाटायचं. कळतनकळत झालेल्या चुका, बारिकसारिक अपराधही क्रूर जीवघेणे वाटतील असं काहीतरी वागणं असायचं तिचं *(विराम.)* ह्या भिंतींशी घरातल्या लहानमोठ्या वस्तूंची खूप जिव्हाळ्याचे संबंध होते तिचे. आणि आपण ? की आपली तेवढीही लायकी नव्हती ? कदाचित तसंच असेल म्हणून तर ह्या सगळ्या गोष्टी तिच्या बाजूनं जाब विचारायला उभ्या आहेत आपल्याभोवती - बघा सगळं घर कसं टपून बसलंय श्वास रोखून - आता आपण अडकलोय - कायमचे आपल्याला सुटका नाही.

(भावनावेगानं चेहरा झाकून घेऊन निःशब्द रडू लागतो.)

भाऊ *(विषण्ण आवाजात)* ही लांबलचक कंटाळवाणी रात्र कधी संपणार आहे कुणास ठाऊक ! दिवस उजाडला की निदान - पण पुन्हा तेच सुरू होईल. तेच ते प्रश्न खोटी सहानुभूती दाखवणारे चेहरे. आणि शब्दांचे फक्त आपल्यालाच जाणवणारे क्रूर अर्थ *(विराम.)* कशाला एवढा विचार करतोय आपण ह्या सगळ्याचा ? जे व्हायचं ते होऊन गेलं. कधीतरी होणारच होतं ते - पण एवढं सरळ साधंही राहिलं नाही आता ते - तिच्याविषयीची ओढ, जिव्हाळा सगळं ठरवून तोडून टाकलं आपण तरीही ती उरली कशी ?

(हा प्रश्न स्वतःलाच पुन्हापुन्हा विचारत राहतात. बाई हे सगळं पहातायत मग शांतपणे 'लेव्हल'वर अगदी मध्यावर जाऊन बसतात. आणि दुःख या आर्जवी स्वरात बोलू लागतात.)

बाई — एवढा काय अपराध केला होता मी ? असं काय मागितलं होतं मी तुमच्याकडे ? थोडंसं प्रेम आणि तुम्हा दोघांच्या आयुष्यात एखादा हक्काचा कोपरा. आणि तेही भीक म्हणून नको होतं मला. मागाल ती किंमत द्यायला तयार होते मी. पण नेमकं तेच नाकारलंत तुम्ही. तेवढ्याकरता मी तुम्हाला बांधून जखडून ठेवते असं. वाटायचं तुम्हाला. तसं झालंही असेल कदाचित पण काय बिघडलं असतं थोडं सहन केलं असतंत तर ? मला तुम्ही दोघेही हवे होतात, पण अशा पद्धतीनं साधायचं नव्हतं मला ते. खरचं. विश्वास ठेवा माझ्यावर. *(फुटून रडू लागतात.)* ■ ■

दिनकर वेडेकर, उत्कर्ष शीतल, अंबाझरी लेआऊट, नागपूर

(प्रथम प्रयोग : "नाट्यदर्पण प्रतिष्ठान", मुंबई तर्फे आयोजित एकांकिका स्पर्धा १९८८-८९)



तो, ती, आणि एक सूनसान रस्ता

गजानन पांडे

रस्त्याच्या फूटपाथावर एक बेंच पोस्ट. एक आकर्षक तरुणी येते. थोडावेळ उभी राहते. बसते. मधेच घड्याळावर नजर टाकते. कुणाचीतरी वाट पाहातेय. थोड्यावेळाने एक मध्यमवयीन माणूस हातातील शबनम सावरत येतो. एक कटोरा.... तो आधी बेंचावर तिच्याशेजारी बसतो. ती नापसंतीनं त्याच्याकडे बघते तसा तो उठतो. खाली बसतो. काहीतरी चाळा म्हणून वही काढून वाचतो. उचकवाचक करतो नंतर......

तो — किती वाजले असतील.... *(तिला आश्चर्य वाटतं.)*

ती — कुठली अपॉईंटमेंट होती ?

तो — *(स्वतःशीच)* किती वाजले असतील..... आपल्याला काय फरक पडतो. समजा बारा वाजले असले तर..... तर काय होणार आहे..... काही वेगळं असं घडणार आहे काय ? मग वेळेच्या नसल्या उठाठेवी कशाला ? काय, मी म्हणतोय ते खरं की नाही. *(ती बोलत नाही.)* परवा गंमतच झाली बघ.... तीन चार चिमण्या मिळून उन्हं खात चिवचिवत बसल्या होत्या. चांगल्या गरत्या होत्या...... खात्या पित्या घरचा स्थूलपणा त्याच्या शरीरावरून उतू जात होता..... तिकडून एक बारकीशी चिमणी आली..... ऐकतेय ना.....

ती — मला काही म्हणालात..... सुटे पैसे नाहीत माझ्याकडे......

तो — कितीची मोड पाहिजे..... दहाची का पन्नासची...... आहे माझ्याकडे......

ती — इतके पैसे मिळतात...... भीक मागून.....

तो — मग काय..... पुढल्या वर्षी कदाचित इन्कमटॅक्सही भरावा लागेल मला.

ती — बोलतोस तर मजेदार... भिकाऱ्यांकडून इन्कमटॅक्स...कल्पना छान आहे.

तो — मी तुला भिकारी वाटलो....

ती — ते तुझ्या चेहऱ्यावरच लिहिलंय... भिकारी नाहीतर कोण आहेस ? कलेक्टर ?

तो — मी स्वतःला पंतप्रधान समजतो काय म्हणणं आहे तुझं...

ती — मला अंगतुगं म्हणतोस... लाज नाही वाटत ? असं अनोळखी स्त्री...

तो — काय वय असेल तुझं... फारतर वीस... बावीस... कदाचित पंचवीस. बरं जाऊ दे... तुला.. म्हणजे तुम्हाला नाही आवडत ना... तसं बरोबरंच आहे म्हणा तुमचं.. मी तितका काही म्हातारा नाही. केवळ केस पांढरे असले म्हणजे माणूस म्हातारा होत नसतो. काय खरं की नाही ? हं ! तर कुठवर आलो होतो आपण.. तिकडून एक बारकी चिमणी आली. म्लान.. उदास चेहरा तिचा... उतरलेली चोच त्यांची काहीतरी बाचाबाची झाली असावी... आणि त्या गृहिण्या तिच्यावर तुटून पडल्या... टोचून टोचून मारून टाकलं तिला.. काय कारण असावं.. मी कालपासून विचार करतोय... काही केल्या उत्तर सापडत नाहीय मला... तुम्ही सांगू शकला... *(पॉज)* हा रस्ता ह्यावेळी सूनसान असतो... रहदारी जवळपास नसते... म्हणून इथं येऊन बसतो मी.. समजा असा विचार केला ही हा रस्ता... झोपलेल्या

अजगरासारखा हा रस्ता उठून बोलायला लागला तर काय बोलेल ?... एक तर खूप भडकून बोलेल किंवा बोलणारच नाही... एव्हाना त्याची जीभ टाळूला चिकटून बसली असेल. *(ती आता कंटाळली आहे.)* मजा आहे की नाही. किंवा आपण असा विचार करू की...

ती — जो काही विचार करायचा आहे तो तुम्ही मनातल्या मनात करा... नसता वैताग...

तो — बरोबर. वेळ देऊन जर कुणी आला नाही तर वैताग होणारच.

ती — काय म्हणालात ? कोण वेळ देऊन आला नाही..

तो — दचकायला काय झालं ? मी म्हटलं की समजा हा बाकडा बोलायला लागला तर.. तर तो काय बोलेल...

ती — तू जरा गप्प बसायला काय घेशील ?

तो — तू काय देशील ?

ती — शटअप... कुणाशी कसं बोलावं कळंत नाही तुला...

तो — सॉरी. तुम्ही काय द्याल ?

ती — कसचं ?

तो — मी गप्प बसायचं ?

ती — प्लीज

तो — ठीक... ठीक.. पण मी स्वतःशीच बोललो तर चालेल ना.. म्हणजे त्याबद्दल तर तुम्ही आक्षेप घेणार नाही ना ? *(ती लक्ष देत नाही.)* एक चिमणी होती आणि एक कावळा होता. चिमणीचं घर होतं मेणाचं, कावळ्याचं घर होतं शेणाचं... एक दिवस मोठ्ठा पाऊस आला... तो गोष्टीतल्या सारखा पाऊस पडतच नाही... पाऊस पडला नाहीतर पृथ्वीवरची घाण तशीच राहाते.... स्वच्छ होत नाही... पण गोष्टीत मात्र मोठ्ठा पाऊस पडतो प्रत्यक्षात कां पडत नाही ?

ती — बराच वेळ झाला एव्हाना तो यायला हवा होता.

तो — कोण ?

ती — काय ?

तो — कोण यायला हवा होता ?

ती — तुला काय करायचंय ? तू जसा स्वतःशीच बोलतोयस तशी मी सुद्धा स्वतःशीच बोलते असं समज ...

तो — पण मी स्वतःशी कुठं बोलतोय... मी बोलतंच नाही. फक्त विचार करतोय... समजा तो आलाच नाही तर...

ती — कोण तो...

तो — ज्याची तुम्ही वाट पाहाताय तो....

ती — मी ? मी कुणाची वाट पाहातेय...

तो — वाट बघणे... म्हणजे एक कला आहे...

ती — बस्स ! पुरे कर बाबा आता.. जा इथून... छे... अजून कसा येत नाही.. किती वेळ वाट बघायला लावणार आहे कुणास ठाऊक. साडे आठ होताहेत... आठ पस्तीस झालेत...

तो — म्हणजे काही फार उशीर झाला नाही...

ती — तू अजून गेला नाहीस...

तो — कुठं जाऊ मी ?

ती — घरी !

तो — कुणाच्या ?

ती — तुझ्या स्वतःच्या... कां ?

तो — घरा ? चिमणीचं घरटं जर शेणाचं असतं तर... ते पावसात वाहून गेलं असतं ना... घर वाहून गेल्यावर चिमणी कुठे राहील ? कावळ्याच्या घरी... yes तिला त्याच्याच घरी राहावं लागेल... मग त्या कावळ्याची किती मजा..

ती — मला आता तुझी भीती वाटायला लागलीय...

तो — माझी भीती.. कां ? मी काय वाघ विघ वाटलो की भूत.. हे बघा मॅडम... माणूस मेल्यानंतरच भूत बनतो.... पण माझं असं म्हणणं आहे की जीवंतपणी भूत होता आलं असतं तर... मी तर खूपच मजा केली असती... या मानगुटीवरून त्या मानगुटीवर... त्या मानगुटीवरून त्या मानगुटीवर.. माकड जसं या झाडावरून त्या झाडावर उड्या मारतं की नाही... तसंच...

ती — कसलं भयानक बोलतोस तू...

तो — आठ चाळीस झाले असतील... तो अजून आला नाही. तर मी काय म्हणत होतो... वाट पाहण्यात मोठी गंमत असते कधी कधी आणि कुणीतरी घरी आपली वाट पाहातय.. यात पण आगळं सुख आहे...

(दृष्य बदलतं. तो ऑफिसातून घरी आलाय. घर उघडंच दिसतं. तो हाक मारतो... ललिता... अगं ए लले.. घरी कुणीच दिसत नाही. अस्वस्थ होतो.)

तो — कुठं गेली ही दार उघडं टाकून... लले... आजची ही तिसरी वेळ... नेमकी ह्याच वेळी कुठे जाते ही. सकाळी जाताना कुठे जाणार ते सांगूनही जात नाही.. *(ती ललिता म्हणून येते. आपल्याच धुंदीत.)* कुठे गेली होतीस घर उघडं टाकून...

ललिता — शेजारीच तर गेले होते... एवढं ओरडायला काय झालं... चहा उकळून ठेवलाय.... खायला सुद्धा करून ठेवलंय... आता आणखी काय हवंय...

तो — काही नाही... तू जा... तुझी काही खास कामं असतील ती उरकून घे...

ललिता — कां ? कुठं जायचंय... मी कपडे बदलू... कुठे ? कुठे बोलावलंय..

तो — हो... छांगाणीकडे जायचंय !

ललिता — कसली पार्टी आहे. अहो मला एखादी बऱ्यापैकी साडी घेऊन द्या ना.. वाटल्यास हप्त्यानं पैसे परत करू.... कपडे बदलू मी...

तो — आजच त्याचं रेकॉर्ड पूर्ण करून द्यायचंय... उद्या त्याला रिटर्नस भरायचेत. उशीर होईल मला यायला... *(ती चिडते.)*

ललिता — नेहमी तुमचं तेच ... काडीचा बदल नाही.... सोशल लाईफ नाही... दिवसभर ऑफीस... नंतर कुठंतरी पार्ट टाईम... रात्री बेरात्री घरी...

तो — कुठं जातेस तू... नेमकी मी यायच्या वेळी...

ललिता — मी घरी बसून काय करू ? घरात एकटी.....

तो — घर काय खातं तुला ? घरी बसता येत नाही..... माझी तडफड तुला दिसत नाही...... मला बाहेर काम करणं भाग आहे त्याशिवाय......

ललिता — कशाला कारणं सांगताय...... तुमच्या पगारात चांगलं घर चालवीन मी..... करता कशाला जास्तीची कामं.....

तो — घरात बसून काय करू..... सतत तुझ्या डोक्याशी..... मला नाही आवडत.....

ललिता — मी घरात काय भिंतींशी बोलू..... घरात इनमिन दोघं..... काम कितीसं असणार..... घरात असलात तरी

अनुक्रमणिका

सारखे काहीना काही हिशोब तपासता, नाहीतर बँक बॅलन्स बघता..... व्याज किती मिळेल बघत बसता..... घरात एखादं स्वतःचं..... तेही नाही..... तपासणी करून घ्या म्हटलं तर तुमचा अहंकार आड येतो. मग मी करू काय..... सांगा.

तो मला उशीर होतोय. *(जातो. दृष्य बदल.)*

नेहमी काम असतं असं नाही..... वेळ मिळाला की मी इथं येऊन बसतो..... एरवी वाहणारा रस्ता..... यावेळी शांत असतो..... मी त्याच्याशी हितगुज करतो..... माझ्या मनात विचार येतो..... हा रस्ता बोलायला लागला तर..... काय बोलणार..... त्याला आठवेल सगळं जसंच्या तसं..... ? *(रस्त्यावर मांडी घालून बसतो.)*

ती शी ! रस्त्यावर काय बसलास..... वर बस.....

तो बाकड्यावर बसू ?

ती बस. *(ती उठते. अस्वस्थ.)* बराच वेळ झाला.....

तो कुणाची वाट बघताय.....

ती कृपा करून मला प्रश्न विचारू नकोस.....

तो बऱ्या घरच्या दिसताय.....

ती म्हणजे.....

तो इथं, ह्या आडरस्त्यावर..... निर्जन जागी..... अशा अवेळी.....

ती तुला काय करायचयं..... आपलं काम कर..... नसेल काम तर गप्प राहा..... मला छळू नकोस.....

तो मला माझेच प्रश्न सोडवता येत नाहीत..... तुझ्या भानगडीत पडू कशाला..... पण वाटलं..... अशी सोज्वळ मुलगी..... चांगल्या घरची.....

ती कशावरून ? चांगलं किंवा वाईट घर असतं ?

तो नाही..... नक्कीच नाही..... नुसत्या भिंतींचं घर असतं तर किती बरं झालं असतं..... तरीपण असं वाट बघत राहाणं एकंदरीत कठीणच..... एक घाव दोन तुकडे झाले की बरं असतं..... येणार की नाही..... तिळा तिळानं काळाचं स्वतःच्या समोरून निसटणं..... वाईटच.....

ती तो येईल..... मला खात्री आहे..... असं बरेच वेळा झालंय..... मी वाट बघून कंटाळते..... जायला निघते तर तो समोर हजर मग..... जावंच लागतं..... इच्छा असो..... नसो.....

तो म्हणजे तुम्ही ? मला शंका आलीच..... खरं म्हणजे मला समजायला हवं होतं..... इतक्या रात्रीची..... मला.....

ती माझ्याबद्दल तिरस्कार वाटतो ना.....

तो तेच तर आश्चर्य आहे..... कळलं असूनही तिरस्कार वाटत नाही..... सहानुभूती वाटते.....

ती गरज नाही मला..... कुणीतरी माझा तिरस्कार करायला हवा.....संतापायला हवं..... इतकंच नाही..... मारहाण सुद्धा करायला हवी..... चुपचाप सहन करीन मी.

तो अजबच आहे सारं..... म्हणूनच हा रस्ता मला आवडतो.....

ती तो यायलाच हवा..... येईलच..... महत्त्वाची मिटींग आहे म्हणाला होता..... अजून संपली नसावी..... त्यालाही कष्ट पडतातच..... खूप कष्ट करतो तो..... दिवसरात्र..... मला त्याची खरं तर कीव येते..... संताप येत नाही.....

तो रस्ता कसा मुक्त आहे ह्या सगळ्यापासून..... बघा करा लांब पाय पसरून पडलाय..... कसली तडफड नाही.....

ती फक्त महत्वाकांक्षा..... उंच..... उंच आणखी उंच..... पण पुढे काय ?

तो	त्यांन तुला इथं का बोलावलं होतं..... म्हणजे अशा ठिकाणी
ती	भीती ! कुणी बघेल..... कुणाला कळेल.....
तो	तशा तुम्ही वाटत तर नाही.....
ती	चेहऱ्यावर लिहिलं असतं तसं काही.....
तो	पण आविर्भावावरून ओळखायला येतं.....
ती	ते फसवंही असू शकतं.....
तो	बरोबर..... बहुतेक असतंच..... पण नसतं तसं दिसावं लागतं.....

(दृष्य बदल. तो बाबा म्हणून येतो.)

बाबा	सुलू..... ए सुलू..... आहेस कुठे.....
सुलू	केवढ्यानं ओरडताय बाबा..... बसा. किती धापा टाकताहात..... पाणी आणू ?
बाबा	सुले..... जिंकलीस तू..... पार..... ते ही पहिल्या नंबरानं.....
सुलू	खरं..... बसा तुम्ही..... आई..... ए आई, बाबा आलेत..... शेजारी गेलीय पापड लाटायला.
बाबा	जाऊ दे तिला..... नंतर सांगेन..... आधी तुला..... त्यांच्याकडून होकार आलाय..... लाजलीस नां..... अगं आहेस कुठे ?..... देवासारखी माणसं बघ..... मी केवढा धास्तावलो होतो..... म्हटलं मुलगा एवढा हुद्देदार..... काय अटी घालतो कुणास ठाऊक..... बोलणी सुद्धा तावडतोब.
सुलू	न झेपणारं काही कबूल तर केलं नाही ना..... बाबा तुमच्यावर भार पडलेला मला आवडणार नाही.
बाबा	त्यांनी काय मागितलं माहीत आहे ?
सुलू	सरळ नाही म्हणून सांगा मग.....
बाबा	ऐकून तर घे.... ते म्हणाले...... तुम्ही मला माझ्या वडिलांच्या जागी आहात, फक्त मुलगी आणि नारळ द्या..... आहेस कुठे..... माझी तर छातीच दडपली..... शेवटी मलाच लाज वाटली. मी त्यांना स्वतःहून म्हटलं ऐपतीप्रमाणे आम्ही खर्च करू..... सगळं ठरलं..... आता तयारीला लागलं पाहिजे. नशीब काढलंस पोरी..... *(ती खाली बसते.....)*

ती	छान नशीब काढलं मी..... नशीबच म्हणायला हवं.....
तो	मजेदार शब्द आहे..... नशीब..... नजरेच्या पल्याड जे काहीं आहे ते नशीब..... समोर दिसतं ते वर्तमान..... मागे भूतकाळ..... बोंबला तिच्या आयला. तुम्ही काही विरोध नाही केलात ?
ती	कशाचा ?
तो	जे घडलं त्याला.....
ती	*(चाचरत)* काय घडलं ?
तो	काहीच नाही ?
ती	नाही तर.....
तो	खोटं..... साफ खोटं..... तू लाख लपव..... पण सत्य थोडीच लपणार.....
ती	गप्प बस..... *(घड्याळाकडे बघते)* नऊ वाजलेत.....
तो	बराच वेळ झाला..... जा तुम्ही. इथं जास्त वेळ थांबणं योग्य नाही.
ती	थोडावेळ वाट बघायला हवी.....
तो	ठीक आहे..... पण बाकड्यावर तरी बसाल की नाही..... त्यांनी तुम्हाला खाली रस्त्यावर बसलेलं पाह्यलं तर त्याला काय वाटेल ?

ती	काय वाटणार आहे.....

तो	ठीक. माझ्यासारखं रस्त्यावर आरामात विनासंकोच बसणारं कुणीतरी आहे..... अरे दोस्त..... बघ आणखी एक मित्र जोडला आपण.....

ती	ती चिमणीची गोष्ट सांगत होतास ना ?

तो	कोणती ?

ती	ती बारकीशी चिमणी..... इतर गरत्या चिमण्यांनी तिला टोचून ठार केलं ती.....

तो	तुम्ही ऐकत होतात वाटतं..... मला वाटलं तुमचं लक्षच नव्हतं..... लक्ष नाही असं दाखवणं सोपं असतं, पण त्या घटनेचे पडसाद आपल्या मनावर उमटतच राहतात..... ते जास्त त्रासदायक असतात. त्यापेक्षा जे समोर दिसतं, ऐकू येतं त्याच्याकडे नीट लक्ष द्यावं.....

ती	मी अर्धवट ऐकलं..... माझं लक्ष दुसरीकडे होतं.....

तो	मला वाटतं तुम्ही आता घरी जावं..... तो आला तर मी सांगेन.....

ती	काय सांगशील ?

तो	तुम्ही बराच वेळ वाट पाहिली, मग घरी गेलात.....

ती	त्यानं काय होईल.....

तो	त्याला गरज असेल तर तो येईल तुमच्या घरी..... नसेल तर उडत जाईल..... आजचा दिवस तेवढाच आराम.....

ती	कुणास ठाऊक ? गरज कुणाची ? फायदा कुणाचा.....

तो	सगळं विचित्र झालंय..... *(मोटार येऊन जाण्याचा आवाज. तो तिला बाजूला ओढतो)* साले माजलेत..... नीट चालवता येत नाही कां ? कोणी उभं आहे दिसत नाही साल्याला.....

ती	त्याची काय चूक. मीच तर रस्त्यात उभी होते..... माझंच लक्ष नव्हतं.....

तो	असं घडायला नको होतं..... माझा स्पर्श व्हायला नको होता..... माफ करा मला.....

ती	असं काय झालं..... तुम्ही..... *(तो वळतो)*..... होय, तुम्ही मला वाचवलंत.....

तो	पण माझा अभद्र स्पर्श.....

ती	त्याचं काय झालं.....

(दृश्य बदल. तो ऑफीसमधून आल्यासारखा येतो)

तो	आज ह्यावेळी तू घरी कशी ?

लली	जसे तुम्ही लवकर आलात तसे.....

तो	आज आपण.....

लली	आज मला माहेरी जायचंय..... भाच्याचा वाढदिवस आहे..... समीरचा.

तो	आजकाल तुझं माहेरी जाणं फारच वाढलंय.....

लली	तुमची काही हरकत आहे ?

तो	ए.... आजचा दिवस थांब ना.

लली	कशाला ?

तो	घरी कशाला थांबत असतात.....

लली	इतक्या दिवसानंतर आज आठवण झाली माझी..... की गरजच पडली म्हणून.....

तो	काय बोलतेस तू ?

लली	डॉक्टरकडे गेला होतात ?

तो	नाही..... पण आज जास्तच खाज सुटतेय..... पट्टी बदलावी लागणार....
लली	तुम्हीच करा..... मला ओकारी येते..... किळस वाटते..... तो सडलेला तुमचा पाय मला बघवत नाही..... वर्षच्या वर्ष झालीत..... जास्तच सडत चाललाय. डॉक्टरकडे तुम्ही नियमित जात नाही, बरा होणार कसा.....
तो	बरा झाला तर तू पूर्वीसारखी वागशील माझ्याशी.....
लली	म्हणजे कशी.....
तो	तेच प्रेम..... तीच आपुलकी..... घराचं घरपण.....
ती	तो आरसा तडकलाय आता..... *(तो तिच्या जवळ जायला लागतो)* थांबा..... जवळ येऊ नका माझ्या. मला आवडत नाही..... नकोसं वाटतं..... तुम्ही बसा..... मी जाते.....
	(दृष्य बदलतं)
तो	वर्षानुवर्ष असंच चाललंय..... कसलाच बदल नाही..... ऑफीस..... घर..... घराच्या भिंती..... जमीन..... वर छप्पर..... आणि मी..... माझ्या पायाच्या एक्झिमासारखं आयुष्य माझं..... माझा स्पर्श व्हायला नको होता.....
ती	वर बसा तुम्ही..... पाय दुखतोय का ?
तो	नको..... नको..... तुम्ही दूरच राहा माझ्या..... मी अभद्र आहे..... मी किळसवाणा आहे..... माझा पाय सडला आहे..... वास येतो..... सगळ्या जगात माझ्या पायाचा वास पसरतो आहे..... सगळे माझ्यापासून दूर जा..... ती गेली तसे तुम्ही जा..... मी एकटा राहीन..... एकटा सहन करीन..... सगळा वास माझ्या श्वासात भरून घेईन पण तुम्हाला कोणाला त्रास देणार नाही मी..... ह्या रस्त्यावर सुद्धा पाय ठेवण्याची लाज वाटते मला..... हा सुद्धा अपवित्र होईल..... पण तसं व्हायचं नव्हतं..... या रस्त्यानं मला जवळ केलं..... माझ्याशी बोलतो..... माझा हा दुखरा पाय जवळ कुरवाळतो..... यानं मला दिलासा दिला..... निर्विकारपणे जगायला शिकवलं..... माझ्या स्पर्शातली भावना काढून टाकली.....
ती	स्पर्शातली भावना अशी नष्ट होते ? ..... कुठलीच भावना कधीच नष्ट होत नसते..... भोगून भोगून जास्त पेटते..... अतृप्त राहाते.....
तो	जा तुम्ही..... आता बराच वेळ झाला..... जा म्हणतोय ना..... कां आलात तुम्ही इथे..... हीच जागा सापडली तुम्हाला..... कुणी भेटू नये म्हणून ही जागा मी निवडली..... कुणाची सावली सुद्धा नको मला..... तो तुम्ही इथं आलात..... खरंच कुणाची वाट बघताय की नाही कुणास ठाऊक..... मघापासून मला बोलायला भाग पाडताय..... खरंच कुणाची वाट बघताय तुम्ही ?
ती	त्याची..... ?
तो	कोण तो.....
ती	माहित नाही..... स्पर्श मरत असतो कधी ?
तो	कोण तो ? फालतू बडबड बंद.....
ती	तुम्हाला काय करायचंय त्याच्याशी ?
तो	मला काहीच करायचं नाही..... तुम्ही इथून आता जा.... मला झोपायचंय.....
ती	तुम्ही इथं झोपता ?
तो	आता त्यावर देखील तुमचा आक्षेप आहे ?..... आता हळूहळू मंद वारा सुटेल..... शांत..... सर्व भावनांपासून मुक्त..... कुठेतरी दूरवर वेळूधून सुरू होईल..... आणि मी..... स्वतः आणि माझा सखा निद्राधीन होऊ..... तुम्ही जा ना..... मी पोहोचवून देऊ तुम्हाला..... तशी रात्री बेरात्री फिरायची तुम्हाला

सवय असेलच म्हणा. येऊ मी पोहेचवायला. बाकी कसली नसली तरी जीवाची भीती असेलच.....
चला..... कुठं राहाता तुम्ही.....

ती — नको. मीच जाईन थोड्या वेळानं..... थोडावेळ थांबले तर चालेल ना.....

तो — रात्रभर राह्यलात तरी चालेल..... हे सार्वजनिक ठिकाण आहे..... माझं ऐका, घरी जा.... मी असा परका......

ती — माझ्या माणसानं तरी.....

(दृष्य बदलतं, तो ऑफीस मधून आल्यासारखा येतो.)

तो — अरे ! तू अजून तयार झाली नाहीस..... मी सकाळीच सांगून गेलो होतो: आपल्याला आज पार्टीला जायचयं..... चल लवकर तयार हो मी आलोच चेन्ज करून.....

ती — आज मी आले नाही तर चालणार नाही कां ?

तो — नाऊ कम ऑन..... डोन्ट बी सिली..... तुला माहितच आहे तुझ्याशिवाय मी कधीच पार्टीला जात नाही..... तू नाहीस तर पार्टीत मजाच काय ?

ती — आज मला थोडं बरं नाही.....

तो — थोडसंच बरं नाहींना..... एक छोटा डोज घे माझ्याबरोबर..... मी मारणारच आहे..... सगळी बडी धेंड येणार आहेत..... त्या डेलीगेशनला ट्रीट करायचंय..... आज तर चलायलाच पाहिजे..... चल उठ..... प्लीज..... माझ्यासाठी..... माझं इटलीना जाण्याचंही चाललंय.....

ती — तुम्ही जाणार.....

तो — आजच्या पार्टीवर अवलंबून आहे.....

ती — मग मी.....

तो — इथंच..... फारतर..... माहेरी..... पण नको..... इथंच ठीक आहे..... जरा सोशल हो..... क्लब, पार्टी, स्वीमींग..... किटी पार्टी..... सगळं एंजॉय कर..... चल..... हे सगळं तुझ्याचसाठी आहे ना.....

ती — कुणास ठाऊक.....

तो — म्हणजे..... तुला जास्तीत जास्त सुखी करता यावं म्हणूनच करतोय ना मी.... चल....

सुलू — फक्त आजचा दिवसच म्हणतेय ना.....

तो — मी पण आजचाच दिवस म्हणतोय..... माझं करियर त्यावर अवलंबून आहे..... रंगनाथन साहेवांनी खास निमंत्रण दिलंय तुला.....

सुलू — मला आवडत नाही तुमच्या पार्ट्या..... तिथलं वातावरण..... ते बेभान होईपर्यंत पिणं..... मी एकटी पडते.....

तो — तुला थोडं बदलावं लागणारच आहे..... हायब्रो सोसायटीत वावरायचं म्हणजे..... हे एवढं चालतंच..... अशा पार्ट्यांतच कॉंटॅक्ट्स वाढतात..... पक्के होतात..... हे सगळं अपरिहार्य आहे..... चल, डोंट वरी अबाऊंट नथींग.... उशीर होतोय आपल्याला.....

सुलू — आज नकोना.....

तो — पण, कां ?

सुलू — तेच.....

तो — Oh God ! तुलाही आजच लहर आली सुटी काढायची.....

सुलू — माझ्या हातात का आहे..... ?

तो — Ok ! चल. काही बिघडत नाही..... चल लवकर..... लवकर पोहोचलं पाहिजे..... जरा मेकअप कर..... नाहीतर एवढ्या प्रयत्नांनी जमवून आणलेलं..... वाया जाईल..... ही कटथ्रोट फाईट असते सुलू..... आपल्या जवळचे सगळे कार्डस वापरावे लागतात.... यू आर माय ट्रमकार्ड.....

(दृष्य बदल..... प्रकाशाचा रंग मंद व्हायोलेट होतो.... पार्टीचं संगीत सुरू होतं.... ती बेंचं वर बसलीय.... तो साहेब म्हणून थोडा झोकांडी देत येतो..... हातात ग्लास असण्याचा अभिनय.... घोट घोट पितो)

तो — अरे तुम्ही एकट्याच बसलात..... तुमचे साहेब कुठे आहेत ?

सुलू — असतील इथंच कुठं तरी.....

तो — तुम्ही पण कंपनी शोधायची..... इतके तर लोक आहेत इथं..... मी पण आहेच... चला... तिकडे फ्लोअरवर डान्स सुरू आहे..... let us dance.....

सुलू — नको..... मला जमत नाही.....

तो — बॅड मॅनर्स..... असं म्हणायचं नसतं..... मी शिकवतो तुम्हाला..... चला.... कमॉन..... बी ए गुड गर्ल..... तसं तुम्हाला अजून बरंच शिकायचं आहे..... मी शिकवीन हळूहळू..... *(तिला उठवतो)* हं..... असा..... वन... टू... थ्री... फोर....

सुलू — नको साहेब..... माझी तब्येत बरी नाही.....

तो — तेही ठाऊक आहे मला..... तुझ्या नवऱ्यानंच सांगितलं..... But I like it....

सुलू — त्यांनी सागितलं ?

तो — सांगावंच लागणार..... त्याला इटलीला पाठवणं माझ्या हातात आहे.... म्हणजे तुझ्या हातात आहे.... तू माझ्या हाती आलीस की तो इटलीला..... ज्या दिवशी तुला पाह्यलं.... बस्सं. ठरवलं ही आपलीच.... चल, आता कळलं ना.... It's a point of no return...तुझं हे सोज्वळ सौंदर्य.... पागल केलं मला.... चल आता....

सुलू — सोडा..... सोडा मला..... जाऊ द्या..... मी तशी नाही. पाया पडते मी तुमच्या..... सोडा, दया करा माझ्यावर.....

(तो हसत राहातो..... ती स्वतःभोवती गरगर फिरत राहाते कोसळून पडते. दृष्य बदल)

ती — त्या चिमणीची गोष्ट तुम्ही मला का सांगत होता ?

तो — सहज.....

ती — नाही.... तुम्ही ओळखत असला पाहिजे.....

तो — नाही.

ती — तुम्ही खोटं बोलत आहात.... तुम्हीही..... त्याच जातीतले.....

तो — हे सगळं एवढं अशुद्ध आहे ? प्रत्यक्ष नवऱ्यानं तुला यात ढकललं..... आताही तोच येणार आहे तुला न्यायला ?

ती — आधी तो.... त्याचा साहेब.... मग आणखी कुणी.... ओळखपाळख असल्याला महत्त्व नव्हतं..... तो बसलाय तिकडे..... इटलीत आहे..... मी आता ऑफीसची प्रॉपर्टी झालेय.....

तो — माहेरी कां नाही निघून जात.....

ती — ह्या गोष्टी लपून थोडीच राहतात..... तो ही दरवाजा बंद झालाय. *(तो तिला उठवायला जातो)* नको मला स्पर्श करू नका..... मी अपवित्र आहे..... किळसवाणा स्पर्श आहे माझा..... तुम्ही भ्रष्ट व्हाल.....

तो चिमणीचं घरं होतं शेणाचं....

ती नका हो.... ती गोष्ट सांगू नका.... त्या बारक्या चिमणीचं दुःख किती विदारक असेल.... *(पॉज)*..... आता मला सवय झालीय..... की कुणी आलं ना की मी अस्वस्थ होते..... पिराळते..... *(उठते..... त्याच्याजवळ जाते)* तुमच्या जखमेवर हात फिरवू मी.... फुंकर घालू.... पट्टी बदलून देऊ..... चला बसा..... *(तो दूर जातो)*

तो नको..... दूरच राहा माझ्यापासून..... *(ती बेंचवर झोपते..... तळमळते.... थोड्यावेळाने शांत होते. तो तिची तळमळ बघत राहतो.)* तुमचं बरोबरंच आहे..... सवय.... इतकी तीव्र होते.... की जीव गुदमरतो माझा....

मला समजून कां नाही घेतलंस तू लले.... माझी सगळी तडफड तुझ्याचसाठी होती ना..... तुला काही कमी पडू नये म्हणूनच मी जीवापाड मेहनत करत होतो ना..... आपल्याला मूल झालं नाही..... पण त्यात माझा काय दोष..... असला तरी..... तू समजून घ्यायला नको होतं ?..... मी तरी जास्त काय मागत होतो तुझ्यापासून..... फक्त प्रेमाची, आपुलकीची एक फुंकर..... मी जीव गहाण टाकला तुझ्यासाठी.....

बाकी माझ्यात काय कमी होतं.... संसाराची मला किती हौस होती.... तू थोडी वाट बघायला हवी होतीस..... बघ लले माझी सावली.... कशी रस्त्यावर पसरली आहे.... बघ.....

ती कां असं टाकून गेलात तुम्ही मला..... तुमच्या संगतीनं हेही दुःख मी सहन केलं असतं.... निदान समाधान वाटलं असतं.... मी जो अत्याचार सहन करतेय तो तुमच्यासाठी..... तुम्ही नुसती सहानुभूती दाखवली असती तरी मला स्वर्ग मिळाल्याचा आनंद झाला असता.... पण आता तर तुमची पत्र येणंही बंद झालीत..... तुम्ही कुठे आहात हे ही मला माहित नाही..... तीन वर्षात माझी काय गत झालीय बघा.... आज रस्त्यावर आलेय..... बघा माझी सावली कशी रस्त्यावर पसरलीय..... *(पॉज)*..... चला निघायला हवं मला.....

तो हो. खूपच वेळ झाला..... जा तुम्ही. तो आलाच तर मी पाठवीन त्याला तुमच्या घरी..... मला वाटतं आता तो येणारही नाही.

ती कोण ?

तो तुम्ही त्याची वाट बघत होता नां ?

ती तो येणारच नव्हता..... तसं कुणाशी ठरलंही नव्हतं.....

तो तुम्ही ?

ती सहज..... सवय..... इलाज नाही.

तो थांबा..... बघा मी काही जास्त पैसे देऊ शकणार नाही.... पण तुम्ही म्हणाल तर मी चलतो.....

ती मला गरज होती तेव्हा म्हणाला असता तर मी कदाचित चला म्हटलं असतं.... आता नको.... गरज सरली माझी..... तुम्ही शांत झोपा.....

(ती जाते. तो बेंचावर पडतो..... तो तळमळत असतांना रस्ता प्रकाशित होतो.... हळूहळू पडदा.)

■ ■

गजानन पांडे, 'कांचन', खरे टाऊन, धमपेठ, नागपूर ४४००१०

अनुक्रमणिका

बंधमुक्ता

धनंजय जोग

विहारच्या एका जमीनदाराच्या जनानखान्यातील दिवाणखाना. मागच्या बाजूला एक दरवाजा. त्यातून बगीचा दिसतो आहे. डावी, उजवीकडे एक एक दरवाजा, एक दिवाण, एक सिंहासन सदृश खुर्ची, एक टेबल त्यावर फळे, मद्याची पितळी सुरई, थोडी मिठाई इ. दुसऱ्या लहान टेबलावर एक लहान दागिन्यांची पेटी त्यातून मोत्यांची लांब माळ लोंबते आहे.

पडदा उघडतो तेव्हा जमीनदाराच्या आवडत्या दिवाणावर पहुडलेल्या. लैला खाली गालिच्यावर बसून तंबोरा घेऊन गाणे म्हणत बसलेली. रेहाना लोडाला टेकून वारा घेत बसलेली. चंपा शेजारीच बसून सफरचंद खाते. लैला गाणे बंद करते. एक लांब जांभई देते. चंपाही जांभई देते आणि एकदम रेहानाच्या हातातला पंखा हिसकावून घेते. तिला चिडविते. गुदगुल्या करते. दोघीही हसतात.

इतक्यात बाहेरून आरडाओरडा ऐकू येतो. मुन्नीबाई रूपा पाखरेला फरफटत आत आणते. रूपा प्रतिकार करते आहे. तिचे कपडे फाटलेले, केस अस्ताव्यस्त. हातात पर्स घट्ट ठेवलेली. त्या पर्सने मुन्नीबाईला मारण्याचा प्रयत्न करते आहे.

रूपा — सोड मला, सोड...... सोड म्हणते ना......

मुन्नीबाई — *(हात सोडते)* इथेच बसून रहा. खबरदार हललीस तर.

रूपा — मुळीच बसणार नाही. मला आताच्या आता तुमच्या मालकाला भेटायचं आहे. *(किंचाळते)* ऐकू आलं का ? मला तुमचा जो कोणी मालक असेल त्याला भेटायचं आहे.

मुन्नीबाई — आमचे मालक जमीनदार ठाकूरसाहेब आहेत.

रूपा — असस होय ! त्यांना म्हणाव मला त्यांना ताबडतोब भेटायचंय. *(आजूबाजूला बघते. हा जनानखाना आहे हे लक्षात येताच पुन्हा चिडते. मुन्नीबाईच्या अंगावर धावते.)* मला ठाकूरसाहेबांना भेटायचं आहे.

मुन्नीबाई — *(शांतपणे तिचे हात धरून)* ते येतीलच इतक्यात.

रूपा — इतक्यात नाही - आत्ताच भेटले पाहिजेत ते मला. तुम्ही मला जबरदस्तीने उचलून आणलंत हे त्यांना ताबडतोब कळलं पाहिजे.

मुन्नीबाई — आम्ही फक्त त्यांची इच्छा पूर्ण केली.

रूपा — *(आश्चर्याने)* तुला..... तुला म्हणायचं आहे की माझ्यासारख्या एका असहाय्य आणि निरपराध स्त्रीवर जुलूम करण्याला त्यांची संमती होती ?

मुन्नीबाई — संमती नाही, हुकूम होता त्यांचा.

रूपा — हा शुद्ध अन्याय आहे. आणि मी तो सहन करणार नाही. मला तुम्ही इथे डांबून ठेवू शकत नाही......

मुन्नीबाई — तू इथेच राहशील.

रूपा	*(तिला ढकलत)* जाऊ दे मला.
मुन्नीबाई	*(रूपाला ढकलते, रूपा पडते)* तू इथेच राहशील.
रूपा	*(रागाने, वेडावून)* तू इथेच राहशील, ह्याशिवाय काही बोलता येत कां ? नशिब माझं तुला मराठी तरी कळतंय !
लैला	इथल्या प्रत्येकाला मराठी बोलता येतं.
चंपा	इथल्या प्रत्येकाला मराठी शिकावंच लागतं.
कमल	अनेक वर्षांपासून ही इथली रीतच आहे.
रूपा	आभारी आहे मी त्याबद्दल. कमीतकमी मी काय म्हणते आहे ते तरी कळेल तुम्हाला. पाटण्याच्या कलेक्टरकडून पत्र घेऊन मी प्रवासाला सुरवात केली. त्या ओसाड माळरानातून जेमतेम एक दिवस प्रवास केला असेल तोच त्या दरोडेखोरांनी आमच्यावर हल्ला केला. आता कळल की ते दरोडेखोर नसून तुमच्या जमीनदाराचे नोकर होते.
चंपा	तुम्ही कुठे जाणार होतात ?
रूपा	मी माझ्या पतीच्या कॅंपवर जात होते. माझे पती अजीत नाडकर्णी ते पुरातत्त्ववेत्ता आहेत.
चंपा	पुरात...... ? हा शब्द आज पहिल्यांदाच ऐकला मी.
रूपा	पुरातत्त्ववेत्ता ! ते उत्खनन करतात...... खोदतात.
चंपा	अच्छा ! म्हणजे माळी आहेत.
रूपा	माळी नाही. ते किल्ले, मंदिरं वगैरे खोदतात.
चंपा	चोरी करायला ?
रूपा	मूर्ख आहेस ! माझे पती इतिहास संशोधन मंडळाचे एक प्रमुख तज्ञ आहेत. त्यांचे काम सरकारच्या संमतीने सुरू आहे. त्यांनी कुठलाही गुन्हा केलेला नाही आणि मी देखील गुन्हेगार नाही.
चंपा	गुन्हेगारांना इथे आणलं जात नाही. त्यांना तळघरातील कोठडीत ठेवतात.
लैला	साप असतात त्या कोठडीत.
रूपा	म्हणजे गुन्हा सिद्ध होण्याआधीच शासनाला सुरवात. छान ! अजीतने बरोबरच सांगितले होते की इथले लोक अगदी जंगली आहेत म्हणून. मीच मूर्ख म्हणून इथे यायला निघाले. हे काय ओढवलंय रे देवा माझ्यावर ! हे चूक आहे..... चूक आहे हे.
	(जमीनदारीणबाई आत येतात. त्यांनी उंची कपडे घातले आहेत. अलंकारही.)
जमीनदारीण	नाही. नाही ह्यावेळेस तरी काहीच चुकलेलं नाही. त्यापूर्वी काही वेळा चुका झाल्या. दोन महिन्यापूर्वी एक बाई पळवून आणली तर ती ख्रिश्चन धर्मोपदेशक निघाली. ब्रिटिश सरकारच्या भीतीमुळे तिला सोडून द्यावं लागलं. ते असो ! तू जरा इकडे बघ. अहाहा ! सुंदर. खरोखरच सुंदर ! बैस, खाली बैस.
रूपा	मी इथे बसायला आलेली नाही.
जमीनदारीण	*(सिंहासनावर बसत)* ठीक आहे. पण ह्या अशा पिंजऱ्यातल्या वाघासारख्या फेऱ्याही घालू नकोस. त्या श्रमांनी तुझा सुंदर चेहरा कोमजून जाईल.
रूपा	तुम्हाला माहीत नसेल पण इथे मी एक कैदी म्हणून आणली गेले आहे.
जमीनदारीण	मुली, तू इथं कैदी नाहीस.
रूपा	*(उपहासाने)* मग ती राक्षसीण काय माझं सौंदर्य बघायला उभी आहे ?
जमीनदारीण	मुन्नीबाई, बाहेर जा. इथं उभं रहायची काहीही गरज नाही. *(मुन्नीबाई सलाम करते व बाहेर जाते)* अग मुली तू इथे आमची पाहुणी आहेस. मला तर इतका आनंद झालाय तुला पाहून ! ती जागा

भरून काढायला तुझ्यापेक्षा योग्य स्त्री कोण असेल!

रूपा — जागा भरून काढायला? कोणती जागा? कुणाची जागा?

जमीनदारीण — अग माझी जागा. त्यांनी तसं वचन दिलंय मला.

रूपा — त्यांनी कुणी?

जमीनदारीण — ठाकुरसाहेबांनी! त्यांनी वचन दिलंय मला की माझी जागा घेऊ शकेल अशी स्त्री मिळताच ते मला मुक्त करतील.

रूपा — जागा? कोणती जागा?

जमीनदारीण — माझी जागा, म्हणजे काही लग्नाची बायको नव्हे पण तरीही त्यातल्या त्यात मनाची. स्वतःला जमीनदारीणबाई म्हणवून घेता येतं.

रूपा — पण...... पण तुम्ही महाराष्ट्रीयन वाटता.

ठाकूरसाहेब — अगदी बरोबर ओळखलंस, आता आलं लक्षात माझी जागा तूच का घेऊ शकतेस ते?

रूपा — काहीही लक्षात आलेलं नाही माझ्या. आणि जरी आलं तरीही मला ती जागा नकोय. मी पळून जाईन इथून.

ठाकूरसाहेब — पळून जाण्याचा मूर्खपणा करू नकोस. गावावाहेर पंचवीस मैलपर्यंत फक्त हिंस्र श्वापदांनी भरलेले घनदाट जंगल आहे व त्यापलिकडे लांबच लांब माळरान. वाघाच्या तावडीतून सुटलीस तरी पाण्यावाचून मरशील. अरे हो! तुला तहान लागली असेल नाही कां. सरवत घेशील?

रूपा — नको.

चंपा — ती रागावली आहे.

कमला — काय अवतार करून घेतला आहे.

लैला — ही काही इथे शांतपणे रहायची नाही.

जमीनदारीण — तुम्ही मुली बाहेर बगीच्यात जा बरं. इथं काही काम नाही तुमचं. *(चंपा, कमल व लैला बाहेर जातात.)* या मुलींना धाकात ठेवलंस म्हणजे तुला कसलाही त्रास होणार नाही. मला कधीच झाला नाही. जितक्या मुली तितके प्रकार. हजारो रुपये देऊन आणलेल्या.

रूपा — मला काही विकत घेतलेले नाही. मी कोण आहे..... माहीत आहे तुम्हाला?

जमीनदारीण — *(एक कागद उघडून)* अर्थात! सगळी माहिती इथे लिहिलेली आहे. "नाव : रूपा पाखरे. विवाहित. वास्तव्य मुंबई." मुंबई. अहाहा! मुंबई-काय सुंदर शहर - ती चौपाटी, मलबार हिल, मरीन ड्राईव्ह सगळं सगळं कालच पाह्यलासारखं आठवत मला. माझं नाव सीमा नाडकर्णी होतं..... म्हणजे अजूनही आहे... अं..... हो, पण मी तुझी माहिती सांगत होते..... तर "वय तीस. मला इथे आणलं तेव्हा मी फक्त २५ वर्षांची होते.... हं, तर..... 'मध्यम उंची, बांधेसूद, लांब दाट काळे कुरळे केस, ओठ लाल, मान....."

रूपा — बस करा ते वर्णन. फक्त हे सांगा की तुम्हाला हे वर्णन कळवलं कुणी.

जमीनदारीण — तुझ्याबरोबर पाटण्याहून जो नोकर आला होता त्यानीच. मी सुद्धा अशीच पकडल्या गेले होते. आमच्या नाटक कंपनीचं पाटण्याला दिवाळं निघालं. माझ्याजवळ बरेच पैसे होते..... म्हटल बघू या. आसपासचा प्रदेश वीस वर्ष झाली त्याला! त्या प्रवासाचा शेवट ह्या इथे झाला. ही अपेक्षा केली नव्हती पण अपेक्षाभंगही नाही झाला! कसलंच दुःख नाही.

रूपा — *(धक्का बसल्याप्रमाणे)* ..... दुःख..... कसलंच नाही?

जमीनदारीण मी म्हणते कां असावं? एवढं ऐश्वर्य व आराम मला कुठे मिळणार होता?

रूपा हे बघा, तुमच ते ऐश्वर्य आणि तो आराम तुम्हालाच लखलाभ होवो. मला एवढंच ठाऊक आहे की मी, एक भारतीय स्त्री, एका रखेलीचं जीवन ह्या जनानखान्यात घालवायला कधीच तयार होणार नाही.

जमीनदारीण ही फळं थोडी चाखून तर पहा.... फारच चविष्ट आहेत.

रूपा तुमचा पाहुणचार मला नको. मला फक्त इथून माझी सुटका करून घ्यावयाची आहे. तुझ्या मदतीची अपेक्षा करणेही मूर्खपणा आहे आणि मी तो करणार नाही. म्हणून मला तावडतोब ठाकुरसाहेबांना भेटायचं आहे. तुला माहीत नसेल पण माझे पती फार मोठ्या पदावर आहेत आणि ते माझी सुटका कधीही घडवून आणू शकतात. शिवाय तुमचे ठाकूरसाहेब विनशर्त माफी मागतील ती वेगळीच. तू माझ्याहून लहान असतीस तर मी तुझी सुटका करणे हे आपलं कर्तव्य समजलं असतं. पण रखेलीचं जीवन तू स्वखुशीने निवडलेलं दिसतं आहे. पण म्हणून माझ्यासारखी एक पतिव्रताही तुझ्याच मार्गाने जाईल असं समजण्याचा मूर्खपणा तू करावास? तसले जीवन जगण्यापेक्षा मी मृत्यू स्वीकारीन. त्या तिरस्करणीय आलिंगनाची मी कल्पनाही करू शकत नाही.

लैला, यास्मीन व चंपा : ठाकूरसाहेब! ठाकूरसाहेब येताहेत!

(मुन्नीबाई अदबशीरपणे उभी. दासी लोटांगण घालतात, जमीनदारीणबाई उठून स्वागत करतात.)

(ठाकूर देखणा, उंच व उच्च मराठी बोलणारा.)

दासी *(एकत्र)* : आदाब! आदाब! आदाब!

(ठाकूर अधाशी नजरेने रूपाला न्याहाळतो आहे नंतर तो बोलत असतानालैला दिवाणावर व इतर दोघी जमिनीवर पहुडलेल्या. जमीनदारीणबाई खुर्चीजवळ उभ्या. मुन्नीबाई बाहेर जाते.)

ठाकूरसाहेब माफ करा रूपादेवी, आम्ही जातीनं आपलं स्वागत करायला हवं होतं.

रूपा जरूर! जरूर ठाकूरसाहेब. म्हणजे तुम्हाला माझी बेइज्जतीही पहायला मिळाली असती.

ठाकूरसाहेब माझ्या इसमांनी आपली बेअदबी केली?

रूपा त्यांनी माझे कपडे फाडले.

ठाकूरसाहेब त्यांना आताच्या आता फटके लगावल्या जातील!

रूपा नको! चूक त्यांची नव्हती. मीच प्रतिकार केला..... साहजिकच!

ठाकूरसाहेब अरेरे! अरेरे!

रूपा अहो! माझ्यामुळे त्यांना शिक्षा होऊ देऊ नका!

ठाकूरसाहेब मंजूर आहे आम्हाला! आपणांमुळे ते सुटले हेही त्यांना सांगितलं जाईल. माझ्यासारखेच तेही प्रभावित होतील!

रूपा काही गरज नाही. तुम्ही मला इथे कैदेत ठेवलंय आणि ह्याचा जाब तुम्हाला सरकारला द्यावा लागेल.

ठाकूरसाहेब काहीही उपयोग नाही. माझ्या दरबारात तुमच्या सरकारचा कुणीही प्रतिनिधी नाही. माझं राज्य छोटं असेल पण माझं आहे.

रूपा माझी सुटका जर झाली नाही तर...... तर मी अन्नत्याग करीन.

जमीनदारीण काही भरोसा नाही. करेलही! अहो तहान लागली असेल म्हणून सरबत देऊ केलं ते सुद्धा घेतलं नाही तिने.

ठाकूरसाहेब	तुम्ही ते योग्य रीतीने, अदबशीरपणे देऊ केलं नसेल. चंपाराणी !
चंपा	आज्ञा महाराज.
ठाकूर	ते सोन्याचे चषक आण. *(चंपा जाते)*
रूपा	सोन्याच्या चषकातून प्यायलं म्हणून काही विषाचं अमृत होत नाही. माझा सन्मान करायचाच असेल तर फक्त माझी सन्मानपूर्वक पाठवणी करा. तुमच्या ह्या जनानखान्यात मी एक क्षणही राहू शकत नाही. *(चंपा चषक घेऊन येते)*
ठा. साहेब	*(चषक घेत)* राजेमहाराजांशिवाय कुणाहीसाठी हे चषक वापरलेले जात नाहीत. हे बघा, मी स्वतः आपल्या हाताने हे भरतो आहे. ह्याहून जास्त सन्मान मी करू शकत नाही. *(चंपाला)* हे रूपादेवींना दे.
चंपा	हे आण, ते आण, हे कर, ते दे..... मी काही कुणी गुलाम नाही म्हटलं. एका जमीनदाराची मुलगी आहे.
ठाकूर साहेब	चंपाराणी. तुझ्या ठुमकदार चालण्याचं सौंदर्य न्याहाळता यावं म्हणून आम्ही तुला ही कामं सांगितली. तू कुणी गुलाम आहेस म्हणून नाही.
	(चंपा हसून उठते. लचकत, मुरडत जाऊन चषक रूपासमोर धरते. ती घेत नाही.)
	रूपादेवी, आपण घेतलं नाहीत तर आम्हीही घेऊ शकणार नाही. सरबत घेतलंत तर घसा ओला होईल अन् मग आपल्याला शांतपणे बोलताही येईल. *(रूपा क्षणभर विचार करते व एकदम चषक घेऊन गटागटा पिते. ठाकूरसाहेबही पितात.)*
	पण मला वाटतं आधी तुमच्यासाठी दुसऱ्या चांगल्या पोषाखाची व्यवस्था करायला हवी. रेहाना !
रेहाना	*(आत येत.....)* आज्ञा महाराज.
ठाकूरसाहेब	ही रेहाना, गुलामांची प्रमुख आहे ही.
जमीनदारीण	हिच्यासोबत जा अन् कपडे बदलून ये.
	(रूपा रेहानासोबत जाऊ लागते पण अचानक थांबते.)
रूपा	ठाकूरसाहेब, आपल्या मते स्त्री ही एक बाजारात विकत घेण्याची वस्तू आहे. नाही कां ? माझी किंमत किती लागेल..... सांगू शकाल ? अन् मग माझ्या किमतीपेक्षा जास्त पैसे मी मोजले तर मला मुक्त करावं लागेल.
ठाकूरसाहेब	म्हणजे तुझा लिलाव करायचा अन् फक्त आपण दोघांनी बोली बोलायची असच नां ? वाहवा ! आम्ही बेहद्द खूष आहोत आपल्या कल्पनेवर. रूपादेवी तुम्ही केवळ सुंदरच नाही तर कल्पकही आहात. मी खरोखरच भाग्यवान आहे व म्हणूनच देवानी तुम्हाला इथे पाठवलं.
रूपा	मला देवानी पाठवलं नाही तुमच्या नोकरांनी जबरदस्तीने उचलून आणले आहे.
ठा. साहेब	ते जाऊ द्या हो ! आम्ही लिलावाचा खेळ खेळण्यासाठी अधीर झालो आहोत, आमच्याकडून नेहमीच रेहाना बोली बोलत असते. आजही तीच बोलेल.
रेहाना	जशी आज्ञा महाराज !
जमीनदारीण	तुम्हाला हा फालतू खेळ खेळायचा असेल तर मग हे लागेलच. *(रूपाचे वर्णन लिहिलेला कागद रेहानास देते)*
रूपा	तुम्हाला वाटतं तितका फालतू नाही हा खेळ. कमीतकमी माझी बाजारात काय किंमत लागते ते तरी कळेल. पैसे माझ्याही जवळ आहेत. बँकेत माझी दोन हजार आठशे तीस रुपये शिल्लक आहे.
रेहाना	जरा दोन क्षण शांत उभ्या राहता का ?
	(हातातल्या कागदावर हुकूम वर्णन आहे की नाही हे निरखून बघते. डोळ्यांचा रंग बघते. हातपाय

दाबून बघते. बाजारात एखादी वस्तू उलट पालट करून पारखावी त्याप्रमाणे)

रूपा *(तिचा हात ढकलत)* हे काय चालवलं आहेस तू ?

जमीनदारीण माल वर्णन केल्याप्रमाणे आहे की नाही ते बघतेय ती !

रूपा *(ठाकूरसाहेबांना)* हा असला अपमान आवश्यक आहे का ?

ठाकूरसाहेब ती खरेदीची पद्धतच आहे.

रेहाना *(परत आपल्या जागेवर येत)* किंमत फार जास्त आहे.

ठाकूरसाहेब हरकत नाही ! आम्ही ती द्यायला तयार आहोत.

लैला-कमला-चंपा : ते किंमत द्यायला तयार आहेत.

रूपा मी बोली वाढवू शकते.

लैला-कमला-चंपा : ती बोली वाढवते आहे.

ठाकूरसाहेब पण तुझ्याजवळची सगळी शिल्लक तू आधीच लावली आहेस.

रूपा केवळ बँकेतली. त्याशिवाय माझे हजार रुपये फिक्स्ड् डिपॉझिटमधेही आहेत.

रेहाना आणखी एक हजार ! महाराज हा सौदा परवडण्यासारखा नाही. हे वर्णन...

ठाकूरसाहेब ते वर्णन आम्ही वाचलं आहे.

रेहाना महाराज, हे वर्णन अपूर्ण आहे. वय दिलं आहे पण उंची, वजन दिलेलं नाही. तसेच किती दात शाबूत आहेत हेही लिहिलेलं नाही. विवाहित एवढंच लिहिलं आहे. किती वर्षांपासून ते नाही आणि मुख्य म्हणजे मापंही दिलेली नाहीत.

रूपा माझ्या लग्नाला दहा वर्ष झाली... आता तर कळलं.

रेहाना ऐकलंत महाराज. आधीच वय ३२ त्यात दहा वर्षापासून विवाहित. हा भाव मुळीच पटण्यासारखा नाही. त्याशिवाय कपड्यांवरून पारख करणे म्हणजे मूर्खपणाचं ! *(रूपाची साडी उकलण्याचा प्रयत्न करते. सगळे खिदळतात)*

जमीनदारीण अन् एका वर्षाची सुद्धा गॅरंटी दिलेली नाही.

रेहाना हो ना ! महाराज ह्या सगळ्या गोष्टी लक्षात घेऊनच आपण निर्णय घ्यावा.

रूपा ठीक आहे. मी स्वतःच खात्री द्यायला तयार आहे. हात पाय आदी सर्व शाबूत आहेत. साध्या जखमेचीसुद्धा खूण नाही.

ठाकूरसाहेब मग विचार करण्याचा प्रश्नच नाही. मीही हजार रुपये वाढवायला तयार आहे.

रेहाना महाराज हा शुद्ध अविचार आहे. ही पैशाची उधळपट्टी आहे. दोन बकऱ्या आणि एक पोतं धान्य ह्यापेक्षा जास्त किंमत नाही हिची.

रूपा थांबा ! त्याशिवाय माझ्याजवळ काही दागिने आहेत. चार सोन्याच्या बांगड्या, एक मंगळसूत्र, दोन रिंग्ज, आणि एक खऱ्या मोत्यांची माळ. त्या माळेचीच किंमत पाचशे रुपये आहे.

रेहाना माळ दाखव मला.

(रूपा माळ काढून रेहानाजवळ देते. रेहाना ठाकूरसाहेबांना देते)

ठाकूरसाहेब ही फडतूस माळ अन् चार सोन्याचे दागिने इतकंच आहे तुझ्याजवळ तुझ्यां सौंदर्यात भर घालायला ?

लैला *(किंचाळते)* बरा इतकेच दागिने !

चंपा च्-च्-च् !

कमला काय दुर्दैव आहे बिचारीचं !

ठाकूरसाहेब *(माळ फेकून देत)* लैला, रूपादेवींच्या लायक असा दागिना आण.

लैला — *(दागिन्यांचा डबा उघडून ठाकूर साहेबांजवळ देत)* आपणच निवड करावी महाराज.

चंपा — इतक्या कमी दागिन्यांवर ही जगू तरी कशी शकते?

कमला — मी तर आत्महत्याच केली असती बाई.

(ठाकूरसाहेब मोठाल्या मोत्यांची एक लांबचलांब माळ काढतात. रूपाच्या तोंडून नकळत 'अहाहा, किती सुंदर' असे शब्द निघतात. पण ती स्वतःला सावरते अन् उजवीकडे आत पळते, पाठोपाठ रेहानाही. सर्व हसतात.)

ठाकूरसाहेब — पाहिलंत, रूपादेवींनी आल्याआल्याच काय मजा आणला. मला तर अगदी समोर सोन्याचं ताट वाढून ठेवलं असावं तसं वाटतंय.

जमिनदारीण — खरंच मजा आली. पण मला उद्याच्या समारंभाची सगळी तयारी झाली की नाही ते बघायचंय अन् मी बसले आहे आपली इथेच! *(जाते)*

ठाकूरसाहेब — *(दिवाणाजवळ जातात व सर्व मुलींना जवळ बोलावतात)* काय कशी वाटली आमची नवी राणी

लैला — खरं सांगू की तुम्हाला बरं वाटावं म्हणून खोटं बोलू?

ठाकूरसाहेब — नको! आम्हाला बदल हा नेहमीच प्रिय असतो तेव्हा आज खरं बोल.

लैला — आम्हाला नाही बाई आवडली!

चंपा — आपण तिला परत पाठवाल अशी आम्ही आशा करतो.

कमला — ती शिष्ट अन् रागीट वाटते. आमचं तिच्याशी मुळीच पटणार नाही.

चंपा — अन ती सुंदरही आहे. तुम्ही आमच्यापेक्षा तिच्यावरच जास्त प्रेम कराल.

ठाकूरसाहेब — मुलींनो, तिला मिळविण्याकरता माझा बराच पैसा व श्रम खर्च झाला आहे. मी तुमच्या सगळ्या इच्छा पूर्ण करतो अन् तुम्ही मात्र माझी ही एक छोटीशी इच्छाही पूर्ण होऊ देऊ नये! अरेरे, दुर्दैव! ही तीन कोमल हृदयं इतकी कठोर व्हावी! माझा विश्वासच बसत नाही. हे अशक्य आहे. बरं ते नंतर बघू. आधी आम्हाला उद्याच्या समारंभाची तयारी झाली की नाही ते पाहिलं पाहिजे. येतो आम्ही. *(जातो)*

लैला — *(उठून)* पाहिलंत, महाराज अगदी वेडे झाले आहेत तिच्यापायी.

चंपा — *(उठून)* पण तिला कुठे पसंत आहेत हे

कमला — *(उठून)* तिला तर फक्त सुटकेचेच डोहाळे लागले आहेत.

लैला — खरंच! आपण जर तिला पळून जायला मदत केली तर?

चंपा — करायलाच हवी!

कमला — तरच आपण सुखात राहू.

(तिघीही डोकी जवळ आणून कुजबूज करतात. तिघीही तीन दरवाज्यातून डोकावून बघतात)

लैला — *(हळू आवाजात)* मुन्नीबाई, मुन्नीबाई. *(मुन्नीबाई येते.)*

मुन्नी — आज्ञा बाईसाहेब!

लैला — मुन्नीबाई, ये थोडं सरबत घे.

कमला — *(तिला सिंहासनावर बसवत)* तू इतकी आवडतेस आम्हाला.

मुन्नीबाई — बाईसाहेब, ह्या आदराला मी पात्र नाही. *(तिघीही तिच्याभोवती जमतात. लैला सोन्याच्या चषकातून सरबत भरून मुन्नीबाईला देते. मुन्नीबाई खुपीने सरबत पिते, दुसऱ्या चषकातून लैला पिते)* बाईसाहेब किती सुंदर आहेत हे चषक. दहा हजार रुपये प्रत्येकी किंमत देऊन कलकत्त्याहून बोलावले होते हे ठाकूरसाहेबांनी.

चंपा — मुन्नीबाई, तुला आठवतं का, असे चार चषक होते अन त्यातले दोन चोरीस गेले.

मुन्नी	आठवतं म्हणजे काय, चांगलंच आठवतं. सहा गुलामांची मुंडकी उडवण्यात आली होती अन् तरीही ते चषक सापडलेच नाहीत.
लैला	अग सापडतील कुठून ? आम्हीच लपवून ठेवले होते ते. गंमत म्हणून.
चंपा	ते अजूनही आमच्याच जवळ आहेत.
मुन्नी	खरंच !
चंपा	अग पण आता आम्ही ते वापरूही शकत नाही. कुणाला कळलं तर ठाकूरसाहेब आमच्यावर रागावतील म्हणून आम्ही ठरवले आहे की ते दोन्ही चषक तुलाच देऊन टाकायचे *(मुन्नीबाई तावडतोब चषक उचलण्याचा प्रयत्न करते पण त्या मुली आधीच उचलून घेतात)* अं... हं...हं.. मुन्नीबाई, हे चषक तुला एकाच अटीवर मिळतील. हे चषक घेऊन तू इथून चालतं झालं पाहिजे.
कमला	वाड्याच्या मागच्या बाजूला सूर्यास्ताच्या सुमारास तू दोन घोडे घेऊन तयार रहा.
मुन्नीबाई	दोन घोडे ? दोन कशाला ?
कमला	कारण तुझ्याबरोबर ती रूपा येईल. ती देखील तुला त्याबद्दल पैसे देईल.
मुन्नी	ठीक आहे. मी आत्ताच जाऊन तयारीला लागते. सूर्यास्ताच्या वेळेला कोकिळेचा आवाज ऐकू आला म्हणजे तुम्ही तिला वाड्याच्या मागल्या दरवाजाने पाठवा. *(कमरेला लावलेल्या किल्ल्यांमधून एक किल्ली काढत)* ही किल्ली ठेवा.... मागल्या दरवाजाची. *(जाते) (तिघीही आनंदाने एकमेकीला मिठ्या मारतात. तेवढ्यात कुणाची तरी चाहूल लागते म्हणून दूर होतात. लैला डोकावून बघते)*
लैला	अग बाईसाहेब येत आहेत. *(जमीनदारीणबाई आत येतात तोवर लैला दिवाणावर झोपलेली व चंपा, कमला गालिच्यावर लोळत पडलेल्या.)*
जमीनदारीण	बाई ! बाई ! बाई ! बाई ! काय मेली कटकट ! आचाऱ्यांजवळचं केशर संपलेलं अंन् मुजरेवालीचा अजून पत्ता नाही. सगळी समारंभाची जबाबदारी मेली माझ्याच डोक्यावर.
चंपा-कमला	काय झाल बाईसाहेब ?
जमीनदारीण	कप्पाळ माझं ! ते जाऊ द्या. आधी हे सांगा की नव्या बाईसाहेब कशा वाटल्या ?
लैला-चंपा-कमला	खूप आवडल्या आम्हाला.
जमीनदारीण	छान ! तिच्याशी नीट वागा म्हणजे तुम्हाला कसलाही त्रास होणार नाही. खरंच मुंबईला गेल्यावरही मला तुमची खूप आठवण येईल.
चंपा	बाईसाहेब, मुंबईला दिवसभर तुम्ही काय कराल ?
जमीनदारीण	मुंबईला काय करीन ? अग मुलींनो, नुसतं जुन्या मित्रमैत्रिणींचा शोधच घ्यायचा म्हटलं नं तरी महिना सहज निघून जाईल. शिवाय नाटक, सिनेमे ह्यात सहज वेळ जाईल. सकाळ, संध्याकाळ बगिचा लावून त्याची देखभाल करीन अन् रात्री मी माझं आत्मचरित्र लिहून काढीन. आणि बरं का, ते छापून आलं की मी तुम्हाला प्रत्येकीला पाठवीन हं !
चंपा	पण आम्हाला वाचता कुठे येतं ?
जमीनदारीण	मग तुमच्या नव्या बाईसाहेबांना सांगा तुम्हाला शिकवायला.
चंपा	अहो पण आम्हाला त्यांच्याशी एकटं बोलायला मिळेल तेव्हा नं.
जमीनदारीण	ती बघ ती येतेच आहे. बोलत बसा आता तिच्याशी. मलाही खूप कामं आहेत *(जाते)*
कमला	लैला तूच बोल बाई त्यांच्याशी.
चंपा	हो लैला ! तूच बोल. *(रूपा येते. तिनेही इतरांसारखा पंजाबी ड्रेस घातला आहे)*
लैला	अहाहा ! बाईसाहेब. हा पोशाख तुम्हाला खूपच शोभतो.

रूपा — करला मेला पोशाख! माझं सामान हरवलंय म्हणे. म्हणजे आता हेच कपडे घालणं भाग आहे.

लैला — बाईसाहेब, तुम्हाला इथले कपडे आवडत नाहीत, इथल्या चालीरीती आवडत नाहीत, इथली माणसं आवडत नाहीत, मग तुम्ही इथे रहाताच कशाला?

रूपा — पळून जाता येत नाही म्हणून.

लैला — कोण म्हणत पळून जाता येत नाही म्हणून! आम्ही तुमच्या सुटकेची पूर्ण तयारी केली आहे. आज संध्याकाळी मुन्नीबाई दोन घोडे आणून वाड्याच्या मागच्या दरवाजाशी उभी राहील. तिथून कोकिळेचा आवाज आला की आपण मोरांना चारा घालण्यासाठी म्हणून बाहेर पडू. ही बघा मागच्या दरवाजाची किल्ली.

रूपा — *(अतिशय आनंदाने)* तुमच्या रूपाने देवच पावला मला. मी तुमचे कसे आभार मानू हेच कळत नाही मला. पण तुम्ही.... तुमचं काय होईल?

चंपा — आमचं काहीही होणार नाही. शिक्षा झालीच तर मुन्नीबाईला होईल. पण तीदेखील तुमच्याबरोबर पळून जाणार आहे. तुम्ही तिला काही पैसे द्यालच.

रूपा — जरूर देईन.

लैला — म्हणजे ती खूष होईल. तुम्हालाही सुटकेचा आनंद मिळेल.

चंपा — आणि तुम्हाला मुक्त केल्याचा आनंद आम्हाला मिळेल.

रूपा — खरंच! एका स्त्रीचं दुःख दुसरी स्त्रीच समजू शकते.

कमला — ए, ठाकूरसाहेब येताहेत. *(तिघीही पुन्हा पहिल्याप्रमाणे लोळत पडलेल्या. एकटी रूपा मात्र उभी)*

ठाकूरसाहेब — अप्रतिम! अप्रतिम! ह्या कपड्यांत तुमचं सौंदर्य खुलून दिसतं आहे. रेहाना कुठे आहे? *(रेहाना आत येते)*

रेहाना — रेहाना हजर आहे महाराज.

ठाकूरसाहेब — तू रूपादेवींना घातलेल्या पोषाखावर आम्ही बेहद्द खुष आहोत. आणि म्हणून लवकरच आम्ही तो आपल्या हाताने उतरविणार आहोत.

रूपा — फालतू बडबड बंद करा. मघाचपासून बघते आहे मी. त्या लिलावाच्या वेळेलाही तुम्ही माझी, माझ्या दागिन्यांची, अन् माझ्या नवऱ्याची थट्टा उडवत होतात.

ठाकूरसाहेब — थट्टा? काय बोलता आहात तुम्ही रूपादेवी! ज्या मर्दाला तुमच्यासारखी सुंदर स्त्री लाभली त्या मर्दाची मी थट्टा कशी करू शकतो. उलट मला त्याचा हेवा वाटतो. एक हजार मैलावरून त्यांनी साद घातली अन् तुमच्यासारखी एक सुंदर स्त्री त्याला भेटण्याच्या ओढीने अधीरपणे निघाली. अशा भाग्यवान पुरुषाचा अनादर मी कसा करू शकेन? इतका प्रेमळ पती तुम्हाला लाभला... खरंच तुम्हीही भाग्यवान आहात.

रूपा — *(खिन्नपणे)* भाग्यवान! त्यांचं माझ्यावर किती प्रेम आहे हे फक्त मलाच माहीत. त्यांनी मला सादबीद काहीही घातली नाही. खरं तर गेल्या आठ महिन्यात एक साधं चार ओळींचं पत्रसुद्धा पाठवलं नाही त्यांनी. त्या अंधाऱ्या चाळीत एकटं राहून जीव उबला म्हणून मीच निघाले शेवटी इथे यायला. शी! करली ती चाळ. त्यांच्या ऑफिसला जवळ पडते म्हणून तिथे रहायचं म्हणे! माझी आवड निवड विचारायची गरजही वाटली नाही त्याला. माझ्याशी लग्न कशाला केलं हेच कळत नाही मला. एखाद्या बिनपगारी मोलकरणीपेक्षा जास्त किंमत नव्हती माझी. दुसऱ्या एखाद्या स्त्रीवर प्रेम आहे म्हणून माझ्याकडे दुर्लक्ष झालं असतं तरीही मी सहन केलं असतं. पण प्रेम कशावर तर जुन्या थडग्यांत सापडलेल्या हाडांवर अन् खापरेलाच्या तुकड्यांवर. *(ती वेडीपिशी होऊन बोलते आहे)* एक एक क्षण गेली दहा वर्ष मी हळू हळू मरते आहे. त्या आठवणीही नकोशा होतात....

(रडू लागते, लैला, चंपा, कमला तिच्याभोवती गोळा होऊन तिला शांत करण्याचा प्रयत्न करतात.)

ठाकूरसाहेब *(अविश्वासाने)* हे अशक्य आहे!

रूपा अशक्य ? अशक्य नाही. ती वस्तुस्थिती आहे. मीच मूर्खपणा केला अन् पंचेचाळीस वर्षांच्या म्हाताऱ्याशी लग्न करून बसले. मी एका शाळेत शिक्षिका होते. ते एक प्रसिद्ध इतिहास संशोधक होते. त्या प्रसिद्धीवरच मी भाळले. लग्नाआधीच त्यांनी मला सांगितलं की त्यांना मुलं नको होती. मी देखील ते मान्य केलं. पण त्याचा अर्थ हा असा होईल असं कधीच वाटलं नव्हतं. दिवसभराच्या श्रमानं थकून गेल्यावर केवळ दोन प्रेमळ शब्दांची अपेक्षा करत होते मी अन् मिळत होतं सिंधु नदीच्या खोऱ्यातील संस्कृतीवर एक भाषण.

ठाकूरसाहेब असल्या माणसाला जगण्याचाही हक्क नाही. कमीतकमी पुरुष म्हणविण्याचा तरी नाहीच. अन् तरीही तुला त्याच्याकडेच जायचं आहे हं ?

रूपा नाहीतर जाऊ कुठे ? इथे गुलाम म्हणून राहाणं मला मान्य नाही.

ठाकूरसाहेब हे बघ रूपा, गुलामांना मालक असतो. तुझा कोणीही मालक नाही. कारण आम्ही सर्वच तुझे गुलाम आहोत. आम्ही तर आधीच तुझे गुलाम झालो आहोत त्याशिवाय ह्या माझ्या आवडत्या मुली ह्या देखील आम्ही तुला देऊन टाकतो.

रूपा ठीक आहे. ह्या आता माझ्या गुलाम झाल्या आणि मी ह्या क्षणी त्यांना मुक्त करते आहे. जा मुलींनो तुम्ही मुक्त आहात.

(चंपा, लैला, कमला गुडघे टेकून तिची याचना करतात.)

लैला दया करा, बाईसाहेब!

चंपा बाईसाहेब, इतक्या कठोर होऊ नका.

कमला दया करा बाईसाहेब! दया करा आमच्यावर.

लैला बाईसाहेब, मी भीक मागते. आम्हाला मुक्त करू नका. आम्ही कुठे जाऊ ? काय खाऊ ? कोणत्या अपराधाची आम्हाला ही शिक्षा देता आहात. बाईसाहेब ?

चंपा आम्हाला एखाद्या गरीब शेतकऱ्याशी लग्न करावं लागेल हो!

कमला गुरासारखं शेतात राबावं लागेल हो!

लैला तो नवरा आम्हाला मारेल.

कमला आमचा छळ करेल

चंपा आम्हाला उपाशी ठेवेल.

(त्या रडू लागतात. रूपा स्तंभित होवून त्यांच्याकडे बघते आहे. ठाकूर दोन टाळ्या वाजवतो. त्यावरोबर रेहाना त्या मुलींना ढकलत बाहेर नेते.)

रूपा मी काय करू ? मी काय करू ? काहीच कळेनासं झालं आहे.

ठाकूरसाहेब आधी शांत हो रूपा. उगीच डोक्याला ताण देण्यात काहीच अर्थ नाही. कारण तू काय करावंस हे ठरवणार मी आहे. *(उठून उभे राहून तिच्याकडे बघत विचार करतो आहे)*

रूपा तुम्ही मला मुक्त करणार आहात का ?

ठाकूरसाहेब ते अशक्य आहे. आधी कदाचित मी तसला विचार केलाही असता पण तुझी कहाणी ऐकल्यानंतर तर ते अशक्य आहे. असल्या सुंदर मांसल देहापेक्षा ज्याला थडग्यातल्या हाडांमध्ये जास्त रुची आहे अशा नवऱ्यावरोबर नरकप्राय जीवन मी तुला जगू देऊ शकत नाही.

रूपा	पण... पण.. मला कळत नाही. माझ्यापेक्षा इथली प्रत्येक मुलगी जास्त सुंदर आहे. माझ्यात अस काय आहे की ज्यामुळे...
ठाकूरसाहेब	तुझ्यात काय आहे ? ऐक. लहानपणापासूनच माझ्याभोवती सुंदर स्त्रिया रहात आल्या आहेत. मी इतक्या स्त्रियांचा उपभोग घेतला आहे की आता मला त्यांचा कंटाळा येऊ लागला आहे. शरीरसुखासोबत मनुष्याला मानसिक भूकही असते. सीमादेवी इथे येण्यापूर्वी मला त्याची जाणीव नव्हती. पण त्यांनी माझा बाहेरच्या जगाशी परिचय करून दिला. मी बाहेर कधीच गेलो नाही. पण तरीही तुम्ही मला मुंबईत नेऊन सोडलंत तर मी कुणालाही न विचारता तुमचं घर शोधून काढू शकेन इतकी मला मुंबईची माहिती आहे. आणि ती माहिती देणाऱ्या सीमादेवींची जागा तू घेणार आहेस.
रूपा	पण मला कसलीच माहिती नाही.
ठाकूरसाहेब	पण तू जास्त कल्पक आहेस, जास्त हुशार आहेस. शिवाय तुझं सौंदर्यही बरेच दिवस टिकून राहील.
रूपा	*(भांबावलेली)* माझ्यात कसलं आलंय सौंदर्य ! कमीतकमी माझ्या नवऱ्याला तरी ते कधीच दिसलं नाही.
ठाकूरसाहेब	कारण त्यानी प्रेमळ नजरेनं तुला कधी पाहिलंच नाही. इथेही गुलामांचा व्यापार करणारे लोक आहेत त्यांना तुझ्यात फक्त काही हजार रुपयेच दिसतील. सौंदर्य नाही. पण मला तू नुकत्याच उगवलेल्या गुलाबाच्या फुलासारखी भासतेस.
रूपा	नका हो असलं काही बोलू! मला असले शब्द ऐकण्याची सवय नाही. *(ठाकूरसाहेबांनी दागिन्यांच्या डब्यातून एक सुंदर नेकलेस काढलं आहे. ते नेकलेस ते रूपाच्या गळ्यात घालतात.)* असले उंची दागिने घालण्याची तर मुळीच सवय नाही.
ठाकूरसाहेब	सवय नसली तरी होईल. माझ्या सहवासात तुझ्या व्यक्तिमत्वाला नवा बहर येईल आणि हो, तू मला रणजीत म्हणायचंस, ठाकूरसाहेब नाही.
रूपा	नाही हो.... मला ते जमणार नाही.
ठाकूरसाहेब	प्रयत्न कर. पहिल्यांदा कठीण वाटेल पण हळूहळू सवय होईल.
रूपा	*(प्रयत्न करते)* रणजीत
ठाकूरसाहेब	अहाहा ! इतक्या गोड आवाजात पहिल्यांदाच ऐकलं मी माझं नाव. *(सूर्यास्ताची वेळ जवळ आली आहे)*
रूपा	माझा विश्वासच बसत नाही. तुम्ही आज पहिल्यांदाच मला पाहिलंत आणि.....
ठाकूरसाहेब	आज नाही. ज्यादिवशी तुझं वर्णन मला मिळालं त्या दिवसापासून माझ्या मनात तुझी मूर्ती वसते आहे. हे सुंदर डोळे, हे दाट केस, हा सुंदर बांधा. मी तुझ्यावर प्रेम का करू नये ? मी सदैव तुझ्यावर प्रेम करीन, रूपा, अन तू सदैव माझ्यासोबत राहशील.
रूपा	*(ताडकन उठून)* नाही. मी हे ऐकणार नाही. मी हे ऐकायला नको *(मुठीत किल्ली घट्ट धरलेली)* मी हे ऐकायला नको.
ठाकूरसाहेब	रूपा, हा बघ तुझ्या मालकीचा सुंदर बगीचा. संध्याकाळच्या सुखद गारव्यात आपण हातात हात घालून उगवत्या चंद्राला झाडांवर रूपेरी झालर घालताना पाहू. गुलाबांच्या ताटव्यात फिरताना त्या हजारो गुलाबांच्या धुंद सुगंधाने तुला भोवळ येईल.
रूपा	भोवळ तर आताच येते आहे. मी काय करते आहे माझं मलाच कळत नाही. हे अशक्य आहे.

अशक्यच असायला पाहिजे. तुम्हाला हे का कळत नाही की इथून जवळच माझे पती उत्खनन करत आहेत.

ठाकूरसाहेब करेना का! त्या हाडांचे मालक कधीच मेलेले आहेत. कोणीच आक्षेप घेणार नाही.

रूपा त्यांची केवढी बदनामी होईल याचा विचार करा.

(तिला हात धरून शेजारी बसवत)

ठाकूरसाहेब विचारच करायचा असेल तर आमराईच्या थंड सावलीत तुझ्या मांडीवर डोकं टेकून तुझे गोड शब्द ऐकत राहण्याचा विचार का करू नये! *(दुरून कोकिळेचा आवाज ऐकू येतो)* बघ ती कोकिळा आपल्याला आमराईत बोलावते आहे.

रूपा कोकिळेचा आवाज ऐकून इतका आनंद होतो मला! *(कोकिळेचे आणखी आवाज)*

ठाकूरसाहेब इतक्या मोठ्याने कोकिळेचा आवाज मी आजच ऐकतोय. कदाचित ती तुझं स्वागत करत असेल. तिलाही कळल असेल की देवलोकाची एक अप्सरा आज ह्या वाड्यात अवतरली आहे.

रूपा पण त्यामुळे देव नाराज होतील

ठाकूरसाहेब मुळीच नाही. देवालाही माहीत आहे की त्या अप्सरेसाठी हा ठाकूर पृथ्वीवर स्वर्ग निर्माण करील.

(लैला, चंपा व कमला येतात)

लैला बाईसाहेब मोर बघायला चलता ना?

रूपा नको. मी मोर पाहिले आहेत.

चंपा पण बाईसाहेब तुम्ही त्यांना चारा घालणार होतात ना?

कमला चारा घातला की ते मोर नाच करतात.

रूपा असेल. पण सध्या माझ्याच मनाचा मोर पिसारा फुलवतोय!

(पडदा)

■ ■

धनंजय जोग, 1/2 लक्ष्मीनगर, नागपूर - ४४००२२

(नीना हुक या ब्रिटिश लेखिकेच्या 'द गॉडसेंड 'वर आधारित)



समर

संजय जीवने

आकाशवाणी	अंधार.... शून्य अंधार प्रत्येक पावलांवर स्वप्नच स्वप्न कसले परिश्रम मन अस्वस्थ मी असा शून्यात आहे. (तीनदा) *(मध्यरात्री हळू-हळू लाल प्रकाश. कुत्र्याच्या रडण्याचा आवाज. एक व्यक्ती फासावर टांगलेली.)*
आकाशवाणी	मी आत्महत्या केली. म्हणजेच ह्या देशातील एका माणसाची हत्या केली. मी बेकारीने, भुकेने, आजाराने, तडफडत होतो. ह्या सरकारला मी दिसलोच नाही. माझी त्यांना काळजी नाही. असंख्य रोगांनी ग्रासलेली माझी लेकरं मरताहेत त्याला जबाबदारही सरकार नाही. हे सरकार मला काहीच देऊ शकत नाही. कारण हे त्यांच्या कर्तव्यसुचीत येतच नाही. आणि मला असं तीळ-तीळ मरायचं नव्हतं. म्हणून मी आत्महत्या केली. *(अंधार. स्टेजच्या एका कोपऱ्यावर उजेड. एका स्त्रीचे प्रेत पडले आहे. मानवी कुत्रे तिला खात आहेत. आपसात भुकेने गुरगुरणे, भांडण - अंधार)*
आकाशवाणी	ह्या देश, अबलांचा देश, ही भारतमाता व्यवस्थेची शिकार, हरवलेले होशहवास, लुटताहेत चौरस्त्यावर लाश. *(अंधार)* *(स्टेजच्या दुसऱ्या कोपऱ्यावर उजेड, एक झोपडी, एक वेश्या आपल्या पोरीला झोपवते आहे. तिच्या बाजूला दोन, तीन गिऱ्हाईक दारू पिऊन उभे आहेत.)*
एक	चल ना ओ जल्दी..... पच्चीस ले लेना
वेशा	रुक जा ना दो मिनीट, बच्चे को तो सुलाने दे.
एक	जल्दी चल रही क्या, तो बात कर.
वेश्या	इतकी जल्दी है तो जा दुसरी देख, पच्चीस तो दे रहा और तिन-तिन कुत्ते लेके आया साला. *(स्टील-अंधार)*
आकाशवाणी	सारे जहाँ से अच्छा हिंदोस्ताँ हमारा, हम बुलबुले है इसकी, ये गुलिस्ता हमारा..... *(हळू-हळू स्टेजच्या मध्यभागी प्रकाश, एक पोरगी रडते आहे. एका म्हाताऱ्याचा प्रवेश)*
(म्हातारा) बुगा	पोरी इंदू काऊन रडतं पोरी. तुई माय न्हाई आली काय अजून.
इंदू	हं.....
बुगा	तं..... रडतं कायले, जाणार कोटी हाय. बडबडत फिरत असनं कोटीतरी येईनच अनं तुया भाऊ पन नसन आला ?

इंदू	नाही.....
बुगा	अं..... त्याचा काही ठावठिकाणाच नसते. त्यालेतं समाजाची फिकर पडली आहे. घरची थोडी.घरात अंधार अन् हा फिरते मशाली घेऊन क्रांतीच्या. समाजातं अंधार आहे, म्हणे, अबे घरात तं पख्काश कर पहिलं, अं, जाय बेटा, दिवाबत्ती लाव. नाहीतं ते धुंदाळ येईन नं वस्ती जागवनं समदी.
इंदू	बुगा, माझी माय..... माझी माय काऊन अशी करते गा, बडबडते, सिवा देते, पहिले तं अशी नव्हती नं, माझी माय खरचं पागल झाली का गा बुगा.
बुगा	नाही बेटा नाही. तुयी माय पागल नाही. पागल आहे हा समाज, हे व्यवस्था. पर आज तुया वापु असता नां तं तुमचे हे हाल झाले नराते. अन् तुया भाऊ चेरा तं बापाच्याच वळणावर गेला.
इंदू	बुगा, माया बापू काऊन मेला गां ?
बुगा	नाही पोरी नाही. तुया बाप मेला नाही. तुया बापू मारल्या गेला. लई पेटून उठत होता कोनावर अन्याय पाहून, शांत करून टाकला नेहमीसाठी ह्या मोठ्या लोकायनं त्याले. अन् हा तुया भाऊ तं तुया बापाहुनही इस्तो आहे.
इंदू	पण बुगा, दादा असा काऊन चिडचिडते, घरी तं एकदम चुपचाप राहाते.
बुगा	अवो तो चूपचाप असला तरी त्याच्या अंदर काहीतरी पेटतच राहाते. लई उन्हाळे, पावसाळे पाहिले त्यानं. ह्या जगनीत, तो माह्या वयाचं आयुष्य जगला.
इंदू	दादा मले खूप सिकवीन म्हणते बुगा.
बुगा	हो, तु खूप सिक पोरी, तुया दादा तं सिकु सकला नाहीं. तुया बापू गेला अन् तुयी माय अशी झाली. तवापासून साऱ्या जबाबदाऱ्या तुया दादावरच आल्या. सिक्सन सोडलनं नं मोलमजुरी करून पोसते सर्वांले. अन् त्याही पेक्षा जास्त राबते तो ह्या समाजासाठी. झपाटला आहे तुया दादा.
इंदू	बुगा, दादा येवून रायला.....
	(चेरा येतो. केस, दाढी वाढलेला, कुडता, पॅन्ट घातलैला. तीन सवंगड्यांसोबत येतो.)
एक	चेरा, लोक आपल्याला नक्सलवादी समजायला लागलेत.
चेरा	समजू दे रे, कुत्र्यांच्या भुंकल्याने वाघ घांबरत नसतात. आपण आपल्या ठिकाणी मजबूत आहोत नां बस.
दोन	पण हे नुसते भुंकणारे कुत्रे नाहीत तर प्रसंग साधुन चावणारेही आहेत.
चेरा	चावू दे रे. ह्या नसात कुठल्या शेळ्यांच रक्त सळसळत नाही, की बेंबीवर डझनवार इंजेक्शन घेवू. साऱ्या जमान्याचं विष घोळून प्यालो आहोत आम्ही. चावणारे कुत्रे बघ कसे पागल होऊन मरतील साले.
तीन	खरचं चेरा, ह्या कुत्र्यांना पागल होण्याआधीच विष घालायला हवं.
चेरा	'हं !..... इंदू, आई कुठे आहे ?
इंदू	माहीत नाही. मी आली तर घरी नव्हती.
चेरा	तू कोठे गेली होती ?
इंदू	शाळेत.
चेरा	अभ्यास केला ?
इंदू	नाही, दिव्यात तेल नाही.

चेरा	अं !..... *(पैसे देतो)* हे घे घेऊन ये, घरातही काही नसेल ना. घेऊन ये, आतासाठी नि उद्यासाठी पण..... *(इंदू पैसे घेऊन घरात जाते. पिशवी घेऊन बाहेर जाते.)*
बुगा	पोरा ह्या कोवळ्या वयात पोरीले लई तरास होते रे, तुले किती वेळा म्हटलं की एखादी..... *(मध्येच)*
चेरा	बस ! बस आता भाषण नको.
बुगा	पाहिलं रे पोरांनो, त्याच्या सुखाचं सांगावं तं याले भाषण वाटते आता मी तरी काय करू ?
चेरा	तु असं कर बुगा, आईला शोध नी घरी घेऊन ये, कितीदा सांगितलं की तिला घराबाहेर जाऊ देऊ नका, तुझी स्वतःची पोरगी असुन, तुला तिची काळजी नाही.
बुगा	पर तिच्याही पेक्षा मले इंदूची लई काळजी आहे.
चेरा	बरं बाबा आता जा नं *(बुगा जातो)*
१	अन्याय घोर अन्याय, न्यायाचा पुजारीही अन्याय करतो.
चेरा	ए, पुजारी व्हायला, मी काही पंडीत नाही.
२	अरे, पण तू असा तापतोस कशाला, लोक तर.....
चेरा	हसतात, हसतात माझ्या आईवर, मनोरंजन होते नां त्यांचं, तमाशा होऊन बसली आहे माझी आई.
३	अरे, पण बुगा म्हणतो त्यात वाईट काय ?
चेरा	नाही, त्यात वाईट काही नाही, पण माझ्यात किती वाईटपणा आहे हे माहीत आहे मला. कोण आपल्या पोरीची आहुती देणार ? कोण मला, माझ्या विचारांना समजून घेणार ? माझ्या सारख्या कफन चोरीला गेलेल्या नंग्या लाशेशी कोण लग्न करणार ? नाही ते शक्य नाही. माझे प्रश्न असंख्य आहेत. आणि ते लग्न केल्याने सुटणार नाहीत. फक्त संघर्षच माझ्या पिढ्यांनी केला आहे. आणि तोच मी करणार आहे.
१	ह्या संघर्षात तू एकटा नाही चेरा, आम्हीही तुझ्या सोबतीला आहोत.
२	तुझं म्हणणं खरं आहे चेरा, आमचे प्रश्न असंख्य आहेत. आमचे दुःख, आमच्या वेदना अनंत आहेत. तेव्हा आम्ही क्षणिक सुखाला बळी पडता कामा नये.
३	हो संघर्ष आम्ही सुरू ठेवू.
चेरा	हो.
१, २, ३, ४	*(चौघेही)* : हो संघर्ष आम्ही सुरू ठेवू *(तेवढ्यात आईचा जोरात, ओरडत, पागलासारखा प्रवेश, तिच्या पाठोपाठ बुगा, आणि अब्दूल आला आहे)*
आई	*(विक्षिप्तपणे जोरात ओरडत)* अरे येऽ आई नाई कां रं मी, आईऽऽ आरंऽ, ये वकिला कारतोंड्या..... रपट देईन तूया नावाची हां. तं नावाची नाय मी हां..... पूलीस, पूलीस..... मारा मले मारा..... डाक्टर हायेना हरामी वाचवाले, सूया देते सुया..... *(चेरा आईला पकडतो, समजवतो)* ये सोड मलं, सोड रे दाड्या, ये अब्दूल भैया, अरे वाचव रे, हा माये कपडे फाडते रे, अरे धाव रे अब्दूल.....
अब्दूल	शांत हो जा इंदू की माँ.
आई	अरे चूप रे दोगल्या तुया कोयता तं दे मले, नाई सप्पायचे तुकडे तुकडे केलो तं नावाची नाय मी हां..... *(पागलासारखी करते)*

अब्दूल — उधर सडकपे पुलिसोंको, वकिलोंको, डॉक्टरोंको गालियाँ दे रही थी, मैने और तेरे बुगा ने पकडके रिक्षामें डालके लाये. बहोत सताया रे तेरी माँ को इस जालीम जमानेंने. कसमसे ये खुनी भेडिये मेरेकू मिल जायेना, तो बकरा काटता हुँ ना, वैसे एक-एकक़ू काटके टंगा दूंगा. *(इंदू येते.)*

आई — आली, आली मायी सवत आली..... ये..... ये *(आई इंदूला पकडते, ती आई म्हणून ओरडते. आई लहान मुलासारखी करते)* आई..... आई मी शाळेत जाईन, खूप सिकीन, भातक खाईन, चूप. सिकाच नाई, सिकून तु डॉक्टर होसीन, वकील होसीन, पुलीस होसीन, सिकाच नाय. अजीबात सिकाचं नाय. कर काम..... बिड्या बांद. मजुरी कर. बंगल्यावर जाय..... घर धंस.

इंदू — नाई आई मी खूप सिकीन.

आई — मी तूया जीव घेईन.

(इंदू आई म्हणून ओरडते, आईचं लक्ष चेराच्या मित्राकडे जाते. एकदम धावत त्यांच्याजवळ, गंभीरतेने)

तुमी इंदूच्या बापाचे दोस्त नां या. या पण ते तं घरी नाई..... अं काई हरकत नायी. तुमीच या बसा..... आता तुमीच समजवा माया लेकराईले, मायं कायी आयकतच नायी, यायचा बापवी माय आयकतं नोवता, अंन्यायाईरुद्ध ईंद्रोहाची भाषा बोले. जीभ छाटली त्याची. तुमाले बी सांगतो, तुम्ही बी इंद्रोहाची भाषा बोलू नका, तुमची बी जीभ छाटटीन, तुम्हाले जीभ हाये नां..... दाखव.

(म्हणत त्यांच्या तोंडात पाहू लागते)

बुगा — इंदू आईची दवाई असनं तं घे..... चेरा तिले दवाई दे. तवाच ते चूप होईन.

आई — *(एकदम)* हे बुढ्या तू तं माया मरणावर टपला हायेस. दे दवाई. मार मले. *(चेराकडे वळून)* घेरे मार मले, मले माहीत हाये, तुमी सर्व डॉक्टराची गँग आहात. *(रडते, इंदू औषध देते.) (चेरा तिला औषध पाजतो. आई शिव्या देत, बेशुद्ध होते, चेरा रडतो.)*

अब्दुल — चेरा रो मत, रो मत.

चेरा — रडू नाही तं काय करू म्हणतंस अब्दुल चाचा, तुम्ही पाहाता ना, ही आहे माझी आई, पागल..... पागल

(रडतो)

१, २ — शांत हो चेरा, शांत हो.

चेरा — जा सर्व जा. मला एकटं सोडा. जा तुम्ही. उद्या भेटू

१, २, ३ — ठीक आहे, येतो आम्ही *(जातात)*

बुगा — असा इचार करत बसल्यानं कसं होईन पोरा, तुच असा रडसीनं तं ह्या पोरीनं कोणाकडं पावावं. तूच खचलास तं या पोरीचं कसं होईन. परमेश्वरानं जे नसीबी लिहलंन ते तं होईनच, त्याच्यापुढे तुमची मायी चालत नाही.

चेरा — *(चिडून)* नांव नको घेऊ त्याचं. ईश्वर, परमेश्वर, नशीब सब थोतांड आहे. एक पाखंड आहे. ह्या ईश्वरामुळेच धर्म तयार झालेत. आणि धर्मामुळे आमच्या कत्तली. साऱ्या नरकी गटाराचं मेन होल उघडून सडू द्या साऱ्या देवांना. त्यात त्याच्या धर्मग्रंथांची पानं फाडून धडकवून टाका. फक्त स्वच्छ धुतलेली माणसं तयार होऊ द्या. मग कुणाचीही माय पागल होणार नाही. माझी आई पागल झाली हे त्याला दिसलं नाही ? तिच्या नसीबी काय बलात्कार लिहिला होता. माझ्या

बापाची जीभ छाटण्यात आली. हे ही काय नशीबी लिहलं होतं. त्याचा खून झाला हे ही त्याला दिसलं नाही.

अब्दूल — पण तू एकला किस किससे कब तक लढेगा ?

चेरा — जोपर्यंत ह्या धमण्यातून रक्त सळसळतेय, श्वासातून वादळ उठतेय, तोपर्यंन्त साऱ्या जनावरांसोबत लढेन.

अब्दूल — पर तू भी तो एक जनावर है.

चेरा — हो, मी बी एक जनावर आहे. पर माणूस नावाचा जनावर आहे.

बुगा — आईकलं रे अब्दुल. कसा बापावानी ठसक्यात बोलते.

अब्दुल — हा बुगा, इसका बाप तो मेरा जिगरी था नां, मै भटक रहा था, तो मुझे सहारा दिया, रोटी दी, धंदेसे लगाया, हमेशा गरीबी से लडता रहा, गरिबी के आगे कभी सर न झुकाया, कभी किसीसे डरा नही. जब शेर के समान दहाडता था ना तो सारी बिल्डींग हिल जाती थी, ये बडे लोगोंके कान के पडदे फट जाते थे, जब उसकी आवाज को रोक नही सके, तो छिन लिया गया उसकी आवाज को.

बुगा — अन् याची माय इलाजासाठी डॉक्टराजवळ गेली त पैशासाठी तिच्या इज्जतीचा सौदा झाला. अन् वकिलापासी गेली, तं तिच्या मासाचे लोंदके तोडला आन् न्याय मांगाले पूलिसाजवळ गेली, तं तेबी तुटूनं पडले वाचल्या-खुचल्या मांसावर गिधाडावानी, आन् वदल्यात भेटली तिले तिच्या नवऱ्याची लाश आन् या सदम्यात एक माय पागल झाली आन्.....

चेरा — *(रडत)* बस..... बस बुगा आणखी नाही ऐकुन होत.

अब्दूल — सही मे चेरा खून मेरा भी खौल उठता है तेरी तरह. जब कभी देखता हुँ फुटपाथों पर पडी अधनंगी जिंदा लाशें, भुखे-तडपते बच्चे, मॉंकी कोख से लिपटे दिनदहाडे ' सभी तमाशा देखा करते है। जब किसी अवला की इज्जत लूटी जाती है। और कोई झोपडपट्टी जला दी जाती है। तो धर्म के नामपर इन्सानों की वली चढायी जाती है। और तब मेरे भी जिस्म की आग उन खूनी महलो तक पहुंचना चाहती है। राख कर देना चाहती है उन महलो को.....

चेरा — हां, अब्दुल चाचा ये राख ही हमारे खौलते खून को और धडकते जिस्म को शांत कर सकती है।

अब्दुल — चल चेरा.

चेरा — कुठे ?

अब्दुल — पेट की आग को शांत करने चल *(जबरदस्तीने नेतो)*

चेरा — इंदू काही बनवून घे, आणि जेवून घ्या. आई उठली तर तिला पण दे, येतो मी. *(जातात)*

(इंदू खाली पडलेला कागद वाचते आहे)

बुगा — गेले, उध्वस्त करणाऱ्यांनी तुय घर उध्वस्त केलं. मी एकएक दृश्य तुया चेहऱ्यावरच्या जखमात पाहिलं. तू पिसाट जीवनाच्या शोधात फिरते आहेस मृत होऊन. इंदू जा, काहीतरी बनव, जा इंदू, काय वाचतेस पोरी ?

इंदू — दादाचा कागद पडला होता इथं

बुगा — काय लिहलं आहे.

इंदू — वाचू

बुगा — वाच, थोड्या जोरात वाच.

इंदू — ह्या झोपडीतला माणूस दर माणूस जगला असतो आपल्या दुपटीचं आयुष्य, तरीही अंधारतलाचा यात्रेकरू प्रकाश शोधतोय प्रकाश, त्याला काही कळत नाही. देशात कोण कुठे

आहे. देश कुठे आहे. केव्हा खड्ड्यात पडतो तेही कळेना. असे असंख्य सुर्य रोज पुरले जातात. जसा सुर्य यांच्या बापाचाच. पण आता प्रत्येक झोपडीत सूर्य उगवतो आहे. फटीफटीतून, झोपड्यातून किरणे निघताहेत. निळ्या आकाशाला भिडताहेत. सूर्यही लाजला आहे. ढगाआड दडला आहे..... *(अंधार)*

चेरा — दिवसभराचे काम आटोपून जेव्हा सांजच्याला ह्या झोपडपट्टीत शिरतो. तेव्हा दारिद्र्यावर काळोखाच्या मायेने पांघरलेली गोधडीच दिसते ही झोपडपट्टी. नाल्यातून वाहाणाऱ्या गू-गोबरासारख्या ह्या झोपड्या. एका झोपडीत माझी लहान बहीण, डोळ्यात तेल ओतून, डोळे जाळीत माझी वाट पाहात असते. मी काही घेऊन जाईन. ती मला दोन घास करून घालेल. नाहीतर तिच्याजवळ काहीच नसतं जगण्यासाठी, अंधारालाच गिळून टाकते पाण्यासोबत, मला प्रश्न करत, नी झोपून जाते, उद्याच्या उजेडाची वाट पाहात. असंख्य प्रश्न घेऊन, तेव्हा मोठमोठ्या व्यासपिठावरून क्रांतीचा जयघोष करणारे माझे विद्रोही शब्द घरी येताच निरूत्तर होतात, पराभूत होतात.

अब्दूल — चेरा अपून सभीच समदुःखी है। ये झोपडपट्टीका हर आदमी दीन है, दरिद्री है;। ये गरीबी आदमी को गुलाम बना देती है।

चेरा — पण मी गुलाम नाही, आजाद आहे मी, दिवाणा आहे मी आजादीचा.

अब्दुल — पर ये सच है की इंदू के सवाल का जवाब तेरे पास नही है।

चेरा — हां. हे सत्य आहे, पण हे ही सत्य आहे की, आमचे प्रश्न आमच्या जन्मापासूनच जन्मतात नी आमची चिता पेटूनही जाते तरी संपत नाहीत. आमचे प्रश्न रात्रंदिवस धगधगताहेत.

अब्दूल — पण तू इतका पेटतोस कायको.

चेरा — अब्दूल चाचा, पेटनं, न पेटनं हे ज्याच्या त्याच्या रक्तात असलेल्या ठिणग्यांवर अवलंवून असतं.

अब्दूल — ये ठिणगीयाँ कितने सवालोंको भडकाके खाक करेगी. ऐसेही सुलगते रहेंगे ये सवाल, कभी खाक नही होंगे ?

चेरा — बरोबर होंगे, अगर सव लोक नंगे नाचने लगेंगे, रक्त ओकतपर्यंत दारू प्यायला लागतील, एकमेकांना शिव्या देतील, खून करतील, सरेआम बलात्मकार करतील, सर्वांजवळ जेव्हा हत्यारे, बंदूक, बंब राहतील. मी तुमच्या जात-धर्माच्या लोकांना कापून टाकीन, तुम मेरे जातधर्म के लोगो को काट डालना. पूर्ण राष्ट्रयुद्ध, धर्मयुद्ध करून टाकू. महायुद्ध होतील. सर्व सर्व जळून खाक होऊन जाईल. आम्ही खाक होऊ आमचे प्रश्न ही खाक होतील.

अब्दुल — अब, तेरेकू चढ गई लगती

चेरा — हो मला चढली आहे. ही नशा उद्यापर्यन्त उतरलेच पण ही ज्या नसानसात चढलेली आहे. ती नशा मरेपर्यन्त उतरणार नाही.

अब्दुल — चेरा, तेरा अब्दुल चाचा हमेशा तेरे साथ है। ये सफर-ए-जंग है, मिल के चलो.

चेरा — हो चाचा, हे युद्ध आता आपण मिळुनच पार करू तेव्हाच आपल्या संघर्षाला यश येईल.

अब्दुल — अच्छा चेरा, अब मै चलता हूँ. वहोत रात हो गयी

चेरा — अच्छा चाचा कल मिलेंगे।

अब्दुल — जाते-ज़ाते कल के बारेंमें एक बात बोलता हुँ, की कल की पिढी प्रश्न करे जब बीते कल के बारे में सचसच कहना, सदियोंसे होती हलचल के बारे में दो रोटी के खातीर क्यों इज्जत के सौदे होते है, सचसच कहना अफसाने घुंगरू पायल के बारे में,

चेरा — वा..... वा.....

अब्दुल — अच्छा चलता हुँ। *(अब्दुल जातो)*

चेरा — हं। नशा..... हं..... हो मी नशेत आहो. माझ्या नसानसांत चढली आहे ती, माझ्या रक्तपेशीही डिमांड करताहेत तिची. दिवसरात्र ह्या नशेत राहावसं वाटतं. मी सोडू शकत नाही. ही नशा. बेचैन होऊन पागल होऊन जाईन. मी नशेत आहे. नशेत राहीन. ह्या नशेतच मला सत्याची चाहुल लागली. म्हणून रक्त ओकतपर्यंत बेधुंद नाचतो. नशेत धुत असलो तरी बेधुंद नसतो. ह्या नशेत मी शिव्या देतो, शिव्यात तुमची मायबहीण घेतो. तुमच्या हवेल्यावर दगडफेक करतो. जे माझं वाटतं ते हिसकावून घेतो. उध्वस्त करतो तुमचे मयखाने नी कारखाने. नासधूस करतो उधळून टाकतो तुमच्या सभामंडपांना, ह्या नशेचा मी दिवाणा, आता तुमचीही मुक्तता नाही हिच्यातून. आता ही नशा ठिकरीपर्यंत पोहोचल्यासारखी वाटते. सारचं उध्वस्त करून टाकीन. जे जे जुन आहे, नव्यासाठी. ही आहे नशा क्रांतीची, क्रांतीची नशा..... *(पडतो. अंधार)*

(इंदू टिक्कर-बिल्ला खेळते आहे. बाईचा प्रवेश. (वेश्या)

बाई — इंदू, अवो शायेत नाही गेलीस आज ?

इंदू — सुट्टी आहे.

बाई — कायची वो.

इंदू — कशी वो तू बाई, अवं आज इतवार नाही काय ?

बाई — अव, आपल्यासाठी सारेच वार एकसारखे आहेत माय. म्हणून तं दिवस मोजनच सोडुन दिलं. काऊन घरी कोनी नाय.

इंदू — नाही.

बाई — काऊन, बुगा कोटी गेला ?

इंदू — बुगा, आईले घेऊन कोणत्यातरी बावाकडे गेला.

बाई — बापा, तुया भाऊ तं बावा लोकापासुन खूप चिडतेनं.

इंदू — अव, दादा आज पहाटेलेच गेला, त्याच्या लपून गेले ते.

बाई — अच्छा, अवो इकडं तं ये.

इंदू — बाई, तू आपल्या घरी जाय, आमच्याकडे येत पन नको जाऊ.

बाई — अवो पर काऊन ?

इंदू — दादा रागावते, तुया सोबत बोलतांना पाहिलं तं मारन.

बाई — काऊन मारन ?

इंदू — दादा म्हणते तू वेश्या आहेस म्हणून.....

बाई — हो, मी वेश्या आहे..... वेश्या आहे मी, पर तुया भावानं हे नाही सांगितलं कं मी वेश्या कशी झाली. तुयाएवढी होतो, तवापासुन बाईले एकाच रूपात पायलो. वेश्येच्या.....

इंदू — बाई, वेश्या म्हणजे काय होते वो ?

बाई — वेशाऽ ऽ इंदू, तुले माहीत नाही नं.

इंदू — नाही.

बाई — मंग राहू दें, ते विचाराचं नाही. इंदू एक सांग, मी कोण हो वं ?

इंदू — तू बाई होस.

बाई — हो..... हो, इंदू मी बाई हो, मले पण बाई सारखं राहावसं वाटते. पण बाई नावाची चमडीच ह्या शरीरातून काढून टाकण्यात आली. आता उरलं आहे फक्त जिवंत मांस, जेथून गरम वाफा

निंगुन रायल्या. अनं या मांसाचा मी धंदा करतो, मले कोनीच बाई समजत नाही. मी वेश्या आहे. मी धंदा करतो.

इंदू — बाई तू हा धंदा सोड्डुन दे.

बाई — नाही इंदू. तू आता लहान आहेस. तुले समजत नाही. एवढं सोपं नाही माय हे, लहानपणापासुन जिनं रोज आपल्या मायले बिस्तर बदलवतांनी पायलनं ते हा धंदा नाही करनं तं कोनता धंदा करनं ? अन् आता मायी..... मायी पोरगी मले हा धंदा करतांनी पायीन. नाही, मी तिले हे सारं पाहू देणार नाही. तिले वेश्या होऊ देणार नाही.

इंदू — बाई, तिले माझ्यासोबत शाळेत पाठवत जाजो.

बाई — हो, मी तिले तुयासारखी सिकवीन, सायबीन बनवीन, ते मले आई बनवनं. वेश्येची बाई बनवनं.

इंदू — हो बाई.

बाई — तू बी खूप सिक, सिकुन सायबीन हो, आन् आपल्या बाईले वेश्येची बाई बनव. आपल्या दादाच आईक इंदू..... माया संग बोलू नका. आता मी तुमच्याकडे येणार नाही. नायी येणार..... *(स्टील - अंधार - वेश्या बसली आहे, एक गिऱ्हाईक उभा आहे)*

वेश्या — ऐ..... चल, चल फुट..... चलना..... फुटना, अपना थोबडा देखा क्या आईनेमें. बांस आ रही है यहाँ तक. तेरेसे वो रिक्सेवाले अच्छे है। भाड्या उधारीमें क्या अपनी मा बहन समझकर आया था। चल देख क्या रहा, फुट.

(व्हाईट कर्टनच्या मागे आई शिव्या देत आहे. वेश्या आईला घेऊन येते.)

आई — मी एकटीच काफी आहो, या कारतोंडईसाठी. समजलनं काय ? तू सोड तं मले मंग पाय

बाई — आई, अव त्यायले मंग पाऊन, पयले हे सांग तू येऊन कोटून रायलीस ?

आई — मी कोटून येऊन रायलो. हं तो खेड्डा आहे नं, घेऊन गेला बाबापासी, त्या ढोंग्याजवळ, अवं तुले माहीत नाही. सारे बाबा ढोंगी रायतात.

बाई — अव ढोंगी रायतंत तंतू गेलती कायले ?

आई — गेल्तो, बुद्धा आहे नं माया तसा नेलतनं, सेन खावाले. त्याले काय वाटते, माहीत हाये, माहीत हाये काय ?

बाई — अं..... नायी.

आई — मंग असी बोल नं. मेनघुमनी कायले होतसं ? मी सांगतोनं, त्याले वाटते कं मले कायीतरी केला. तुले बी असे वाटते काय ?

बाई — नायी तं.

आई — मंग काय वाटते, पागल आहो.

बाई — नायी - नाय्यी तू पागल नायी.

आई — हं. मी पागल नाही. हं थोडी बडबडतो तं काय झालं ? आतापर्यंत चुप बी तं होतो. आता मी बडबडीनं अन् सब चूप रायतीन, अन् तो लटाऱ्या बाबा माह्यापेक्षा जास्त बडबडते, त्याले कोणी पागल म्हणत नाही. आता तूच सांग तो बाबा पागल आहे कं मी.

बाई — अं, तो बाबा पागल आहे.

आई — हं, आता कसं बोललीसं. पण मी बी त्याले चूप करून टाकलो.

बाई — पण तू केलीस काय आई.

आई — तो कसा करे माहीत आहे. मायाजवळ बसला. मी असी, नं तो असा, बुढा भी होता माया. अवं आयकतस् तू.

बाई — हो, काय केलनं त्या बाबानं ?

आई — एकदम सोपी आहे करून दाखवू

बाई — अं...... अं

आई — अं..... अं काय करतंस, लकवा मारला काय तोंडाले. सिध्यानं हो म्हननं.

बाई — हो.

आई — हं आता पाय तो कसा करे *(अंगात आल्यासारखी करते)*

आई — बाईचं नावं बा..... मी नावच नोवतो सांगत, मंग माह्या बुढ्यानचं सांगतलनं बावा म्हणे, हिच्या जेवनात सेंदूर घातल्यान् बा, सेंदूर पाडावं लागत्यान बा, बावाच्या दरबारात आल्या समदं वरं होईल. बावाले बकरा दया. बुढा मंदातच विचारे, बाबा, पोरीच्या जेवनात सेंदूर कोणी टाकला ? बाबा म्हणे दोन घरामागच्या बाईनं टाकल्यानं बा..... बुढ्या म्हणे, पोरीच्या मांग जे कायी लावलं आहे ते समदं काढून टाका तं बाबा म्हणे.... समदं बरं होईल वा..... माया बुढ्यानं त्या बावासमोर ५१ रु. ठेवलनं तं. तो हलकट बाबा लागला मले फड्यानं माराले. फड.... फड.... मी नं बी पाय-पाय केलो नं मारलो एक लात त्याच्या कमरीत तं त्याच्या आंगातलीच उतरली, दुसरी माराच्याच पहिले गमावून उठला, नं वाचवा म्हणून माया बुढ्याच्याच पाया पडे.

बाई — मंग

आई — मंग काय मंग, तुले काय सतनारायणची कथा वाटली. तेथून परत आलो. बस्. आली कं नाही मजा. जिरवली कं नायी ढोंगी बावाची.

बाई — हो आई, अवं पण सारेच बाबा ढोंगी रायतत तू कोणाकोणाची जिरवसीन ?

आई — साऱ्यायचीच जीरवीनं. मले दिसू तं ते बाबा कोनी, पन् आता तं मी घरी जातो, माई पोरगी एकटीच घरी आहे. जातो मी.....

(अंधार)

(१, २, ३ चर्चा करत आहेत)

१ — वैतागलो यार, कितीही बंधुत्वाची भाषा बोला. पण बंधुत्व निर्माण करणं अत्यंत कठीणे.

२ — हजारो जातीमधे विभागलेल्या लोकांचे बंधुत्व आणि एक राष्ट्र तरी कसे बनवायचे.

३ — हो, हो, एक राष्ट्र तरी कसे बनवायचे.

१ — मूठभर लोक अमाप धनदौलतीत लोळत आहेत. तर असंख्य जनसागर दारिद्र्याच्या खाईत पिचत पडला आहे.

२ — मग शेवटी बंधुत्व म्हणजे तरी काय ? *(चेरा येतो)*

चेरा — अरे काय मित्रांनो, कुठल्या बंधुत्वाला घेऊन बसला आहात.

३ — बंधुत्व म्हणजे तरी काय चेरा ?

चेरा — 'आपण सर्व एकाच मायेची लेकरं' हे तत्व साऱ्यांच्याच मनात रूजणं म्हणजे बंधुत्व.

२ — हा संदेश प्रत्येक माणसांत रूजला पाहिजे.

चेरा — अरे, सामाजिक बांधीलकी, आमुलाग्र परिवर्तन हाच खरा तर आपल्या समग्र जीवनाचा संदेश आहे. आम्ही आता सुधारलो, आमच्या घरात आधुनिक विज्ञानाने नवनवीन साधने आणलीत. आम्ही चंद्रावरही आमच्या विजयी पाऊलखुणा उमटवल्या. पण आजही खेड्यापाड्यातून अस्पृश्यांना सवर्णांच्या पाणवठ्यावरून पाणी भरता येत नाही. सुशिक्षित स्त्रिला तीच्या भोवतालच्या सांकेतीक कुंपणाबाहेर आम्ही अदयापही जावू दिले नाही. शेतमजूरांची गरिबी

	आजही कालसारखीच अबाधित आहे. जातीयतेचे तण वाढतच आहे. आणि तरीही आम्ही जगत आहोत मोठमोठे आदर्श घेवून. उद्याच्या मोर्चाची तयारी झाली.
१	सर्व तयारी झाली आहे चेरा. फक्त हॅन्डबिल्स वाटायचे राहिलेले आहेत. काही लोकांशी संपर्क करायचा आहे.
चेरा	ठीक आहे. निघूया आता. सर्व कामं आटोपून उद्याच्या मोर्चात भेटू.
१, २, ३	ठीक आहे.
	(सर्व निघायला लागतात. चेरा अतिशय अस्वस्थ, उत्तेजित, दुपारची वेळ)
१, २, ३	*(येतात)* : दुसरा मोर्चा काढता येणार नाही चेरा. सकाळच्या वातावरणाने आधीच पेटले आहे.
२	शहरात लाठीचार्ज, अश्रुधूर, गोळीबार होत आहेत.
३	पण झालं काय ? आपल्या हक्कासाठी आपल्याला लढावेच लागेल. प्राण गेला तरी बेहत्तर.
१	अरे, चेरा कसला विचार करतोस ?
चेरा	सकाळी आई मोर्चात जाऊ नको म्हणुन ओरडत, बडबडत होती. पण आता ती स्वतःच घरी नाई. मला तीची काळजी वाटते.
२	ह्या अवस्थेत तिला एकटं जाऊ दयायला नको होतं.
चेरा	इंदू व बुगाची नजर चुकवून पळाली ती.
३	इंदू व बुगा कुठे आहेत ?
चेरा	आईला शोधायला गेलेत. खैर, माझ्या मातेपेक्षा या भारतमातेचा प्रश्न जास्त महत्वाचा आहे. चला आपण निघायला पाहिजे.
३	हॅन्डबिल घेतले सोबत ?
चेरा	अरे नाही ना। घरात ठेवले आहेत घेवून येतो.
	(चेरा, घरात जातो. अब्दूल, बुगा, इंदू रडत आईच्या रक्ताने माखलेल्या प्रेताला घेवून येतात.)
१, २, ३	अवाक होऊन पहात असतात. *(चेरा घरातून येतो)*
चेरा	आई, आईऽ ऽ ऽ आई काय झालं तुला आईऽ ऽ ऽ तु बोलत कां नाही आई. आई हे रक्त कसं तुझ्या अंगावर, हे ओरखडे कसे ? नाही आई नाही. तू बोल आई रोज सकाळ संध्याकाळ ओरडांयची, बडबडायची, मी तुला असं चुप बसू देणार नाही. काहीतरी बोल आई..... अरे तुम्ही लोक तरी बोला ? काय झालं माझ्या आईला.
बुगा	गोली लागली पोलीसाची.
चेरा	अं, नाय, गोली लागली पोलीसाची.... अरे माझ्या आईनं काय बिघडवलं होतं त्याचं. आम्ही मोर्चे काढतो. आंदोलन करतो, दगडफेक करतो. माझ्या आईनं असं काय केलं ? माझ्या आईचा बळी कां ? *(का ?) (रडतो)* कशी सनसनती गोली येऊन क्षणात छेदून गेली असेल. हंबरडा फोडला असेल. किती यातना झाल्या असतील. आईऽ ऽ *(रडतो) (पागलासारखा करीत)* हे सारं शहर कसं मसनवट्यासारखं वाटत आहे. एकही वाहन नाही. सर्वत्र शुकशुकाट हां फक्त बंदूकीचा आवाज हा जिकडून तिकडून निघणारा आगीचा धूर...... आई हे बघ रक्तच रक्त. वाटतं धरणीमातेला न्हाऊ घातलं आहे, हे रक्त तर कोवळ्या बालकाचं दिसतं. हे काय कुणाला दिसत नाही. *(हसतो)* कसं दिसणार आंधळे आहेत सगळे. नाही, फक्त दगड आहेत. ज्याच अस्तित्वच नाही. नाही, आई नाही. अरे, थांबवा, थांबवा हे सारं..... अरे माझी आई मेली आहे. अरे कुणी ऐकताय काय ? की सारी माणसं मेली आहेत. अरे थांबवा..... थांबवा *(चेरा*

ओरडत जातो. सर्व त्याला हाक देतात. १, २, ३ त्याच्या मागे 'चेरा थांब' म्हणून ओरडत जातात. बाकी रडतात. थोड्या वेळात रडणं कमी होतं..... चेरा रक्ताने माखलेला असतो. प्रवेश..... अब्दूल धावत जाऊन त्याला उचलतो.)

चेरा — अं..... आई..... आई, हे बघ किती मारलं आई तुझ्या पोराला.....

इंदू — दादा..... दादा..... *(रडत)*

अब्दूल — ये क्या हो गया चेरा.....

चेरा — ये 'समर' है अब्दूल चाचा, हे युद्ध आहे..... रक्त तर वाहणारच.

इंदू — *(रडते)* दादा..... दादा.....

चेरा — इंदू, नाही, रडायचं नाही. हे समर तुला सुरूच ठेवायचं आहे. ठेवशील नां हें समर सुरू.....

इंदू — हो.....

चेरा — इंदू, आपल्या बापूने, लोकांना अंधार कसा असतो तो दाखवला, मी उजेड कसा असतो तो सांगितला. ते बघ माणसं प्रकाशाच्या शोधात निघाली आहेत.

(पांढऱ्या पडद्यामागे काही माणसं मशाली घेवून निघाली आहेत.) बुगा..... चाचा, बघा. ही वाटचाल सुरू राहील. हे समर सुरू राहील. इंदू, त्यांना प्रकाश कुठे आहे ते दाखवेल. आं..... इंदू एकदा ती तुझी पुस्तकातली कविता म्हणून दाखवं..... लवकर *(इंदू घरात जाते.)*

चेरा — बुगा, अब्दुल चाचा, इंदूची काळजी घ्या..... ऑ.....


(चेरा मरतो, बुगा, अब्दुल चाचा रडतात.)

पांढऱ्या पडद्यामागे मशाल मोर्चा दिसतो आहे. इंदू एका हातात कंदील आणि दुसऱ्या हातात दप्तर घेवून धावतच बाहेर येते. चेराला मेलेला पाहून स्थिर होते. तिच्यावर सुर्याच्या कोवळ्या उन्हाचा प्रकाश. सारे..... स्टील)

समर गीतात्मक आकाशवाणी होते.

■ ■

संजय जीवने, इंदोरा, भंडार मोहल्ला, नागपूर - ४ (१९८६ यावर्षीची पद्माकर डावरे एकांकिका स्पर्धेतील लेखनाकरता - प्रथम पुरस्कारप्राप्त एकांकिका. सादरकर्ते : दलित रंगभूमी, नांगपूर)



टॉर्चर मशीन

अनिल देशमुख

रंगमंचावर इतस्ततः मेलेली माणसं. निळसर प्रकाशात अस्पष्ट दिसणारं दृश्य. एका बाजूला चार खुर्च्या, एक टेबल अंधुक प्रकाशात त्या देहांना ओलांडून, प्रसंगी त्यांना तुडवत चार पात्रं येऊन कोपऱ्यात खुर्च्यांमध्ये विसावतात. ते अंधारात. एका प्रकाशझोतात मृतदेह उठून बसलेले.

पहिला — हात कुठाय

स्त्री — कोणता ?

पुरुष — डावा

स्त्री — उडाला

पुरुष — *(दुसऱ्या देहाला)* तुम्ही

दुसरा — तुम्ही

पुरुष — आर डी एक्स

दुसरा — आम्ही अग्निदिव्यातून जिवंतपणी आत शिरलो. मरून बाहेर पडलो.

पुरुष — तुमचं बरंय

दुसरा — काय बरयं ?

पुरुष — निदान अग्नीतरी मिळाला. आम्हाला सुटका नाही आता मुन्सीपाल्टीवाल्यांची वाट बघा. ओळख तरी पटेल कां ? तरी बरंय गळ्यात जानवं आहे.

दुसरा — का ?

पुरुष — हो, नाही तर चड्डी उघडून खात्री करावी लागली असती.

दुसरा — बंडू नाही दिसत.

पुरुष — मामांकडे गेला होता. वाचला. तुमचा राजू ?

दुसरा — पलीकडच्या पुलाखाली. हरामखोरांनी ठेचल्यांनी.....

पुरुष — वास खूप येतोय हो.

दुसरा — सुटका नाही.

पुरुष — थोडावेळ दिला असता तर ऑफीसला पोहोचलो असतो. उडवायचं असतं पूर्ण ऑफीस. शे दोनशे मद्रासी तरी मेले असते. ऑन ड्यूटी मरण परवडलं हे असं मरण्यापेक्षा.

स्त्री — अहो-

पुरुष — आता काय ?

स्त्री — बंडूचं काय होणार ?

पुरुष — मी जाहिराती बघतोय. कळवीन त्याला.

स्त्री — अहो गप्प बसा. ते अमेरिकेवाले आले.

(रिप्रेझेंटेटीव्ह माइक्रोफोन हातात. मृतदेह चुकवतच समोर येतोय. मागे दोन पात्रं एक खुर्ची घेऊन अत्याधुनिक पॅनल्स, चमकदार, आधुनिक, समोर आणून ठेवतात. त्याला सलाम करून विंगेत)

प्रतिनिधी लाईट्स, प्लीज! *(एक प्रकाशझोत वरतून)* थँक्स *(प्रेक्षकांकडे वळून)* शुक्रिया! थँक्स! बोल्शोय स्परीबा! धन्यवाद ! *(आवश्यकतेनुसार प्रेक्षकांशी सरळ संवाद साधतोय)*

लेडीज अँड जंटलमेन, बंधू भगिनींनो... मित्रांनो.. अगदी थोडक्यात सांगायचंच झालं तर आज मी एका अत्याधुनिक आविष्काराबद्दल थोडसं बोलणार. मनःपूर्वक आभार. आपणा सर्वांच्या एप्लीकेशन्स आम्हाला मिळाल्या. अत्याधुनिक 'अमेरिकन हिट', 'न्यू टॉर्चर मशीन' घेऊन मी आपल्या सेवेत हजर झालोय.

मासिकातून ओपिनियन पोल्स घेतले, टीव्हीच्या जाहीरातीला प्रचंड प्रतिसाद मिळाला आणि आम्ही तावडतोब ओळखलं आपण जुन्या IBM Models ला कंटाळला आहात.

आजच्या काळाची गरज आहे एक अत्याधुनिक नवीन मॉडेल ! आमचे मार्केटिंग स्पेशालिस्ट जगभर पसरले आहेत. त्यांनी ह्या देशातील सामाजिक-राजनैतिक समस्यांचे उत्तर शोधून काढले आहे. इतिहासात सर्वप्रथमच. अद्‌भुत! 'अमेरिकन हिट'... हिवाळा, पावसाळा, उन्हाळा कोणत्याही ऋतूसाठी, भारत, पाक, जपान, अमेरिका कोणत्याही देशात कधीही वापरता येणारं न झिजणारं, न थकणारं एक नवीन मॉडेल!

Yes. No doubts about that ! With due consideration to Human Rights Declaration !

येताना वाटेवर चुकवत यायचं म्हटलं तरी किती माणसं. सडलेली शरीरं नुस्ती. वास नाकात घुमतोय *(विंगेतून परफ्यूम स्प्रे करते प्रेक्षकांवर)* थँक्स! *(प्रेक्षकांना)* नाऊ! वी आर अहेड ऑफ अर ओन टाईम्स!

A death with no foul smells! 'सुगंधित मृत्यू' ! No noise Pollution, No stinking smell! A compact model with inbuilt crematorium. Ashes within few seconds! A perfect aesthitic Torture Machine!

गरज नाही? अहो विचार करून बघा...४७ पासून आतापर्यंत काय प्रगती झालीय? ढाल, तलवार, हॉकी, गुप्ती, भाले-बर्छी ह्यांचाच वापर करतोय की आपण. झालचं तर त्रिशूळ! आणि मग मृतदेहांची विल्हेवाट. त्रास होतोच नं? पुन्हा दृश्य कंटाळवाणे. रक्ताला रंग एकच! मरणाऱ्यांची किंकाळी एकसूरी. No variations, No Rhythm, No melody!

We offer a colourful death.

We offer a musical death.

मरणाऱ्याच्या धर्मानुसार . रिमोटवर बोट ठेवा! रक्ताचा रंग बदलेल. भगव्या रक्ताचे रंगीत दृश्य आणि वेदांच्या ऋचा ऐकू येतील! आणि... हाँ मालिक! भूले नही है आपको। कुरान की आयते भी! वेस्टर्न, हिंदुस्तानी, कर्नाटकी प्रि-रेकार्डेड म्यूझिक किंकाळ्यांना ओवरलॅप करत आपल्या पावलांना नृत्याची लय देणारं संगीत भारतासाठी अतिशय स्वस्त पोर्टेबल मॉडेल्स! 'इंडी ९६', 'पाक १०६.' मरण्याऱ्या ट्राईबल्स साठी खास लोकसंगीताचा ताल. मरतांना 'हे राम,' 'अल्लाह' म्हणण्याची कटकट नाही. त्याची काळजी आम्ही घेवू. जास्तीत जास्त माणसांना कमीत कमी वेळात मारण्यासांठी काही नवीन मॉडेल्स लवकरच गल्लोगल्ली मिळू शकतील.

हर गलीमें, हर मोड पर, कोने-कोने में, बर्फिले पर्वतोंपर, रेतीले रेगीस्तानोमें, गाँव-गाँव, नगर-नगर में बसे हर हिंदुस्तानी के लिए! सबके लिए सब जगह! 'अमेरिकन हिट'!

विचार करा - जुनी गंजलेली हत्यारं आणि एकविसांव शतक. पेन, कागद, वर्तमानपत्र ह्या हत्यारांनी किती दिवस लढणार?

विश्वास नाही बसत ? आम्ही डेमान्स्ट्रेट करू - मग तर बसेल विश्वास ? कुणी आहे का तैयार ? घेऊन ये कुणालाही. एक साधारण माणूस हवाय एका सुपर्ब परफॉरमन्स साठी ! *(ऑफ स्टेज चेअर सहित)*

(किंचाळ्या ऐकू येऊ लागतात. मंद प्रकाश रेंगाळत टेबलावर स्थिरावतो. तीन नट, एक नटी असलेले. चेहरे टेंन्स, स्थिर, चुपचाप ऐकताहेत.)

पहिला — ते लोक त्याला टॉर्चर करताहेत नं !

नटी — शीः, किती हॉरिबल !

दुसरा — काहीतरी करायला हवंय !

तिसरा — ऑफकोर्स... हे...हे...थांबवायला हवयं.

पहिला — कुठलंही पाऊल उचलण्याआधी आम्ही आमची कमिटमेंट तपासून बघायला हवी. स्वतःआधी कमिट करावं लागेल.

दुसरा — स्वतःला कमिट करण्याचे कमी कां मार्ग आहेत ? परिस्थितीचं संपूर्ण विश्लेषण महत्त्वाचं. निरपेक्ष राहून केलेलं विश्लेषण. त्यातूनच आपल्याला 'उद्या' येणाऱ्या संकंटाची चाहूल घेता येईल. काही हाती गवसेल उद्यासाठी.

नटी — तुम्ही विसरताय की संकट समोर येऊन ठेपलंय. 'उद्या' चा नव्हे हा प्रश्न. 'आता'चा आहे.

दुसरा — वाई, तुमचं म्हणणं पटतं म्हणजे अगदी शंभर टक्के पटतं. करायला हवंच काहीतरी आता. फक्त काय ? ह्या बाबत आपले मतभेद आहेत. नाही कां ? म्हणजे माझं मत विचाराल तर परिस्थितीचं विश्लेषण महत्त्वाचं परिस्थिती नीट समजून घ्यायला हवी आणि मग वाट बघायला हवी योग्य क्षणाची की मग 'आक्रमण'.

नटी — चला निदान कुठंतरी एकमत आहोत आपण, बरोबर ?

तिसरा — बरोबर...पण ह्यांना वाटतं की 'योग्य वेळ' अद्यापही येऊन ठेवलेली नाही.

दुसरा — हे बघा... तुम्ही वाट्टेल ते शब्द माझ्या तोंडी टाकू नका. मी असं म्हटलेलं नाही. अज्जिबात नाही. माझं म्हणणं एवढंच आहे की ह्या परिस्थितीत आपण "काल" काय करीत आहोत, त्या प्रकांशात आपण 'आज'चे निर्णय घ्यायला हवेत. म्हणजे 'उद्या' येणाऱ्या अडचणींना -

नटी — पण प्रश्न 'आत्ता' च्या....

दुसरा — मान्य, पण आपण पक्षाची प्रतिष्ठा गमवता कामा नये. सर्वमान्य उत्तर शोधायला हवंय.

नटी — प्रतिष्ठा गेली खड्ड्यात. प्रश्न त्यांना थांबवण्याचा आहे.

पहिला — आपण आमच्या पक्षश्रेष्ठींनी घालून दिलेल्या आदर्शांना डावलता कामा नये. गाधींचा हा देश. इंग्रजांना अहिंसेचे धडे शिकविणारे आम्ही. आम्ही ह्या हिंसेचा निषेध करूच.

तिसरा — गांधींनी विरोध करू नका असंही म्हटलेलं नाही. आमचे गुरुजी नेहमीच सांगत आलेत. ह्या देशाचं भलं होणं शक्य आहे फक्त हिंदूत्वाच्या पूर्ण स्वीकृतीतूनच. हिंदू धर्माप्रमाणे हिंसा अहिंसा....

दुसरा — मित्रांनो, आम्ही सत्यापासून दूर जात आहोत.

(त्याच्या शब्दाला ओवरलेप करत एक भयानक किंकाळी सगळं शांत. मग कुराणशरीफचे स्वर ऐकू येतात.)

दुसरा — त्याचं सुरूच आहे.

तिसरा — *(संतापलेला)* हे वाईट आहे. आम्ही ही असली अल्पसंख्यांकांची चमचेगिरी चालू देणार नाही. मरणाऱ्याला 'अल्ला' चं का हवा ? मरणारा हिंदू नसेल कशावरून ? किंबहुना तो हिंदुच आहे. पण त्याच्या किंकाळीच्या आवाजाला ऐकू सुद्धा शकत नाही आपण. ह्या मशिदींवरचे लाउडस्पीकर

	तावडतोब बंद करा. नाहीतर आम्ही त्याच्यावर वरचढ महाआरती करू.
नटी	शेळी जाते जिवानिशी....
दुसरा	तुम्ही प्रत्येक बाबतीत तुमचं हिंदूत्व रेटू नका. हा मानवी मूल्यांचा प्रश्न आहे.
	(परत किंकाळी. आता वेदांच्या ऋचा ऐकू येतात.)
तिसरा	आमच्या देशात आमच्या संस्कृती प्रमाणे येणारं मरण मान्य. पण परकीय आक्रमण आम्ही खपवून घेणार नाही. आम्हाला गरज पडलीच तर खास स्वदेशी मॉडेल्स भारतात बनवून घेऊ. पण अमेरिकन संस्कृतीला घरात घुसू देणार नाही.
	(आता अतिशय संथ लयीनं संगीत सुरू झालेलं)
पहिला	*(खाकरतो)* मला पक्षश्रेष्ठींनी सांगितलंय की मानव अधिकारांसंबंधी माझा रिपोर्ट मी विचारार्थ हाऊसमध्ये ठेवावी, ते करण्याच्यासाठी मी सर्व अविकसित राष्ट्रांची यात्रा केलीय. सखोल अभ्यास केलाय. माझी खात्री आहे की पृथ्वीच्या पाठीवरील प्रत्येक देशात ह्या आतंकवादाविरुद्ध जनमत निर्माण करण्यात आम्ही यशस्वी होऊ. सेन्ट्रल कमिटी.....
तिसरा	काय केलंय तुमच्या कमिट्यांनी..... काय? सांगा नं? आम्हांला तावडतोब...... आम्हाला तावडतोब....
नटी	मित्रांनो, अहिंसा आणि निषेध बस्स झालं आता. आता हत्यारं उचलायला हवीत. तुमच्या भोंगळ आशावादानं कुणाचं भलं होणार नाही.
पहिला	अहो, तुम्ही लिहा की बाई रिपोर्ट. तुम्हाला घेऊ कमिटीत. माझा रिपोर्ट तर सेंट्रल कमिटी मान्य करणारच. आधीच ठरलंय.
दुसरा	प्रश्न वेगवेगळ्या गटामध्ये ऐक्याचा आहे. सर्व समविचारी शक्तींनी एकजूट व्हायला हवंय.
तिसरा	तुम्हाला कोणालाही निर्णय नकोच. पाउल सुद्धा उचलायला नको. मी वाट बघणार नाही. गावोगावी भटकून आम्ही त्यांना शोधू ज्यांची अस्मिता जिवंत आहे, ज्यांचा विवेक अद्याप जागृत आहे. कोण आहे रे तिकडे, रथ तयार करा?
पहिला	मित्रांनो, चर्चा खेळीमेळीच्या वातावरणात पूर्ण करायला हवीय. आम्ही दुफळ्या निर्माण करून शत्रूचे हात मजबूत करण्याच्या साठी प्रयत्न करायला हवेत.
तिसरा	तुमची एकता आणि अखंडता निव्वळ नपुंसक निष्क्रियता आहे.
पहिला	असेल, असेल. पण गांधींनी म्हटलेलं आहे -
	(किंकाळ्या स्तब्धता.)
	(प्रकाश मृतदेहांवर)
स्त्री	अहो ऐकलं का? आपण तर नाहक मरून पडलो. बंडूचं असं व्हायला नको? ऐकताय नं.
पुरुष	पेपर वाचतोय.
स्त्री	भारी बाई छंद, मेल्यावर सुद्धा!
पुरुष	कुठल्याश्या अमेरिकन यंत्रांची जाहिरात आहे बघ. बस्स ठरलं
स्त्री	काय?
पुरुष	बंडूला ह्या धंद्यात टाकायचं. चांगले दिवस आलेत पहिल्यांदा आपल्याला. समाज एकजूट होतोय. निदान शाखे-शाखेतून परिषदेच्या कार्यालयांमधून दोन दोन ऑर्डर मिळाले तरी, प्रत्येकी एकाखुर्चीमागे पंचवीस रूपयांच्या हिशोबानी....
स्त्री	अहो, पण हे भांडण, आयुष्यभर का पुरणार आहे.

पुरुष आपल्या आयुष्यभर पुरलनं. आता तो मरेपर्यंत मंदिर काही बनत नाही भांडण काही मिटत नाही. लागेल उद्योगाला.

(वाक्य अर्धवटच राहते. परत किंकाळी. दोघेही विशुद्ध. प्रकाश सामान्य. ते दोघे स्थिर. टेन्स. किंकाळीवर ऑर्गनचं संगीत.)

दुसरा अद्याप सुरूच आहे.

तिसरा किती अनह्यूमन *(अकारण टेन्स)* ह्या मिशनऱ्यांच्या संगीतावर बंदी घालायला हवी.

पहिला जनावरं बरी! क्रुएल्टीची हाईटच आहे ही.

नटी *(उत्तेजित)* हे थांबवायला हवंय. आत्ताच्या आत्ता.

तिघेही हो, तावडतोब -

पहिला असं हातावर हात धरून बराणं योग्य नाही.

नटी आपण ह्या आतंकवादाला शरण जातोय असा अर्थ होतो चूप बसण्याचा.

तिसरा ऑफकोर्स, हे अर्जंट आहे.

पहिला स्पष्टच आहे..ठाम निर्णायक भूमिका ही काळाची गरज आहे.

तिसरा हो, निदान ह्या बाबतीत मतभेद नाहीत.

दुसरा इतिहासात सुद्धा सापडतात असे दाखले, जेव्हा विश्लेषणाची वाट न बघता पाउल उचलायला लागतं. सद्यःस्थिती त्यातलीच.

नटी चर्चा म्हणजे नपुंसकता. षंढपणा!

दुसरा संधिसाधूपणाच म्हणा नं!

नटी Let's stop the torture

तिसरा समग्र कांती! जय -

नटी Let's go

तिसरा चला.

पहिला उठा

दुसरा उचला पाऊल.

(कुणीही हलत सुद्धा नाही. आता किंकाळ्या जिवघेण्या क्षीण होताहेत. स्मशानस्तब्धंता)

पहिला त्याला टॉर्चर करणं अद्याप सुरूच आहे. विश्वास नाही बसत.

दुसरा आम्ही एक कमिटी बनवायला हवीय. सर्व पक्षांचे प्रतिनिधी एकत्र करून ह्या प्रश्नावर जागोजागी चर्चा घडवून आणायला हव्यात. आणि असे सजेशन्स मागवयाला हवेत की हे ताबडतोब थांबवता येईल.

तिसरा हिंदू राष्ट्राच्या संकल्पनेला वाहून घेऊ इच्छिणाऱ्या बुद्धिजीवी लोकांची एक कॉन्फ्रेन्सच घ्यायला हवीय. बुद्धीची हत्यारं धर्माच्या वर पाजळून अधिक धारदार करायला हवीत. सर्वशक्तीनिशी विरोध करायला हवाय.

पहिला त्यासाठी सदस्य निवडावे लागतील.

नटी का पुन्हा पुन्हा तुम्ही त्या चक्रात गुरफटताय? आणखीन एक कमिटी. आधीच रेडटेपीझम काय कमी आहे का?

पहिला फक्त आमचा पक्षचं राष्ट्रीय स्वरुपाचं हे कार्य

तिसरा व्यक्तिगत पूर्वाग्रहातून बाहेर पडा. आम्ही एका नवीन राष्ट्रीय शक्तीचं प्रतीक होतं चाललो आहोत.

पहिला तुमची दडपशाही इथे चालणार नाही.

दुसरा *(वैतागून)* ही जनतेची दिशाभूल आहे. आमच्या आईडियॉलॉजी ची चक्क टिंगल सुरू आहे. लेनिन मार्क्सच्या विचारधारेतून....

नटी *(ओरडून)* विचारधारा हा सध्या चर्चेचा विषय नाही.

पहिला *(ओरडून)* विचारांची बैठक नसेल, तर कृती संभवत नाही.

दुसरा *(ओरडून)* ह्या देशाला ह्या क्षणांमध्ये फक्त हिंदुत्व मान्य विचारांची बैठक हवीय.

नटी *(ओरडून)* ह्या वेळी नेमका शत्रू तरी कोण आहे ?

दुसरा मार्क्सच्या तत्त्वज्ञानाप्रमाणे....

तिसरा मार्क्स कालबाह्य झालाय. आता फक्त आमचं तत्त्वज्ञान. जनमत आमच्या बाजूनी आहे.

पहिला जनतेचा विश्वासघात करण्याचा काही अधिकार नाही कुणाला. जनतेचा विश्वास आमच्यावर आहे.

दुसरा देश विकायला काढलाय तुम्ही. सुई, टाचणीपासून टॉर्चर मशीनपर्यंत सगळं अमेरिकन, जपानी कां ?

तिसरा म्हणूनच नवीन राष्ट्रवादाची गरज आहे. जगणं स्वदेशी. मरण सुद्धा स्वदेशी. We want Hindustani Torture Machines.

(आता सगळेच ओरडताहेत. काही ऐकू येत नाहीं किंवा कळत नाही. सगळेच एकाच क्षणी बोलताहेत.)

(प्रतिनिधी खुर्ची ढकलत समोर येतोय. त्याला बघताच सर्व चुप होतात तो डाऊस्टेज सेंटरला. त्यावर प्रकाश. मशीनवर आता 'तो' दिसतोय. तो मेलेला. शरीर रक्तानं माखलेलं. मास लोंबकळतंय, डोळे बाहेर निघालेले. लोळागोळा. चौघांवरचा प्रकाश पूर्णपणे गेलेला. प्रतिनिधी अतिशय प्रोफेशनल स्माइल घेऊन उभा.)

काय पटली न खात्री, हो की नाही ? आता मरणाऱ्याकडे सांगण्यासारखं काही नव्हतं आणि आमच्याकडे त्याला टॉर्चर करण्याचं कारणही नव्हतं. नाहीतर डेमॉन्स्ट्रेशन खूप इफेक्टीव झालं असतं. एनीवे,

आम्ही आपल्या ऑर्डरसची प्रतीक्षा करतोय. Good night !

(प्रतिनिधी जातो. प्रकाश फक्त देहावर.)

(मृतांवर)

स्त्री अहो, बघा नं त्यांनी बंडूला काय केलंय ? अहो, त्या मशीनवाल्यांनी....

पहिला *(धावरून उठतो)* बंडू, बंडू.....

(देहाजवळ येऊन बघतो ओळखीचा वाटत नाही.) झोप. बंडू नाही आपला. कुणीतरी उपराच आहे.

(ते शांत पहुडतात.) *(प्रकाश देहावर)*

■ ■

अनिल देशमुख

विदर्भ
साहित्य
संघ,
नागपूर.

केंद्रीय कार्यवृत्त
जुलै ९३ ते सप्टें. ९३.

२ सप्टें.

वि. स. खांडेकर स्मृतिदिन. या दिवशी डॉ. वि. स. खांडेकर यांच्या (पुनर्मुद्रित) नवीन पुस्तकांचे डॉ. सुनीता सहस्रबुद्धे यांनी केलेल्या समीक्षणाचे वाचन व चर्चा.

विदर्भ साहित्य संघ परीक्षा समिती अहवाल

६ ते १६ जून : दिनांक ६ ते १६ जून पर्यंत 'भाषा संस्कार' शिबिरात शरश्चंद्र बुचे, मधुकर भाकरे, चंद्रकांत कुळकर्णी, विसुभाऊ बापट, नारेरी, डॉ. सौ. भारती सुदामे इत्यादी मान्यवरांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संयोजन सौ. शोभा उबगडे यांनी केले.

ऑगस्ट-सप्टेंबर : दि. ४ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर पर्यंत दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी मराठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्यात पत्रलेखन, निबंध, अपठित गद्य-पद्य, व्याकरण व शुद्धलेखन इत्यादी विषयांवर श्रीमती नीलिमा राजे, सौ. विभावरी कुळकर्णी, डॉ. भारती सुदामे व सौ. शोभा उवगडे या मान्यवर व्यक्तींनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेला उत्तम प्रतिसाद होता.

दि. १९ ऑगस्ट पासून 'भाषा परिचय' वर्गाचे आयोजन करण्यात आले होते.

काही कार्यालयीन अडचणींमुळे जानेवारी १९९३ ते सप्टेंबर १९९३ या काळातील शाखावृत्त या अगोदर प्रकाशित होऊ शकले नाही त्यावद्दल दिलगीर आहोत. ते आता येथे प्रकाशित करीत आहोत.

शाखावृत्त (जाने. १९९३ ते सप्टेंबर १९९३)

चोहट्टाबाजार :

२१.९.९३ ते३०.९.९३ पर्यत : दि. २१.९.९३ ला शाखाध्यक्ष प्रा. ज. पां. खोडके यांच्या अध्यक्षतेखाली वैठक होऊन त्यात प्राचार्य राम शेवाळकर, माजी अध्यक्ष विदर्भ साहित्य संघ, यांची पणजी येथे होणाऱ्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी अविरोध निवड झाल्याबद्दल अभिनंदन ठराव पारित करण्यात आला.

दि. २८.९.९३ ला आदर्श शिक्षक श्री. मधुकर नारायणराव आढे यांच्या निरोप समारंभी शाखाध्यक्ष प्रा. ज. प. खोडके यांनी शाल, श्रीफळ देऊन शाखेतर्फे सत्कार केला.

दि. ३०.९.९३ ला बैठक होऊन त्यात सुप्रसिद्ध वऱ्हाडी साहित्यिक बाजीराव पाटील यांच्या निधनाबद्दल शोक ठराव पारित करून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. या प्रसंगी सौ. गोकर्णाताई आठे, उपाध्यक्षा, सचिव, प्रा. प्र. शा. भालेराव कार्यक्रम, प्रमुख, शिवराम बुदे, सदस्य डॉ. दातकर, वाल्मिक मुकुंदे, श्रीकृष्ण गावंडे, वसंतराव धुमाळे, सभापती शंकरराव पाटील व नागरिक उपस्थित होते.

नरखेड :

दि. : ४ मार्च :

विदर्भ साहित्य संघ, नरखेड यांच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्मशताब्दी निमित्त्य ग्रंथ प्रदर्शनीचे

आयोजन करण्यात आले होते. प्रदर्शनीचे उद्घाटन श्री. प्रकाश आंबेडकर यांच्या हस्ते व अध्यक्ष अविनाश वगेकर यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. त्याप्रसंगी बऱ्याच मान्यवर व्यक्ती उपस्थित होत्या. कार्यक्रमाची प्रस्तावना सरचिटणीस प्रा. रमेश पोतदार यांनी केली व आभार प्रदर्शन ग्रंथपाल आ. मा. भुरमुळे यांनी केले.

प्राचार्य राम शेवाळकर यांचे "भीष्म पितामह व्यक्तिरेखा" या विषयावर व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले. अध्यक्षपदी श्री. रमेश गुप्ता होते. याप्रसंगी डॉ. रवींद्र शोभणे व सौ. शोभा उबगडे उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन प्रा. पोतदार यांनी केले. हा कार्यक्रम इतर कार्यकारिणी सदस्यांच्या सहकार्याने पार पडला.

लाखनी

लाखनी शाखेतर्फे २६.१.९४ रोजी "राष्ट्रभक्तिपर गीत गायन स्पर्धा"आयोजित करण्यात आली. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून बापूसाहेब लाखनीकर उपस्थित होते.

स्पर्धेचा निकाल असा : विद्यार्थी गटात -: प्रथम-नरेश सुदाम कावरे. द्वितीय - कु. वर्षा रामकृष्ण कानतोडे. तृतीय - कु. सुषमा सूर्यनारायण भारद्वाज. खुला गट--: प्रथम - कु. सुनीता भिडूजी शेंबे. द्वितीय - १. तेजराम वकाराम ढवळे. २. कु. नागेश्री सूर्यनारायण भारद्वाज. तृतीय - सौ. पद्मा तातोबाजी भुरे.

कथाकथन स्पर्धा :

या वर्षीच्या कथाकथन स्पर्धेसाठी मा. पंढरीभाऊ साबरवांधे अध्यक्ष होते.

स्पर्धेचे निकाल असे : विद्यार्थी गटात--: प्रथम-सुषमा सूर्यनारायण भारद्वाज. द्वितीय-दुर्गेश दशरथ महाजन. तृतीय - संध्या जगन्नाथ कापसे. खुला गट-- प्रथम -विद्या बुद्धीसागर भदाडे. द्वितीय - १. सौ. पद्मा तातोबा भुरे, २. दीपक हरिदास वासनिक. तृतीय - प्रदीप पांडुरंग वासनिक, बळीराम इस्तारी काटकर.

दि. ८.२.९४ ला शाखेतर्फे स्व. दुलाईबाई स्मृतिप्रित्यर्थ मातोश्री भक्तिगीत गायन स्पर्धा घेण्यात आली. याप्रसंगी अध्यक्षपदी श्री. दौ. श्री. लांजेवार होते.

यशस्वी स्पर्धक : विद्यार्थी गट : प्रथम -कु. मंजुषा चंद्रशेखर खेडीकर. द्वितीय-सारंग रमेश पालोरकर, तृतीय-कु. संगीता रमेश पालोरकर,

खुला गट : प्रथम - कु. कौशल्या आनंदराव भोयर, द्वितीय - कु. प्रणिता चंद्रशेखर खेडीकर, तृतीय - कु. विद्या बुद्धीसागर भदाडे.

गडचांदूर :

दि. १२ नोव्हें.

विदर्भ साहित्य संघ शाखा गडचांदूर तर्फे भावगीत स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून प्रा. भोंगळे उपस्थित होते. या स्पर्धेत ५० स्पर्धकांनी भाग घेतला. यशस्वी स्पर्धकांना पारितोषिके देण्यात आली. अध्यक्षस्थानी शाखा अध्यक्ष प्राचार्य श्री. मोहितकर उपस्थित होते.

शाखेतर्फे कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले हाते. या कविसंमेलनाला जिल्ह्यातील कवी केशव तेलंग व विजय जोशी प्रामुख्याने उपस्थित होते. परिसरातील अनेक कवी सहभागी झाले होते.

विदर्भ साहित्य संघ शाखा गडचांदूरच्या वतीने स्वामी विवेकानंद जयंतीच्या निमित्ताने एका परिसंवादाचे आयोजन करण्यात आले.

तसेच "काव्यलेखन स्पर्धा" देखील २९/६/९३ ला आयोजित करण्यात आल्या होत्या.

या स्पर्धामध्ये खालील स्पर्धकांना अनुक्रमे बक्षिसे देण्यात आली.

(१) श्री. संजय मधुकर खडसे, सिरोंचा जि. गडचिरोली, (प्रथम.) (२) कु. वैशाली भगवान ठग, वाशीम, जि. अकोला, (द्वितीय.) (३) श्री. कैलास खामनकर, वाशिम जि. अकोला. (तृतीय.)

भंडारा १९ जाने. : विदर्भ सा. संघाच्या भंडारा शाखेच्या तर्फे जिल्हास्तरीय बालनाट्य एकांकिका स्पर्धा घेण्यात आल्या. यामध्ये अनुक्रमे "आज घरात कोणी नाही", "झेल्या" व "काबुलीवाला" या तीन एकांकिकांना प्रथम, द्वितीय व तृतीय पुरस्कार देण्यात आला.

स्पर्धेचा इतर निकाल पुढीलप्रमाणे

अभिनय प्रथम (मुले) - कौस्तुभ चवडे व द्वितीय - प्रदीप परांजपे

अभिनय प्रथम (मुली) - उर्वशी मोटघरे व द्वितीय -नूरजहाँ छवारे

दिग्दर्शन (प्रथम) - श्री. मनोज दाढी (आज घरात कोणी नाही) **द्वितीय** - श्री. रंजू पैठणकर (झेल्या)

बालनाट्य स्पर्धेचे उद्घाटन श्री. भाऊसाहेब दलाल यांचे हस्ते झाले. बक्षीस वितरण श्रीमती लीलाताई गुप्ते यांचे हस्ते झाले. कार्यक्रमाचे संयोजन श्री. व सौ. घरोटे, अध्यक्ष श्री.गुप्ते, कार्यवाह माधुरी सुतोने यांनी केले.

पुसद :

२७ जाने. : विदर्भ साहित्य संघाच्या विद्यमाने लोकनेते कै. देवराव पाटील चोंढीकर स्मृती व्याख्यानमाला दि. २९ व ३० नोव्हें. ९२ ला आयोजित करण्यात आली. प्राध्यापक डॉ. रा. श्री. मोरवंचीकर यांची "सातवाहनकालीन महाराष्ट्र" या विषयावर व्याख्याने झाली.

आरंभी साहित्य संघाध्यक्ष डॉ. एन्. पी. हिराणी व प्रा. डॉ. मोरवंचीकर यांचे स्वागत केले गेले. प्रमुख अतिथींचा परिचय व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वि. सा. संघाच्या शाखेचे सचिव प्रा. डॉ. उत्तम रुद्रवार यांनी केले. डॉ. मोरवंचीकर यांनी या प्रसंगी तत्कालीन इतिहासाच्या महत्त्वाच्या चित्रमालिका उपस्थितांना दाखविल्यात.

यवतमाळ जिल्हा स्थानीय स्वराज्य संस्था मतदार संघातून महाराष्ट्र विधानपरिषदेवर निवडून आल्याबद्दल विजय पाटील चोंढीकर यांचा वि. सा. सं. शाखा अध्यक्ष डॉ. एन्. पी. हिराणी यांनी या प्रसंगी सत्कार केला.

मांढळ :

१८ जुलै : वि. सा. संघाच्या या शाखेची वार्षिक सर्वसाधारण सभा दि. १८-७-१९९३ ला शाखाकार्याध्यक्ष प्रा. अविनाश तितिरमारे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या सांस्कृतिक वर्षात नवीन उपक्रम राबविणारे ठराव पारित करण्यात आले.

ठराव क्र. (१) व्याख्यानमाला व ग्रंथप्रदर्शने आयोजित करणे.

(२) आजीव सभासद शुल्क कमी करण्याबाबत.

(३) वि. सा. संघाच्या माध्यमातून अभिनव उपक्रम "साहित्यिक निघाले सहलीला" प्रस्ताव.

(४) नवोदित कवींचा कवितासंग्रह प्रकाशित करण्याबाबत.

(५) वि. सा. संघाच्या परीक्षांचे आयोजन करणे.

(६) आंभोरा येथे मराठीचे-आद्यकवी स्वामी मुकुंदराज यांचे स्मारक उभारण्याबाबत.

(७) वि. सा. संघाच्या वतीने वाचनालय सुरू करणे.

सर्व ठराव मंजूर करण्यात आले. सभेचे संचालन व आभार प्रदर्शन शाखा सचिव प्रा. नरेश जाधव यांनी केले.

३ ऑगस्ट : शाखा सचिव व अध्यक्ष यांनी शाखेच्या तर्फे केंद्रीय सरचिटणीस श्री. मनोहरराव म्हैसाळकर यांच्या ६१ व्या वर्षात पदार्पणाबद्दल ठरावाद्वारे "दीर्घ आयुष्य लाभो व त्यांच्या हस्ते वि. सा. संघाचे अविस्मरणीय कार्य घडत राहो अशा शुभेच्छा" व्यक्त केल्या.

हिंगणघाट :

२ सप्टें. : वि. सा. संघाच्या हिंगणघाट शाखेकडून विनोदी भाषणाचा एक कार्यक्रम आयोजित केला. या प्रसंगी मुंबईचे प्रख्यात विनोदी कथाकार श्री. प्रा. डॉ. सुभाष भेंडे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते तसेच नागपूरचे श्री. प्रा. प्रभाकर चाफेकरही त्यावेळी हजर होते. पाचवी ते बारावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांचे दोन गट करून समयस्फूर्त भाषणांची स्पर्धा घेण्यात आली. विदर्भ साहित्य संघ आणि पु. भा. भावे स्मृती समितीतर्फे हा कार्यक्रम आयोजित केला होता.

पवनी :

विदर्भ साहित्य संघ पवनी शाखेच्या वतीने शिवजयंती कार्यक्रम आयोजित करण्यात आला. शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला गेला व त्यांच्या चरित्रावर सौ. साधनाबाई व्यवहारे व श्री. मिटकरी गुरुजी यांनी विचार व्यक्त केले. आभार प्रदर्शन प्रा. अवचट यांनी केले.

२२ एप्रिल : विदर्भ साहित्य संघाची सभा आयोजित केली त्या सभेचे अध्यक्षस्थान श्री. म. ल. मिटकरी यांच्या उपस्थितीत अस्थायी स्वरूपाची कार्यकारिणी निवडण्यात आली.

(१) अध्यक्ष प्रा. ब. क. राठोड, (२) उपाध्यक्ष प्रा. ग. रा. अवचट, (३) सचिव प्रा. र. मु. मोदी, (४) सहसचिव : प्रा. प्र. य. भगत, (५) कार्यवाह : श्री. प. भ्र. टेंभेकर, (६) कोषाध्यक्ष : डॉ. प्र. वि. लेपसे, (७) सदस्य (१) श्रीमती नलिनी डोंगरे, (२) प्रा. कु. रेखा लाडे, (३) प्रा. अ. सु. राऊत, (४) श्री. जीवनलाल वर्मा, (८) कार्यकारिणी सदस्य : (१) श्री. म. ल. मिटकरी, (२) श्री. वा. ना. तुलवकर, (३) श्री. श. गो. कडू, यांची निवड करण्यात आली.

ब्रह्मपुरी :

१ सप्टें. : वि. सा. संघाच्या ब्रह्मपुरी शाखेने प्रथमच १४ ऑक्टोबर १९९३ ला पं. जवाहरलाल नेहरू यांचा जन्मदिवस "बालक दिन" म्हणून साजरा केला. त्यानिमित्ताने गीत स्पर्धा व भाषण स्पर्धा घेण्यात आल्या. यशस्वी स्पर्धकांना प्रा. डॉ. वा. र. भांडारकर यांचे हस्ते बक्षिसे देण्यात आली.

नाशिकचे प्रसिद्ध गीतगायक व प्रशिक्षक श्री. बाळ देशपांडे यांच्या गीत प्रशिक्षणाचा कार्यक्रम अतिशय विनोदी पद्धतीने सादर करण्यात आला.

जावाणी स्मृतिप्रित्यर्थ नागपूर येथील "तन्मय" या नाट्यसंस्थेचे श्री. गजानन पांडे यांनी दिग्दर्शित केलेले "आई रिटायर होतेय" या नाटकाचा प्रयोग सादर करण्यात आला.

सुप्रसिद्ध चित्रकर स्व. धनंजय नाकाडे यांच्या स्मृति-प्रित्यर्थ चित्रकार श्री. पूर्णानंद सहारे यांच्या सहकार्याने चित्रकला स्पर्धा व चित्रप्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले. विजयी स्पर्धकांना डॉ. सौ. इंदुमती नाकाडे यांच्या शुभहस्ते बक्षिस वितरण करण्यात आले.

शाखेचे संस्थापक सचिव प्रा. डॉ. नरेंद्र पोफळी यांच्या स्मृति प्रित्यर्थ कवि-संमेलनाचे आयोजन करण्यात आले. त्यानिमित्ताने सौ. ज्योती लांजेवार (नागपूर), सौ. लीना रस्तोगी (उमरेड), श्री. पुरुषोत्तम भिसीकर (भिवापूर), प्रा. कृष्णा चौधरी (रामटेक), श्री. विनायक तुमराम (मूल), व श्री. हिरामण लांजे (जवाहरनगर), आदी कवी या कविसंमेलनात सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. पुरुषोत्तम भिशीकर यांनी केले.

या सर्व कार्यक्रमाच्या आयोजनासाठी अध्यक्ष, सचिव व सहसचिव आणि कार्यकारिणीचे सर्व सदस्य यांचे सहकार्य लाभले.

सरचिटणीस

कै. ना. रा. शेंडे स्मृति
दलित साहित्य अभ्यास साधने विभाग

दलित साहित्य हा मराठी साहित्यातील एक समृद्ध व अभिमान बाळगावा असा विभाग आहे. या साहित्याची मुहूर्तमेढ विदर्भात झाली. विदर्भाच्या अनेक नामवंत साहित्यिकांनी विपुल साहित्यरचना करून हा विभाग समृद्ध केला आहे. कै. ना. रा. शेंडे हे तर दलित साहित्याचे महत्त्वाचे शिल्पकार! कथा, कादंबरी, चरित्र, समीक्षा, लोकसाहित्य, संशोधनात्मक लेखन इ. अनेक साहित्य प्रकार नानासाहेबांनी यशस्वीपणे हाताळले. त्यांच्या विपुल व विविध लेखनामुळे दलित साहित्य श्रीमंत झाले.

कै. ना. रा. शेंडे व इतर लेखकांनी समृद्ध केलेल्या दलित साहित्याचे दालन विदर्भ साहित्य संघाच्या श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालयात आज अभिमानाने जतन करून ठेवलेले आहे. या दलित साहित्याचा उपयोग अनेक अभ्यासक, संशोधक व पत्रकार फार मोठ्या प्रमाणात करतात. या अभ्यास साधन विभागाला वि. सा. संघाचे माजी अध्यक्ष, दलित साहित्याचे शिल्पकार कै. ना. रा. शेंडे यांचे नाव देणे उचित ठरेल. वि. सा. संघाच्या संदर्भ ग्रंथालयात कै. ना. रा. शेंडे यांची स्मृति जतन करून ठेवणे आवश्यक आहे. कारण कै. भाऊसाहेब माडखोलकरांप्रमाणे श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालयाच्या स्थापनेत त्यांचा महत्त्वाचा वाटा आहे.

श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालयातील दलित साहित्य अभ्यास साधने विभाग आता अधिक समृद्ध करणे आवश्यक आहे. त्यासाठी अर्थातच निधीची आवश्यकता आहे. शि. सं. ग्रंथालयाचा संकल्पित दलित साहित्य अभ्यास साधने विभाग समृद्ध करण्यासाठी यंदा आम्ही रुपये दहा हजाराची ग्रंथ खरेदी तसेच रु. पाच हजार उपस्कर खरेदी व रु. पाच हजार दलित साहित्य नियतकालिके (जुने बांधीव ग्रंथ) खरेदी करू इच्छितो. तरी आमच्या या संकल्पित योजनेस भरघोस आर्थिक सहाय्य द्यावे ही विनंती. हा विभाग संपन्न झाल्यास कै. ना. रा. शेंडे यांच्यासारख्या दलित साहित्याच्या एका महान शिल्पकाराचे स्मरण केल्याचे समाधान मिळेल.

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ

झाशी राणी चौक सीताबर्डी, नागपूर १२

विक्रीस तयार असलेली प्रकाशने

१. संशोधन लेखसंग्रह, भाग - २ : कै. हरिभाऊ नेने	रु.	६-००
२. प्रयोगक्षम मराठी नाटके : डॉ. मु. श्री. कानडे	रु.	३०-००
३. मराठी वर्णोच्चार विकास : डॉ. द. ह. अग्निहोत्री	रु.	३२-००
४. अध्यक्षीय भाषणे : रा. भू. तु. ना. काटकर (विदर्भ साहित्य संघाच्या संमेलनाध्यक्षांच्या भाषणांचे संकलन)	रु.	७५-००
५. आणखी भाषणे : डॉ. मधुकर आष्टीकर	रु.	१०-००
६. तीन भाषणे : गणेश व्याख्यानमाला १९७७ : डॉ. र. श. केळकर	रु.	४-००
६. "प्रातिभ" लघुकथा संग्रह (१९८०)	रु.	२०-००
८. समग्र बजावा	रु.	२०-००
९. हिंदी मराठी भाषा प्रवेशिका : श्रीमती मालतीबाई श्रीखंडे	रु.	४-००
१०. ज. के. उपाध्ये यांची १८८३-१९१३ कविता : संपा. आशा सावदेकर	रु.	३०.००
११. दक्षिणेतील दोन आचार्य : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी	रु.	५-००
१२. मराठी गद्य : प्रा. श्री. गो. काशीकर	रु.	३-००
१३. संपूर्ण गडकरी भाग - १ व २ (म. रा. सं. मं.)	रु.	७५-००
१४. युगवाणी साहित्य सूची : (संपादन : केशव जोशी)	रु.	७०-००
१५. कविता विदर्भाची : डॉ. सौ. आशा सावदेकर	रु.	५०-००
१६. छंदशास्त्र- एक अध्ययन : कुंदर दिवाण	रु.	१०-००
१७. वसंत वैभव : डॉ. सौ. कुंदा केळापुरे / डॉ. मदन कुलकर्णी	रु.	८०-००
१८. धन्यतेची थाप : डॉ. वि. भि. कोलते	रु.	१००-००
१९. वक्ता दशसहस्रेषु (प्रा. राम शेवाळकर) संपादक डॉ. वि. स. जोग	रु.	१२५-००

टीप : १. संमेलन स्थळी एकूण १० रु. किंमतीच्या पुस्तकांवर १० टक्के सूट.
२. शाळा / महाविद्यालय / ग्रंथालये विक्रेत्यांकरिता २५ टक्के सूट.

"युगवाणी" : सभासद वार्षिक वर्गणी रु. ५० /- ■ त्रैवार्षिक वर्गणी रु. १२५/-

---


-: युगवाणी जाहिरात दर :-

कव्हर पेज - ४	रु. ३०००/-	पूर्ण पान	रु. १००० /-
कव्हर पेज - ३	रु. २०००/-	अर्ध पान	रु. ५५० /-
कव्हर पेज - २	रु. २०००/-	पाव पान	रु. ३५० /-

जाहिरात संकल्पन दर हा वेगळा राहील.


संपर्क सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, झाशी राणी चौक, सीताबर्डी, नागपूर - ४४० ०१२
फोन नं. ५२३९२९

अनुक्रमणिका



अनुक्रमणिका

पोस्टल रजि. एन.जी.पी. नं. /४११
PRINTED MATTER PERIODICAL



प्रकाशक : मनोहर म्हैसाळकर, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, नागपूर-१२
मुद्रक : मधुसूदन पांडुरंग बनहट्टी, नारायण मुद्रणालय, धंतोली, नागपूर-१२
मुखपृष्ठ मुद्रण : मधुकर वैद्य, मधुकर आर्टस्, धंतोली, नागपूर-१२